महाराष्ट्र शासन

# मैत्री बालमनाशी

आधारशिला बालवाटिका – १, २, ३ (वय वर्षे ३ ते ६)

## मार्गदर्शक हस्तपुस्तिका - भाग १

अंगणवाडी सेविका/बालवाटिका शिक्षिका यांच्यासाठी



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**मैत्री बालमनाशी : आधारशिला बालवाटिका १, २, ३ (मार्गदर्शक हस्तपुस्तिका – भाग १)**

◈ **प्रवर्तक** : **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

◈ **प्रकाशक** : **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

◈ **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.

◈ **मार्गदर्शन** : **मा. सचिन्द्र प्रताप सिंह (भा.प्र.से.)**
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
**मा. संजय यादव (भा.प्र.से.)**
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

◈ **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **सहसंपादक** : **श्रीम. अनुराधा ओक**
सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **कार्यकारी संपादक** : **डॉ. माधुरी सावरकर**
उपसंचालक, सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **कार्यकारी सहसंपादक** : **डॉ. गितांजली बोरुडे**
विभाग प्रमुख, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **संपादन साहाय्य** : **श्रीमती सुषमा कोंडूसकर**
अधिव्याख्याता, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
**श्रीमती सुप्रिया नवले**
विषय साहायक, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **प्रथम आवृत्ती** : जून २०२५

◈ **अर्थसाहाय्य** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

◈ **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

◈ © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

महाराष्ट्र शासन

# मैत्री बालमनाशी

आधारशिला बालवाटिका - १, २, ३ (वय वर्षे ३ ते ६)

## मार्गदर्शक हस्तपुस्तिका - भाग १

अंगणवाडी सेविका/बालवाटिका शिक्षिका यांच्यासाठी



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

व्यक्तीच्या जीवनातील इतर कोणत्याही टप्प्यातील विकासाच्या गतीपेक्षा, पहिल्या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये मेंदूच्या विकासाची गती ही अधिक वेगवान असते. जागतिक स्तरावर मेंदू संदर्भात झालेल्या विविध महत्त्वपूर्ण संशोधनाचा परिपाक म्हणून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात पायाभूत स्तरावर समाविष्ट करण्यात आले.

पायाभूत स्तरावर वय वर्ष ३ ते ८ या वयोगटाचा समावेश करण्यात आलेला आहे. या स्तरावरील बालकांच्या शिक्षणाविषयी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर २०२२ वर आधारित महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र राज्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर विकसित करण्यात आला. ३ ते ६ वयोगटाला अध्ययन करण्यास सुलभन करणाऱ्या अंगणवाडी ताई/ बालवाडीच्या शिक्षिका/ पूर्वप्राथमिक स्तरावरील शिक्षक यांच्यासाठी शिक्षक हस्तपुस्तिका असावी असे पायाभूत स्तर अभ्यासक्रम २०२४ यामध्ये नमूद केले आहे. तसेच ३ ते ६ या वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी नमूद सर्व क्षमता साध्य होण्यासाठी कोणतेही पाठ्यपुस्तक तयार करणे अपेक्षित नाही. मात्र बालकास मिळणारे अध्ययन पूरक वातावरण, वर्गात व वर्गाबाहेर देण्यात येणारे अध्ययन अनुभव हे समृद्ध असणे अधिक महत्त्वाचे मानले गेले आहे.

पायाभूत स्तर अभ्यासक्रम २०२४ व महिला व बालविकास विभाग, नवी दिल्ली यांचे मार्फत ३ ते ६ वर्षे वयोगटासाठी आधारशिला अभ्यासक्रम २०२४ यावर आधारित आधारशिला बालवाटिका अभ्यासक्रमानुसार प्रस्तुत मार्गदर्शक हस्तपुस्तिका विकसित करण्यात आलेली आहे.

मार्गदर्शक हस्तपुस्तिकेचे दोन भाग आहेत. मार्गदर्शक हस्तपुस्तिका भाग १ मध्ये बालशिक्षणातील प्रारंभिक वर्षे, वर्ग व्यवस्थापन, बालकांचे समावेशन आणि दिनचर्या या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच आठवडानिहाय वेळापत्रक व २ परिशिष्टे समाविष्ट करण्यात आलेली आहे.

वेळापत्रकाची रचना आधारशीलामधील वेळापत्रकाच्या धर्तीवर करण्यात आलेली आहे. बालमानसशास्त्राचा विचार करून वेळापत्रकातील काही कृतींचा क्रम थोडा फार बदलण्यात आलेला आहे. वेळापत्रक तयार करताना मी, माझे कुटुंब व परिसर, पाऊस पाणी, भाज्या व फळे, वनस्पती व फुले, प्राणी, पक्षी व कीटक, ऋतू, वाहन आणि मदतनीस असे एकूण नऊ विषयगोफ (थीम) समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. वेळापत्रकात सुरुवातीचे चार आठवडे हे आरंभीचे व समावेशनाचे आहेत, जे शैक्षणिक वर्षाच्या जून महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. एकदा बालक बालशिक्षणात पालकांच्या मदतीशिवाय उपस्थित राहू लागले कि, साधारणपणे जुलै महिन्याच्या सुरुवातीच्या आठवड्यापासून वेळापत्रकानुसार दैनंदिन अध्ययन अनुभव देणे सुरू करणे अपेक्षित आहे. साधारणपणे पहिल्या चार थीमवर आधारित १६ आठवडे पूर्ण झाल्यानंतर सराव व दृढीकरण करण्यासाठी तीन आठवड्यांची रचना करण्यात आलेली आहे. दुसऱ्या सत्रात उर्वरित पाच थीमवर आधारित २० आठवड्यांचे वेळापत्रक देण्यात आलेले आहे. दिवाळीच्या दोन आठवड्यांच्या सुट्टीचा विचार करता साधारणपणे जून ते एप्रिल असे ११ महिन्यातील एकूण ४६ आठवड्यांचे वेळापत्रक समाविष्ट करण्यात आलेले आहे.

वर्गात कृती घेताना ताई किंवा शिक्षिका यांच्या हाताशी काही गाणी गोष्टी असाव्यात या हेतूने परिशिष्टमध्ये काही गाणी व गोष्टी यांचा समावेश करण्यात आलेला असून त्या केवळ सूचक आहेत. याव्यतिरिक्त इतर उपलब्ध गाणी, गोष्टी यांचा वापर देखील करणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती यांचा एकत्रित संबंध वर्गातील कृती घेताना व मूल्यांकन करताना लक्षात येण्यासाठी परिशिष्ट २ मध्ये त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

मार्गदर्शक हस्तपुस्तिका भाग – २ मध्ये वर्गातील दैनंदिन कृतींचे सविस्तर विवेचन दिलेले आहे. यामध्ये मुख्य १३० कृती असल्या तरीही उपकृतींसह एकूण १८१ कृती समाविष्ट आहेत. या कृतींचे लेखन करताना महाराष्ट्रातील अंगणवाडी ताई व पूर्वशालेय शिक्षणातील शिक्षिका यांना समजेल अशा सहज सोप्या भाषेचा वापर केला आहे. समाविष्ट करण्यात आलेल्या कृती वयोगटनिहाय देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक कृतीसाठी लागणारे साहित्य, संबंधित थीम त्यांचाही उल्लेख प्रत्येक कृती लिहिताना करण्यात आलेला आहे. कृतीमध्ये विविधता आणण्यासाठी देखील पुरेसा वाव व संधी देण्यात आलेली आहे. प्रत्येक कृतीतून साध्य होणाऱ्या क्षमता व कृती सुरू असताना करावयाच्या निरीक्षणाच्या बाबीदेखील नमूद करण्यात आलेल्या आहेत. वेळापत्रकानुसार आवश्यक कृती शोधण्यास सुलभ व्हावे यासाठी सुरुवातीला कृतींची अनुक्रमणिकादेखील उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

'मैत्री बालमनाशी' या मार्गदर्शक हस्तपुस्तिकेचे वैशिष्ट्य म्हणजे यातील कृतीशी संबंधित अभ्यासक्रमातील ध्येय व क्षमता या सोबतच वयोगटनिहाय अध्ययन निष्पत्तीचा उल्लेख करण्यात आला आहे. वेळापत्रकाची रचना विषय गोफ (थीम नुसार) केलेली असून प्रत्येक थीमसाठी एकूण चार आठवड्यांचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. बालभारतीने विकसित केलेल्या पाठ्य साहित्याशी समन्वय साधण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष बालके आणि अंगणवाडी/बालवाडीतील सेविका यांचे समवेत काम करणाऱ्या बालशिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने ही दर्जेदार मार्गदर्शक हस्तपुस्तिका विकसित करणे शक्य झाले आहे. अशी ही सर्व समावेशक, वैशिष्ट्यपूर्ण व सुलभ मार्गदर्शक हस्तपुस्तिका आपणास सुपूर्त करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

'मैत्री बालमनाशी' ही मार्गदर्शक हस्तपुस्तिका आपणास वय वर्ष ३ ते ६ वयोगटातील आपल्या बालकांच्या बालमनाशी मैत्री करत त्याचा सर्वांगीण विकास साध्य करण्यास निश्चित मदत करेल याचा मला पूर्ण विश्वास आहे. आपल्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | भाग अ : बालशिक्षणाविषयी... | १ |
| | प्रकरण १ : प्रारंभिक वर्षे | १ |
| | प्रकरण २ : बालशिक्षणातील वर्गव्यवस्थापन | ७ |
| | प्रकरण ३. सर्वसमावेशित बालशिक्षण | १९ |
| | प्रकरण ४. बालशिक्षणाची दिनचर्या (वयोगट ३ ते ६ वर्षे) | २७ |
| २) | भाग ब : आठवडानिहाय वेळापत्रक | ५६ |
| ३) | परिशिष्ट १ : गंमत गाणी व गोष्टी | १०१ |
| | अ) आठवडानिहाय वर्गात घ्यावयाच्या गोष्टी व गाणी | १०१ |
| | ब) गंमत गाणी | ११३ |
| | क) गंमत गोष्टी | १२८ |
| ४) | परिशिष्ट २ : अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती | १४२ |
| ५) | संदर्भग्रंथ सूची | १९२ |
| ६) | निर्मिती व लेखन समिती | १९३ |
| ७) | श्रेयनामावली | १९४ |

**नोंद घ्यावी...**

१) 'मैत्री बालमनाशी' या मार्गदर्शक हस्तपुस्तिका – भाग १ मध्ये मुले, मुली किंवा अन्य असे स्वतंत्र शब्द न वापरता बालक हाच शब्द वापरण्यात आला आहे. बालक या संज्ञेत मुलगा, मुलगी किंवा अन्य या तिन्ही संज्ञा अंतर्भूत आहेत.

२) 'मैत्री बालमनाशी' मार्गदर्शक हस्तपुस्तिका – भाग १ ही राज्यातील पायाभूत स्तरातील वय वर्षे ३ ते ६ या वयोगटातील बालकांना शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी आहे. राज्यात प्राधान्याने अंगणवाड्या या जास्त प्रमाणात आहेत. त्यामुळे शिक्षकांना उद्देशून ताई हा शब्द वापरण्यात आला आहे.

# भाग अ : बालशिक्षणाविषयी...

## प्रकरण १ : प्रारंभिक वर्षे

व्यक्तीच्या जीवनाची प्रारंभिक वर्षे खूप महत्त्वाची मानली गेली आहेत. सुरुवातीचा काळ म्हणजे पाया भरणीचा काळ आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सुरुवातीचा काळ/सुरुवातीची वर्षे/प्रारंभिक काळ हा असा काळ आहे, की जन्माला आल्यानंतर व्यक्ती चालणे, बोलणे अशा स्वावलंबनाच्या क्रियांकडे वळते, जीवनातील महत्त्वाची पायाभूत कौशल्ये आत्मसात करते आणि प्रौढ म्हणून पुढचे जीवन स्वतंत्रपणे जगण्यास सज्ज होते. यासाठी जीवनातील जन्मापासूनची पहिली आठ वर्षे महत्त्वाची मानली गेली आहेत; म्हणजेच जीवनाची पहिली आठ वर्षे हा संपूर्ण आयुष्याचा पाया आहे.

### प्रारंभिक वर्षांचे महत्त्व :

एका उदाहरणातून आपण प्रारंभिक वर्षांचे महत्त्व जाणून घेऊ.

एखादे बालक शाळेत जायला लागते, तेव्हा आपण त्याच्याकडून जड दप्तर खांद्यावरून नेण्याची अपेक्षा करत नाही. फक्त जेवणाच्या डब्याची पिशवी बालक नेते. जसे ते मोठे होत जाते, तसे त्याचे दप्तरही मोठे होत जाते आणि जडही होते. त्याच्यामध्ये तो जडपणा पेलण्याची शारीरिक ताकद वाढते, क्षमता विकसित होते आणि मनाची तयारीही होते आणि हे सर्व योग्य वेळेलाच होत असते. अगदी असेच प्रारंभिक काळाचे आहे.

बाळ जन्माला आल्यानंतर, लगेच आपण त्याच्याकडून चालण्याची, पळण्याची अपेक्षा करत नाही. ते हळूहळू मोठे होते, यथावकाश चालायला, बोलायला लागते. वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करते. वाढत्या वयाबरोबर त्याच्या गरजा बदलत जातात, वर्तनात बदल होत जातो तसा प्रतिसाद व प्रतिक्रियांमध्ये बदल होत जातो. हे सर्व बाह्य बदल असतात आणि ते आपल्याला दिसतात. त्याच्याच जोडीने डोळ्यांना न दिसणाऱ्या शरीरांतर्गत अवयवांमध्येही बदल होत असतात. उदा. भूक वाढते, हालचालीची क्षमता वाढते.

या सगळ्या क्रिया, प्रक्रिया कशा घडत असतील, हे आता लक्षात घ्यायला हवे. मेंदूसंबंधित अनेक संशोधने आणि अभ्यास यांवरून हे सिद्ध झाले आहे, की या सर्व गोष्टींचा कर्ता करविता मेंदू असतो. मेंदूपेशी आणि त्यांची एकमेकांशी होणारी जोडणी, यांमुळे बालकाला अनेक गोष्टी करता येऊ लागतात, अनेक गोष्टींचे आकलन होऊ लागते.

पहिल्या आठ वर्षांत बालकाला जे सकारात्मक किंवा नकारात्मक अनुभव येतात, त्याचा परिणाम मेंदूवर खोलवर होत असतो. त्याचे एकमेव कारण आहे, की मेंदूपेशी एकमेकांना जोडल्या जाऊन, मेंदूमध्ये त्या गोष्टी कायमच्या कोरल्या जातात. याचसाठी मॅडम मॉंटेसरी यांनी म्हटले आहे, की '**लहान बालकांचा मेंदू टिपकागदासारखा असतो, त्यावर जे जाते ते लगेच टिपले जाते.**'

पहिल्या आठ वर्षांत येणाऱ्या अनुभवांवर, व्यक्ती पुढे एक प्रौढ म्हणून कशी घडेल, कसे वर्तन करेल हे अवलंबून असते.

**यावरून आपण हे लक्षात घ्यायचे की,**

आपण बालकाला कोणते अनुभव जास्तीत जास्त पुरवायला हवेत?, बालकाच्या सर्वांगीण विकासाला चालना कशी द्यायला हवी?, त्यासाठी कृतींचे नियोजन कसे करावे?, याचप्रमाणे का करावे?, अंगणवाडीताईचे बालकांबरोबर वर्तन कसे असावे? याचाही विचार व्हायला हवा.

या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी सर्वांत महत्त्वाची संकल्पना लक्षात घ्यायला हवी. ही संकल्पना आहे सर्वांगीण विकासाची आणि याच जोडीला आपल्याला माहीत हवे, की मेंदूमध्ये नेमके काय घडते, ज्यामुळे आपले वर्तन घडते.

**सर्वांगीण विकास क्षेत्रे :**




सर्वांगीण विकास याचा अर्थ, बालकाचा सर्वांगाने विकास होणे. या सर्वांगीण विकासाच्या क्षेत्रांचा संबंध शरीराशी जोडलेला दिसत असला, तरी प्रत्येक गोष्ट मेंदूच्या संमतीने घडत असते; म्हणजेच प्रत्येक क्षेत्राचा संबंध मेंदूशी असतो. प्रत्येक क्षेत्राचे नियंत्रण मेंदूच करतो.

मेंदूमध्ये सर्व शरीरावर नियंत्रण ठेवणारी विविध केंद्रे असतात. मेंदूचे डावा मेंदू आणि उजवा मेंदू असे दोन भाग असतात. मेंदूमध्ये निरनिराळी केंद्रे असतात. पंचेंद्रियांवर नियंत्रण ठेवणारे केंद्र, आपल्या हालचालींवर नियंत्रण ठेवणारे केंद्र, वर्तनावर, भावनांवर नियंत्रण ठेवणारे केंद्र, मिळालेले अनुभव स्मरणात

जतन करून ठेवणारे केंद्र, भाषा आणि बोलणे यांसाठीचे केंद्र, विचारशक्ती, कल्पनाशक्ती, अवधानक्षमता, सर्जनशीलता (नवनिर्मितीची क्षमता), संवेदनक्षमता अशा बोधात्मक कौशल्यांची केंद्रेही मेंदूवर असतात. यावरून लक्षात येते, की सर्वांगीण विकास आणि मेंदूचा विकास यांचा जवळचा संबंध आहे.



मेंदूचे वजन ३ पौंड असते.
मानवी शरीरातील सर्वांत जास्त कार्यक्षमता असणारा हा अवयव आहे.

मेंदू आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देतो; म्हणजेच आपण जे अनुभव पुरवतो, त्या प्रत्येक अनुभवावर मेंदू प्रकिया करतो आणि त्या अनुभवांची साठवण पेशीच्या रूपात योग्य पद्धतीने करतो. अनुभव जसे वाढत जातात, तशा पेशी एकमेकींना जोडल्या जातात. याचसाठी अंगणवाडी ताई म्हणून आपले काम किती मोठे आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे. प्रारंभिक काळातील खूप महत्त्वाच्या वर्षांमध्ये बालक अंगणवाडीत असते, म्हणून बालकांना शाळेत दिलेले अनुभव सुसूत्र, सुनियोजित, सुसंबद्ध व अर्थपूर्ण असावेत. त्याची रचना क्रमाने केलेली असावी लागते. प्रत्येक अनुभवाची काठिण्यपातळी हळूहळू वाढवत नेलेली असावी.

प्रत्येक शैक्षणिक अनुभव आखीव, रेखीव व हेतुपूर्वक असायलाच पाहिजे. बालकाच्या मेंदूवर त्याचा योग्य प्रभाव पडला पाहिजे, म्हणजे बालक आपल्याकडे तीन वर्षे असणार आहे, म्हणून अनुभवाची रचना करत असताना, प्रत्येक अनुभव सोप्याकडून अवघड गोष्टींकडे जाणारा, माहीत असलेल्या गोष्टींकडून माहीत नसलेल्या गोष्टींकडे नेणारा व मूर्त गोष्टींकडून अमूर्त गोष्टींकडे नेणारा असावा, म्हणजेच प्रत्यक्ष अनुभवांकडून अप्रत्यक्ष अनुभवांकडे नेणारा असावा.

## सर्वांगीण विकास आणि उद्दीपन :

### उद्दीपन :

उद्दीपन ही अशी प्रक्रिया आहे, जी बालकाला काही कृती करायला दिल्या किंवा हालचाली करायला भाग पाडले, तर बालक त्या कृती करण्यास उद्युक्त होते, म्हणजेच कृती करण्यास आपणहून तयार होते. बालकाच्या एखाद्या हालचालीसाठी, वर्तनासाठी आपण चालना दिली, असा त्याचा अर्थ असतो आणि त्यामुळे बालक उद्दीपित होऊन ती क्रिया, कृती करण्यास प्रोत्साहित होते.

प्रत्येक वयोगटासाठी आपण एक एक उदाहरण पाहू.

- बाळ पाळण्यात असते आणि पाळण्यावर एक खेळणे म्हणजे चिमणाळे टांगलेले असते. बाळ त्याकडे पाहून हुंकार देते. त्याने हात, पाय हलवले तर ते खेळणेही हलते हे त्याला कळते, तेव्हा ते बाळ तीच क्रिया परत परत करत राहते आणि त्यातून त्याला आनंद मिळतो.

- बाळ रांगण्याच्या स्थितीत येते, तेव्हा जर त्याचे आवडते खेळणे त्याच्यापासून थोडे दूर ठेवले, तर ते घेण्यासाठी बाळ पुढे जायचा प्रयत्न करते, म्हणजेच त्याच्या हालचालीला चालना मिळाली. बाळ उद्दीपित झाले आणि रांगण्याच्या क्रियेत पुढे जाण्याचा त्याने आपणहून प्रयत्न केला.
- आता शिशु हात सोडून उभे राहण्यासाठी प्रयत्न करत आहे, अशा वेळी आपल्याकडे काही ओळी म्हटल्या जातात... उभा राहिला/उभी राहिली; आम्ही नाही पाहिला/आम्ही नाही पाहिली. त्यामुळे बाळ उभे राहण्याचा प्रयत्न अगदी हसत हसत करते.
- याच्या पुढची पायरी म्हणजे शिशु हात सोडून पावले टाकणार असते, त्यासाठी आपल्याकडे काही ओळी गुणगुणल्या जातात. 'चाल चाल माते पायी रुतले काटे' किंवा 'सखू बाजाराला जाते सखू झपाटा मारते' त्या ओळींच्या लयीमुळे, तालामुळे शिशु चालण्याची कृती करायचा प्रयत्न करतेच, परंतु पाऊल टाकताना धडपडले, तरी पुन्हा हसत हसत ती क्रिया करण्यास उद्युक्त होते.

या सर्व उदाहरणांमधून लक्षात येते, की आपण बाळाची पंचेंद्रिये, बाळांच्या हालचाली यासाठी उद्दीपनाद्वारे चालना देतो. ती कृती पुन्हापुन्हा करावी यासाठी प्रोत्साहित करतो.

**उद्दीपन आणि बालशिक्षण :**

आता बालक तीन वर्षांचे झाल्यावर अंगणवाडीत प्रवेश घेते. अंगणवाडीत आल्यावर उद्दीपन कार्य जोमाने हाती घ्यायला हवे. या काळातील विकासाची गती, कौशल्ये आत्मसात करण्यासाठी क्षमता वापरण्याची गती जास्त असते.

**अ) उद्दीपन देणारे वातावरण :** अंगणवाडीत खेळण्यास उद्युक्त करणारे वातावरण असेल, तर बालकाच्या खेळकरपणात खूप फरक पडतो. ज्या वातावरणामध्ये बालकाला खेळणी हाताळण्याची भरपूर संधी मिळते, निरनिराळी खेळणी उपलब्ध करून दिली जातात, कोणत्या खेळण्यांबरोबर खेळायचे याची निवड करण्याची संधी दिली जाते, कोणाबरोबर खेळायचे याची मुभा मिळते, रचनात्मक खेळाला वाव मिळतो, वेगवेगळे प्रयोग खेळण्यांबरोबर करून बघता येतात असे वातावरण बालकाला उद्दीपन देणारे असते. अशा वातावरणात बालकाच्या सर्जनशीलतेला चालना मिळते, रचनात्मक खेळाला वाव मिळतो आणि स्वावलंबन वाढते. व्यक्तिविशिष्टता, म्हणजेच प्रत्येक बालकाचे स्वतःचे वैशिष्ट्य असते, ते जपले जाते. उद्दीपन देणाऱ्या वातावरणाचा परिणाम कायमस्वरूपी होतो. व्यक्तिमत्त्व घडण्यामध्ये अशा वातावरणाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे पालक व अंगणवाडीताई यांनी असे वातावरण पुरवले पाहिजे.

**ब) उद्दीपन वातावरणनिर्मिती :**

- उपलब्ध करून दिलेल्या साहित्यात विविधता असावी व त्याचा दर्जा उत्तम असावा.
- बालकाला साहित्यापर्यंत पोहोचण्यासाठी दिल्या जाणाऱ्या संधींमध्ये सहजता असावी.

- वर्गातील व वर्गाबाहेरील खेळांसाठी जागा व्यवस्थित संघटित केलेली असावी.
- विविध कृतींसाठी कोपरे उपलब्ध करून दिलेले असावेत.
- कृतींमध्ये विविधता असावी.
- स्वावलंबन व परस्परावलंबन यांसाठी संधी उपलब्ध करावी.
- बालकांनी पूर्ण केलेल्या कृती मांडण्यासाठी, प्रदर्शन करण्यासाठी जागा करावी.
- एकटे खेळण्यास, जोडीने खेळण्यास व गटात खेळण्यास संधी द्यावी.

**क) विकासक्षेत्रानुसार उद्दीपन देणारे खेळसाहित्य :**

| विकासक्षेत्र | उद्दीपन देणारे खेळसाहित्य |
|---|---|
| **शारीरिक विकास :**<br>स्थूल स्नायू (मोठे स्नायू) विकास<br>सूक्ष्म स्नायू (लहान स्नायू) विकास | **आवश्यकता :** पोषक आहार, लसीकरण, उंची, वजन यांकडे लक्ष असणे.<br>**खेळणी, साधने मोठ्या स्नायू विकासासाठी :** ओढण्याची, ढकलण्याची खेळणी. झोपाळा, घसरगुंडी, तीन चाकी सायकल, चेंडू, वाळूत उड्या मारण्याची संधी, चढण्या उतरण्याची संधी, लोंबकळण्याची संधी, सरपटणे, रांगणे, लोळणे अशा कृतींची संधी, विविध प्रकारे चालण्याची, पळण्याची संधी.<br>**खेळणी, साधने लहान स्नायू विकासासाठी :** तेलकट खडू, मणी, रंग, माती, खडू, ठोकळे, शिवणपाट्या, कात्र्या, चिकटकामाचे साहित्य, रंगीत कागद. |
| **सामाजिक, नैतिक व भावनिक विकास** | **आवश्यकता : प्रसंगनिर्मिती**<br>**साहित्य :** वाटावाटी करून खेळता येणारी खेळणी, इतरांबरोबर गटात खेळता येणारी खेळणी, देवाण-घेवाण होऊ शकेल असे साहित्य व खेळणी, बाहुलीघर, मैदानावरील खेळ. |
| **बोधात्मक विकास** | **आवश्यकता :** बोधात्मक कौशल्यांना चालना मिळणे.<br>**खेळणी, साहित्य, साधने :** चित्रकोडी, पुस्तके, नाट्यात्मक खेळाची संधी, कृतिपत्रके, डॉमिनो, लाकडी ठोकळे, जोडतोड खेळणी. |
| **भाषा आणि साक्षरता विकास** | **आवश्यकता :** उदयोन्मुख साक्षरता वातावरणनिर्मिती, शब्दसंग्रह वाढणे, भाषा समृद्ध होणे.<br>**खेळणी, साहित्य, साधने :** अंगणवाडीत जागोजागी लावलेल्या शब्दपट्ट्या, चित्रांची पुस्तके, मोठ्या अक्षरात लेखन केलेली पुस्तके, भिंतीवरील चित्रतक्ते, अक्षरतक्ते, अंकतक्ते, चित्र-कविता तक्ते, चित्रगप्पा, चित्रवाचन, गोष्ट सांगणे, गोष्ट ऐकणे, गोष्ट तयार करणे, गाणी म्हणणे, गाणी तयार करणे, शब्दोच्चारांचे खेळ, ध्वनीओळख खेळ, अनौपचारिक गप्पा. |

| विकासक्षेत्र | उद्दीपन देणारे खेळसाहित्य |
|---|---|
| **सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास** | **आवश्यकता :** वर्गातील वातावरणनिर्मिती, सौंदर्य बघायला शिकणे व कौतुक करण्यास शिकणे, दुसऱ्यांचा आदर करण्यास शिकणे.<br>**खेळणी, साहित्य, साधने :** अंगणवाडीत सण, समारंभ, उत्सव साजरे करणे, सजावट करण्यासाठी उद्युक्त करणे, रांगोळी, रंगीत कागद, बिया, पाने, फुले अशा साहित्यातून सर्जनशील निर्मितीस प्रोत्साहन देणे, तशा कृतींचे उपयोजन करणे, केलेली निर्मिती कशी छान आहे यासाठी कोणते शब्द वापरावे हे अंगणवाडीताईने स्वतःच्या कृतीतून दाखवून देणे, बालकांनी घातलेले कपडे, केलेले काम यांचे कौतुक करणे, सर्जनशील कृतीत बालकाने केलेली निर्मिती एकमेकांना दाखवून छान, सुंदर, चांगले असे म्हणण्यास शिकवणे. |

एकूणच अंगणवाडीताईने बालकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी वर्गात विविध साहित्य व खेळणी यांच्या माध्यमातून खेळण्याची व कृतीतून शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

❖❖❖



## प्रकरण २. बालशिक्षणातील वर्गव्यवस्थापन

'व्यवस्थापन' हा शब्द आपण अनेक बाबतीत वापरतो. आपल्या दैनंदिन व्यवहारातही आपण व्यवस्थापन करत असतो, पण या कृती आपल्या इतक्या अंगवळणी पडलेल्या असतात आणि आपण त्या सहज करत राहतो, त्यामुळे त्यालाच 'व्यवस्थापन' म्हणतात, हे आपल्या लक्षातही येत नाही, मग आपण व्यवस्थापन साक्षर बनूया! असे जे म्हणतो, त्यासाठी आपल्याला अगोदर जाणून घ्यायला लागेल, की व्यवस्थापन म्हणजे नेमके काय?

**व्यवस्थापन :**

व्यवस्थापन ही एक प्रक्रिया आहे, म्हणजेच आपण आखलेल्या वेगवेगळ्या कृती/क्रिया एकत्र येऊन ही प्रक्रिया घडते आणि आपण मनात योजलेले कार्य पूर्ण होते.

आपण मनामध्ये जी योजना केलेली असते, ती पूर्ण झाल्यावर कशी दिसेल? कशी असेल? याचेही चित्र आपण ठरवलेले असते. योजना केली आणि एकच क्रिया करून ती पूर्ण झाली, असे कधीच होत नाही. त्यासाठी त्या योजनेचे आपण छोटे छोटे भाग करतो आणि कृती स्वरूपात ते पूर्ण करतो आणि मग एक परिपूर्ण चित्र उभे राहते. सामान्यपणे यालाच व्यवस्थापन म्हणता येते; म्हणजेच व्यवस्थापन या संकल्पनेमध्ये सर्वप्रथम योजना आखली जाते, योजनेमागचे हेतू स्पष्ट केले जातात आणि ते हेतू पूर्ण करण्यासाठी कृती केली जाते.

आता व्यवस्थापन प्रक्रियेत नेमके काय होते, याची अभ्यासपूर्ण बाजू पुढीलप्रमाणे आहे.

१) नियोजन २) संघटन ३) परिणाम ४) नियंत्रण

**१) नियोजन :** कोणतेही कार्य नीटपणे पार पाडण्यासाठी योजनापूर्वक काम करणे म्हणजे नियोजन.

**२) संघटन :** नियोजित कार्य पूर्ण करण्यासाठी संघटितपणे (एकत्रितपणे) कृती करून, नियोजनाला प्रत्यक्ष रूप देणे म्हणजे संघटन.

**३) परिणाम :** नियोजनाप्रमाणे कामाला प्रत्यक्ष रूप देऊन, जो परिणाम साधला जायला हवा त्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, कामाला योग्य दिशा देणे आणि हेतूसाध्य करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे परिणाम.

**४) नियंत्रण :** पूर्वी केलेल्या कृती/कार्य/कामे व ती पूर्णत्वाला नेताना केलेली धडपड याची तुलना चालू असलेल्या कामाबरोबर करत राहणे, म्हणजे आपोआप काम बरोबर होते आहे का नाही? त्याचप्रमाणे प्रक्रिया चालू असतानाच, कोठे सुधारणा करायला हवी का? याची तपासणी करणे म्हणजेच नियंत्रण.

व्यवस्थापन प्रक्रिया समजल्यावर, आता आपल्याला ही प्रक्रिया, आपण करण्याच्या प्रत्येक कामाबरोबर जोडायची आहे.

**वर्गव्यवस्थापन :**

कोणत्याही वर्गात आपण एक शिक्षक म्हणून उभे राहतो, तेव्हा शिक्षक म्हणून वर्गव्यवस्थापक ही भूमिका पार पाडावी लागते. व्यवस्थापन या शब्दाचा अर्थ स्पष्ट असेल, तर आता आपण वर्गव्यवस्थापन या शब्दाच्या अर्थाबाबत साक्षर व्हायला हवे, कारण हे आपले रोजचे काम आहे.

वर्ग हे असे ठिकाण आहे, की जेथे शिक्षक विद्यार्थांसाठी अभ्यासाच्या अनुभवांचे नियोजन करतो आणि विद्यार्थी तो अनुभव घेण्यासाठी उत्सुक असतो. आता इथे लक्षात घ्यायचे, की आपल्यासमोर लहान बालके असतात, जरी ते विद्यार्थी असले, तरी प्रत्येक अनुभव प्रथमच घेणार असतात म्हणून आपण त्यांना वह्या पुस्तके देऊन, अभ्यास करायला लावत नाही, तर त्यांना सभोवतालचे जग माहीत व्हावे म्हणून अनेक गोष्टींचे संवेदन पंचेंद्रियांच्या साहाय्याने अनुभव देऊन घडवत जातो.

**वर्गव्यवस्थापन याचा अर्थ :**

आपल्याकडे उपलब्ध असलेली जागा, बालकांची संख्या, उपलब्ध आर्थिक पाठबळ, उपलब्ध वेळ, उपलब्ध सामान–साहित्य, उपलब्ध खेळणी, उपलब्ध मनुष्यबळ या सगळ्यांचा आपण किती खुबीने उपयोग करून, मनात धरलेला हेतू सफल करू शकतो याचाच अर्थ आपण वर्ग व्यवस्थापन/अंगणवाडीचे व्यवस्थापन करत असतो; म्हणजेच आपल्या आणि बालकांच्या संबंधात अंगणवाडीतील जितक्या सजीव आणि निर्जीव गोष्टी येतील, त्या सगळ्यांचे व्यवस्थापन करायचे.

व्यवस्थापन करायचे म्हणजे, प्रत्येक गोष्टीचा नियोजनपूर्वक, विचारपूर्वक आणि हेतू सफल होण्याच्या दृष्टीने उपयोग करून घ्यायचा.

**व्यवस्थापन करणारी व्यक्ती/व्यवस्थापनकर्ता/व्यवस्थापक :**

आपण अंगणवाडीच्या दृष्टिकोनातून विचार करतो आहोत, त्यामुळे आपली अंगणवाडी आणि त्या भोवतीचा परिसर याचे प्रमुख कोण असेल, तर त्या अंगणवाडीतील ताई म्हणजेच अंगणवाडीताई आता व्यवस्थापकाच्या भूमिकेत आहे आणि तिला तिची अंगणवाडी उत्तम प्रकारे चालवायची आहे. उत्तम म्हणजे काय?, तर

- अंगणवाडीत येणाऱ्या बालकांना सर्वोत्तम अनुभव मिळायला हवेत.
- अंगणवाडीत उपलब्ध होणारा प्रत्येक कानाकोपरा विचारपूर्वक वापरायला हवा.
- अंगणवाडीताई म्हणून आपण बालकांच्या आयुष्यात खूप महत्त्वाचे असतो, हे कायम लक्षात ठेवून त्यांना प्रत्येक अनुभव दर्जात्मक देण्याचा प्रयत्न करायला हवा.
- अंगणवाडीतील सर्व साधनसाहित्य, खेळणी प्रत्येक बालकाला सारख्याच प्रमाणात उपलब्ध व्हायला हवे.
- अंगणवाडी उत्कृष्ट दर्जाची ठरायला हवी.

- बालकांच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाच्या वयात आणि आयुष्याची महत्त्वाची वर्षे बालके अंगणवाडीत असतात, त्यामुळे त्यांचा तो काळ संस्मरणीय करायलाच हवा.

**वर्गव्यवस्थापनाचे घटक :**

१) **स्वच्छता :** अंगणवाडी, अंगणवाडीचा वर्ग व सभोवतालचा परिसर यांची स्वच्छता सर्वप्रथम महत्त्वाची आहे.

२) **वर्गसजावट :** वर्ग चांगला दिसण्यासाठी, वर्गातील वातावरण प्रसन्न राहण्यासाठी वर्ग नीटनेटका लावलेला असावा. बालकांच्या रोजच्या बघण्यातील वस्तूंच्या साहाय्यानेच सजावट असावी, पण सजावटीचा अतिरेक करू नये, त्यापेक्षा बालकांनी पाहावीत अशी चित्रे, तक्ते यांच्या साहाय्याने सजावट असावी.

३) **चित्रफलक, फळा :** बालकांच्या नजरेच्या टप्प्यावर चित्रफलक लावावेत. फळा बालकांचा हात पोहोचेल अशा उंचीवर लावलेला असावा.

४) **वेळापत्रक :** आठवड्याचे वेळापत्रक भिंतीवर लावावे. हे वेळापत्रक बालकांनी वाचण्यासाठी नसते, पण ताईच्या डोळ्यांसमोर असेल, तर ताईचे काम नियोजनानुसार होते, तसेच आता काय करावे हा प्रश्न पडत नाही.

५) **वर्गमांडणी :** आपल्या अंगणवाडी वर्गात टेबल, खुर्ची, कपाट, सतरंज्या किती आहेत?, या प्रत्येक गोष्टीचा आपण केव्हा आणि कशासाठी वापर करतो?, या सर्व गोष्टी ठेवण्यासाठी आपल्याकडे किती जागा उपलब्ध आहे?, या वस्तूंची मांडणी केल्यावर बालकांना वावरण्यासाठी, खेळण्यासाठी मोकळी जागा शिल्लक राहते का? या सगळ्यांचा शिक्षकाने व्यवस्थापकाच्या भूमिकेनुसार अभ्यास करायला हवा. प्रत्येक वस्तूला योग्य जागा मिळवून द्यावी आणि बालकांना खेळायला, कृती करायला मोकळी जागा राखून ठेवावी. यासाठी वर्गातील विविध अध्ययन कोपऱ्यांची मांडणीदेखील विचारात घेणे आवश्यक आहे. याविषयी पुढे आपण वर्ग मांडणी या मुद्द्यात सविस्तर माहिती घेऊयात.

६) **वर्गवातावरण :** उजेड भरपूर असावा, हवा खेळती असावी, खेळणी, साहित्य, साधने : वर्गमांडणी करण्याचा जसा विचार केला असेल, त्याप्रमाणे साधन–साहित्याचा उपयोग करण्याचाही अभ्यास करावा लागेल. वर्गात ज्या दिवशी जेवढ्या कृती घडणार आहेत, तेवढेच साधन साहित्य बाहेर काढून ठेवले, तर पसारा होणार नाही. मुक्त खेळ या कृतीच्या वेळात, ज्या दिवशी जी खेळणी द्यायची ठरली असतील, तेवढीच बाहेर काढली जावीत.

**प्रत्येक गोष्टीपर्यंत ताई व बालके यांना पोहोचता येणे :** वर्गामध्ये ज्या गोष्टी वापरायच्या आहेत, त्यांपैकी फक्त अंगणवाडीताईनेच हात लावण्याच्या काही महत्त्वाच्या वस्तू असतात. उदा. रजिस्टर्स. अशा वस्तूंची अभ्यासपूर्वक यादी तयार करून, त्या वस्तूंपैकी रोज काय लागते, क्वचित काय लागते

त्याप्रमाणे हाताशी काय ठेवायचे, मागे काय ठेवायचे याचा विचार करूनच वस्तू मांडाव्यात. ज्या गोष्टी, वस्तू, खेळणी बालके हाताने घेऊ शकतात, त्या वस्तू त्यांच्या त्यांना घेण्याची सवय लावावी व त्याप्रमाणे वस्तूंची मांडणी करावी, कारण बालकांना स्वावलंबी बनवणे हाही एक आपला हेतू असतो.

७) **अंगणवाडीताईच्या हालचाली :** बालकांच्या कृती करण्याच्या वेळेत, ताईच्या हालचाली मर्यादित असाव्यात, नाहीतर बालकांचे कृतीतून लक्ष उडते व ताई काय करत आहेत याकडेच बालके बघत राहतात.

८) **बालकांचे गट :** कृतीनुसार, बालकांच्या वयानुसार बालकांचे गट पाडावेत व कृती करायला द्याव्यात. काही कृती फक्त मोठ्या बालकांनी करण्याच्या व देखरेखीखाली करण्याच्या असतात. त्याकडे अंगणवाडीताईने स्वतः लक्ष द्यावे व लहान बालकांच्या गटाकडे मदतनिसाने लक्ष द्यावे.

९) **वर्गनियम व वर्गशिस्त :** अंगणवाडीत येणाऱ्या बालकांचा वयोगट बोलून, रागावून शिस्त लावण्याचा वयोगट नाही हे लक्षात घ्यावे. त्यांच्याबाबतीत प्रत्येक गोष्ट कृतियुक्त करणे आवश्यक असते आणि यासाठी रंग, चित्र यांचा वापर लागतो. घड्याळात किती वाजले हे बालकांना समजत नाही, पण खेळण्याची वेळ झाली, गोष्ट ऐकण्याची वेळ झाली, गाणी म्हणण्याची वेळ झाली या भाषेत त्यांच्याशी बोलावे.



बालकांचे गट पाडताना रंग, चित्र किंवा प्राणी, पक्षी, कीटक यांच्या नावांचा वापर करून, त्यांचे गट पाडावेत. उदा. फुलपाखरांनी इकडे बसा, मुंग्यांनी इकडे बसा.

सगळ्यांनी जोरात टाळ्या वाजवा, टाळ्यांचा आवाज हळू झाला, की शांत बसा. कोणीही बोलू नका, डोळे मिटून बसा. अशा सूचनांचा वापर करून शिस्त लावावी.

मी हात वर केले, की उठून उभे राहा, हात खाली केले, की खाली बसा, हात बाजूला केले, की गोल/वर्तुळ करा. अशा कृतियुक्त हालचालींतून वर्तन शिस्त, वर्तन नियम समजवावेत.

१०) **बैठक/आसन व्यवस्था :** प्रत्येक कृतीसाठी बालकांच्या बैठक व्यवस्थेकडे नीट लक्ष द्यायला हवे, कारण ताई बालकांशी बोलतात, तेव्हा प्रत्येक बालकाला ताईंचा चेहरा नीट दिसायला हवा, तसेच ताईला प्रत्येक बालकाचा चेहरा दिसायला हवा. ताई काय सांगत आहेत, ते नीट ऐकू यायला हवे. ताई जे दाखवत आहेत, ते प्रत्येकाला एकाच पद्धतीने दिसायला हवे. यासाठी प्रत्येक कृतीच्या आवश्यकतेनुसार ताईने स्वतःची बसण्याची जागा व बालकांनी कसे बसावे, हे कृती सुरू करण्यापूर्वी विशेष गरजा असणाऱ्या बालकांना सांगायला हवे.

बैठक व्यवस्था करताना आपल्याला अजून एक विचार लक्षात घ्यावा लागतो, तो म्हणजे आपल्या वर्गात एखादे विशेष गरजा असणारे बालक असेल आणि त्या बालकाची विशिष्ट बैठक व्यवस्थेची गरज असेल तर

त्या बालकासाठी शक्य असल्यास स्वतंत्र खुर्ची ठेवावी, ताईंच्या जास्त जवळ बसण्याची गरज असेल तर तसे पुढे बसवावे, ताईंच्या अगदी समोर बसवावे म्हणजे त्या बोलत असतील त्यानुसार ओठांची हालचाल लक्षात येईल. एखादे बालक चाकाची खुर्ची घेऊन अंगणवाडीत येत असेल, तर त्या खुर्चीवर बसून त्याला कृती करायला, त्याबद्दल सूचना ऐकायला योग्य अंतरावर बसवावे.

**विविध प्रकारची बैठक व्यवस्था :**

**१) गोष्टी ऐकणे/माहिती ऐकणे/चित्रवाचन**




**२) गाणी म्हणणे/खाऊ खाणे**




**३) सर्जनशील कृती/कलानुभव**




**११) बालकांबरोबर संभाषण :** बालकांबरोबर संभाषण करताना, सूचना देताना उच्चार सुस्पष्ट असावेत. बोलण्याची भाषा सोपी असावी. वाक्ये लहान असावीत. यामुळे गटावर नियंत्रण राहते.

**१२) सभोवतालचा परिसर :** अंगणवाडी भोवतीचा परिसर स्वच्छ, संसर्गविरहित असावा.

**१३) पिण्याचे पाणी :** बालकांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी ठेवलेले असावे. जेथे पाणी ठेवले आहे, तेथील सभोवतालची जागासुद्धा एकदम स्वच्छ असावी.

**१४) बालकांसाठी स्वच्छतागृह :**

१५) **हात–पाय धुण्याची जागा :** हात–पाय धुण्यासाठी बाहेर एक कोपरा असावा. त्याच ठिकाणी हात–पाय धुवावेत. तेथे थोडी झाडे लावलेली असावीत किंवा कुंड्या असाव्यात. त्यामुळे झाडांना आपोआप पाणी मिळेल व परिसर सुशोभित राहील.

या सर्व प्रकारे प्रत्येक बाब लक्षात घेतली आणि कामाचे नियोजन करून पूर्तता केली, की सर्व कामे सुरळीत पार पडतात. यालाच ‘व्यवस्थापन’ म्हणतात.

**वर्गमांडणी :**

वर्गव्यवस्थापनातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे वर्गमांडणी होय. अंगणवाडी वर्ग हे असे ठिकाण आहे, की जेथे ताईचा जास्तीत जास्त वेळ व्यतीत होतो. त्यात तिच्याबरोबर काही वेळा बालके असतात, तर काही वेळा नसतात, तरीही तिला वर्गासाठी काम करावेच लागते. वर्गव्यवस्थापनाचे काम अभ्यासपूर्ण असते. जर जागा मोठी असेल, तर व्यवस्थापन सुलभ होते, परंतु जागा लहान असेल, तर खूप विचारपूर्वक जागेचा वापर करावा लागतो.



वर्गव्यवस्थापनाइतकेच वर्गमांडणीचे काम जिकिरीचे असते. मांडणी, म्हणजेच उपलब्ध जागेचा उत्तमरीत्या वापर करणे. अंगणवाडीत येणाऱ्या बालकांचा सर्वांगीण विकास दर्जात्मक करणे, ही सर्वस्वी ताईची जबाबदारी ठरते. बालकांच्या सभोवतालच्या जगाव्यतिरिक्त अनुभव बालकांना हवेसे असतात. ते अनुभव पुरवणे हे ताईचे कर्तव्यच आहे. असा प्रत्येक अनुभव बालकांच्या ऊर्जेला आव्हान देणारा असला पाहिजे.

३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची काही वैकासिक कार्ये असतात, उदा. समाजात मिसळणे, समाजात स्वतःचे स्थान निर्माण करण्याकडे वाटचाल करणे, स्वनियंत्रण करणे, स्वावलंबी बनणे. अशी कार्ये करता येण्याच्या दृष्टीने वर्गमांडणी करायला हवी. वर्गमांडणी अशी हवी, की त्यातून बालकांच्या गरजा पूर्ण होतील.

बालक ज्या वैकासिक पायरीवर असेल, त्या वैकासिक टप्प्याची ध्येये, वैयक्तिक ध्येये, कार्यक्रमाची ध्येये अशी सर्व ध्येये साध्य करण्यासाठी वर्गमांडणीचे महत्त्व असते.

- कोणत्याही वर्गाची मांडणी, उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधा व साधने यांच्यावर अवलंबून असते.
- वर्गखोलीचे स्वरूप प्रसन्न, अनुभव देणारे व आवड निर्माण करणारे असावे.
- ज्या वयोगटासाठी वर्गखोली मांडली असेल, त्यांच्या दृष्टिकोनातून ती आकर्षक असावी.
- साधेपणावर भर असावा.
- वस्तूंची खूप गर्दी टाळावी, म्हणजे सामानाची दाटी नसली, की बालकेसुद्धा वर्ग व्यवस्थित ठेवतात.
- साहित्य सुसंघटित व सहज घेता–ठेवता येईल अशा पद्धतीने ठेवावे.
- कोणत्याही मांडणीनंतर आंतरक्रिया घडून येईल, इतकी ती लवचीक असावी. संपूर्ण वर्गात आंतरक्रिया घडेल, तसेच वैयक्तिक कामालाही ही मांडणी उपयुक्त ठरावी.
- जागेचे संघटन करत असताना, त्यातून अध्ययन अनुभव घेता येईल. अनुभवात वैविध्य असेल, अशी अध्ययन केंद्रे वर्गात तयार करावीत, म्हणजे बालकांना योग्य संधी मिळेल.

**वर्गमांडणीचे महत्त्व :**

- मांडणीतून बालकांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात.
- हालचालींना मांडणीची मदत होते. जर मांडणी सुयोग्य असेल, तर वेड्यावाकड्या हालचालींना आळा बसतो.
- मांडणीची मदत स्थूल स्नायू कौशल्यांसाठी होते.
- स्वावलंबनाच्या विकासाला मदत होते.
- 'स्व' कल्पना तयार होते.
- बालकांचा स्वतःहून प्रत्येक कृतीत सहभाग वाढतो.
- शालेय वातावरणाची ओळख होते.
- मांडणीतून अध्ययन केंद्रे तयार होतात. बालकाला ते वातावरण ओळखीचे वाटू लागते. त्याला हवी असलेली वस्तू कोठे मिळेल, हे त्याला माहीत असते.
- **अध्ययन कोपरे/अनुभव केंद्र :** अध्ययन कोपरे पुढील विषयांच्या अनुषंगाने तयार करणे आवश्यक असते. भाषा, गणित आणि विज्ञान कोपरा, सर्जनशील कृती/कलेचा कोपरा, ग्रंथालय किंवा वाचन कोपरा, बाहुलीघर, ठोकळे/खेळण्यांचा कोपरा इत्यादी.
- **ग्रंथालय/वाचन कोपरा :** ही जागा वर्गात अतिशय स्वतंत्र असावी. शांत जागी असावी. वाचनाला प्रोत्साहन मिळण्यासाठी पुस्तके आकर्षक असावीत व योग्य तऱ्हेने मांडलेली असावीत.

- **बाहुलीघर :** ज्या ठिकाणी भरपूर दंगा व आवाज असतो अशी ही जागा आहे. नाट्यात्मक खेळासाठी या ठिकाणी संधी मिळते. तेथे बालकांच्या मापाचे फर्निचर, भातुकली (स्वयंपाकाची खेळणी), फोन, आरसा, मऊ खेळणी, विविध प्रकारचे कपडे ठेवलेले असावेत.
- **ठोकळे खेळण्याचा कोपरा :** हा कोपरासुद्धा आवाजाचा व गोंधळाचा असतो. या कोपऱ्यामध्ये देखरेख आवश्यक असते. वाचन कोपऱ्यापासून याची मांडणी दूर असावी.

  घटक ठोकळे (युनिट ब्लॉक्स), पोकळ लाकडी ठोकळे, चाकाची खेळणी, खेळण्यातले प्राणी माणसांच्या आकृत्या, छोटे रंगीत ठोकळे, वेगवेगळ्या आकारांची व आकारमानांची खोकी अशी विविधता असावी.

**घटक ठोकळे**



**छोटे रंगीत ठोकळे**





- **सर्जनशील कृती/कला कोपरा :** काही कला पूर्ण वर्गात कोठेही घेतल्या जातात, पण हात बरबटणाऱ्या कृतींसाठी मात्र पाण्याजवळचीच जागा असावी लागते. लागणारे साहित्य सुसंघटित व सहज घेता-ठेवता येणारे असावे. नव्याने शिकवलेल्या प्रत्येक कृतीसाठी मार्गदर्शन लागते, त्यामुळे या विभागात स्वतंत्र काम करण्यापूर्वी, सर्व बाळांना सर्व साहित्याची ओळख करून दिलेली असावी.



जागा स्वच्छ करण्यासाठी, वापरलेले साहित्य स्वच्छ करण्यासाठी बालकांना अगोदर मार्गदर्शन केलेले असावे.

कलाविभागात पुढील साहित्य असावे जसे : वर्तमानपत्र, मासिकांचे कागद, छोटे कागद, वाया गेलेले कागद (पत्रिकेचे कागद, कॉम्प्युटर छपाईचे एक बाजू कोरी असलेले कागद) रंग, ब्रश, तेलकट खडू, रंगीत पेन्सिल्स, पाट्या, खडू, माती, प्लास्टिसीन, डोव (भिजवलेला मैद्याचा गोळा) कात्र्या, कोलाजचे साहित्य.

- **गणित, भाषा, विज्ञान कोपरा :**

वर्गामध्ये गणित, भाषा, विज्ञान या तिन्हींसाठी स्वतंत्र कोपरे असावेत. जागेची उपलब्धता नसेल, तर आठवड्यातून आलटून पालटून एकेक विषयाचा कोपरा मांडावा. कोपऱ्यासाठी मांडलेले साहित्य हाताळण्याची संधी बालकांना मिळायला हवी.



ते साहित्य वापरण्याच्या दृष्टीने त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. गणित व विज्ञानक्षेत्राबाबत बालकांना प्रयोग करू द्यावे. या कोपऱ्यांमध्ये बालके असतात, तेव्हा त्या ठिकाणी ताईची उपस्थिती आवश्यक असते.

**गणित :** गणित कोपऱ्यात अंकांची चित्रकोडी, काड्या, दगड, बिया, आकार, वजनकाटा (तराजू), वजने भौमितिक आकार, मोजपट्टी, वर्गीकरण साहित्य, नमुना, आकृतिबंध तयार करण्याचे साहित्य, मणी असावे.

**विज्ञान :** लोहचुंबक, भिंग, लोलक, तरंगणाऱ्या बुडणाऱ्या वस्तू, विरघळणारे न विरघळणारे पदार्थ, विज्ञान निगडित पुस्तके, रंग, स्पर्श साहित्य, चवीसाठी साहित्य, क्रमवार विचार करण्यासाठीचे साहित्य असावे.

**भाषा :** शब्दकोडी. चित्रांची पुस्तके, दृक् शब्दसंग्रहासाठी चित्र व शब्द, शिक्षक कविता वाचन, गोष्टवाचन असे साहित्य असावे.

- **खेळणीचा कोपरा :**

खेळणी, हाताळण्याची खेळणी (जोडण्या–तोडण्याची खेळणी) हे सर्वसाधारणपणे मुक्त खेळाच्या वेळी दिले जाते. त्याची मांडणी सहज घेता–ठेवता येणारी व आकर्षक असावी. यामध्ये विविध प्रकारची, विविध रंगांची व आकारांची खेळणी समाविष्ट करावी. उदा. खेळण्यातले प्राणी, माणसांच्या आकृत्या.

**चाकांची खेळणी**



**खेळण्यातील प्राणी**



**माणसांच्या आकृत्या**



**वर्गातील रचना :** वर्गात चालू असलेल्या प्रकल्पानुसार वर्गातील मांडणी करणे जरुरीचे असते. केलेल्या रचनेतून चालू असलेला प्रकल्प, होऊन गेलेला प्रकल्प समजून आला पाहिजे. त्याच्याप्रमाणे बुलेटीन बोर्डवरील (प्रदर्शन फलक) मांडणी, चित्रांची, मोबाइल्स, तक्ते, शेल्फवरील पुस्तके, चित्रतक्ते. मॉडेल्स (प्रतिकृती) यांची रचना केलेली असावी.

आणखी एक महत्त्वाचा घटक वर्गमांडणीमध्ये विचारात घ्यावा लागतो तो म्हणजे

**फर्निचर व साधने :**

- हालचालींना अडथळा येणार नाही अशी मांडणी करावी लागते.
- फर्निचर बहुउद्देशीय असावे.
- एकावर एक रचता येणारे फर्निचर असावे.
- मांडणी सुरक्षित असावी.
- जेव्हा साधने, फर्निचर लागणार असेल, तेव्हा ते सहजपणे घेता येईल अशा पद्धतीने मांडणी असावी.
- ज्या मांडणीतून स्वातंत्र्य व स्वावलंबन रुजवता येईल अशीच मांडणी असावी.

छोटी टेबल्स, खुर्च्या, सतरंज्या, वस्तू ठेवण्यासाठी कपाटे, योग्य प्रकाश या गोष्टी म्हणजे कोणत्याही वर्गमांडणीचा पायाभूत आराखडा आहे.

आपल्याला व्यवस्थापन करता येते आहे का, हे पाहण्यासाठी पुढील पडताळासूची वापरावी.

**वर्गव्यवस्थापन पडताळासूची**

| अ. क्र. | उद्दीपन देणारे खेळसाहित्य | तयारी पूर्ण | तयारी केली नाही |
|---|---|---|---|
| **अ)** | नियोजन | | |
| १) | प्रकल्प नियोजन | | |
| २) | कृती नियोजन | | |
| ३) | गाण्यांचे नियोजन | | |
| ४) | भाषा/गणित/विज्ञान नियोजन | | |
| ५) | सर्जनशील कृती नियोजन | | |
| ६) | मुक्त खेळ नियोजन | | |
| | • वर्गातील मुक्त खेळ | | |
| | • वर्गाबाहेरील मुक्त खेळ | | |

| अ. क्र. | उद्दीपन देणारे खेळसाहित्य | तयारी पूर्ण | तयारी केली नाही |
|---|---|---|---|
| **ब)** | **साहित्याची पूर्वतयारी** | | |
| १) | प्रकल्पासाठी शैक्षणिक साधनांची जमवाजमव | | |
| २) | वर्गमांडणी – सुयोग्य चित्रे, तक्ते, पुस्तके जमवाजमव | | |
| ३) | खेळणी व साधने | | |
| ४) | सर्जनशील कृती साहित्य | | |
| ५) | अध्ययन कोपरे तयारी व मांडणी | | |
| **क)** | **वेळापत्रक** | | |
| १) | वर्गातील व वर्गाबाहेरील खेळांनुसार | | |
| २) | प्रकल्प नियोजनानुसार | | |
| ३) | कृती व उपक्रमांनुसार | | |
| **ड)** | **वर्गमांडणी** | | |
| | • प्रकल्पानुसार चित्र, तक्ते<br>• चित्रांचे मोबाइल | | |
| ५) | बैठकव्यवस्था | | |
| १) | प्रत्येक कृतीनुसार<br>• गाणी<br>• गोष्ट<br>• माहिती | | |
| २) | उदयोन्मुख साक्षरता व भाषासाक्षरता कृती | | |
| ३) | सर्जनशील कृती | | |
| ४) | बैठे खेळ | | |
| ५) | खाऊ खाणे | | |
| **ई)** | **स्वच्छता** | | |
| १) | वर्गाची स्वच्छता | | |
| २) | परिसराची स्वच्छता | | |
| ३) | सतरंज्या, कपाट स्वच्छता | | |
| ४) | पाण्याच्या जागेची स्वच्छता | | |

### अंगणवाडीताईसाठी खूप महत्त्वाचे

- आपण स्वतः बालकांसाठी महत्त्वाची व्यक्ती आहोत हे कायम लक्षात ठेवा.
- स्वतःचे वागणे आदर्श ठेवा, कारण बालके आपले अनुकरण करतात.
- आपला आवाज हे एक साधन आहे, त्याचा योग्य वापर करा.
- बालकांसमोर कलानुभवातील कोणतीही आदर्श वस्तू तयार करून ठेवू नका, कारण बालके त्या कृतीच्या विकासाच्या पायऱ्या पार करत असतात, त्यामुळे तुम्ही दाखवाल ते त्यांना करता येईलच असे नाही.
- बालकांना निरीक्षणाची सवय लावा.
- त्यांच्यासमोर प्रसन्न चेहऱ्याने वावरा, हसतमुख राहा.
- कायम बालके काय बोलत असतात ते पूर्ण ऐकून घ्या, मग त्यांच्या बोलण्यातील चुका दुरुस्त करा.
- बालकांशी बोलताना त्यांच्या डोळ्यांच्या पातळीवर येऊन बोला किंवा काही सांगायचे असेल, तर डोळ्यांच्या पातळीवर या, म्हणजेच गुडघ्यावर बसून बोला.
- आपल्या अंगणवाडीत काही वेळा एखादे बालक विशिष्ट गरजा असणारे असेल, तर ते बालक रोजच्या रोज अंगणवाडीत उपस्थित राहील हीसुद्धा ताईची जबाबदारी असेल.

❖❖❖



# प्रकरण ३. सर्वसमावेशित बालशिक्षण

बालशिक्षणाच्या क्षेत्रात काम करत असताना आपल्यासमोर, अंगणवाडीत वेगवेगळ्या प्रकारची व्यक्तीविशिष्टता असणारी बालके येतात. प्रत्येकाच्या सर्वसामान्य गरजा जरी सारख्याच असल्या तरी प्रत्येक व्यक्तीच्या काही गरजा मात्र वेगवेगळ्या असतात. अशा वेळी समावेशित शिक्षण ही संकल्पना किती उपयुक्त ठरते हे आपण जाणून घेऊ.

प्रथम आपल्याला समावेशनाविषयी माहिती असणे आवश्यक आहे. ज्या बालकांना वगळले जाऊ शकते किंवा दुर्लक्षित केले जाऊ शकते अशा बालकांना मुख्य शिक्षणप्रवाहात प्रवेशाची संधी मिळणे, सर्व संसाधनांचा वापर करण्याची समान संधी मिळणे यासाठी आखलेले धोरण म्हणजेच सर्वसमावेशन होय. बालसंगोपन व प्रारंभिक शिक्षण (ECCE) यामध्ये जन्म ते ६ वर्षे या वयोगटाचा विचार असतो. याच काळात प्रत्येक विकासाचा म्हणजेच सर्वांगीण विकासाचा पाया रचला जातो, ज्यावर बालकाची आयुष्याची जडणघडण अवलंबून असते, म्हणून या काळात बालकाला सकारात्मक अनुभव प्रत्येक टप्प्यावर मिळालेच पाहिजेत तरच त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल, 'स्व'चा विकास होईल.

यासाठी सर्व शिक्षण प्रक्रियेत सर्वसमावेशनाच्या धोरणाची अंमलबजावणी झाली पाहिजे. अंगणवाडीत जर शिक्षणाचा पाया रचला जातो तर अंगणवाडीतही सर्वसमावेशनाचे धोरण राबवले गेले पाहिजे. समावेशनाच्या धोरणामुळे सर्व बालकांना अंगणवाडीत एकत्र खेळण्यास व अध्ययनास मदत होईल.

सर्वसमावेशित शिक्षणामुळे विविध क्षमतांची बालके एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करत आणि एकमेकांकडून अनुभवाने शिकत असतात. हा दृष्टिकोन शिक्षणाची प्रक्रिया अधिक समृद्ध करतो. मुलांना विविधता स्वीकारायला शिकवतो.

**सर्वसमावेशक शिक्षण :**

सोप्या शब्दात सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे एकाच वर्गात आणि एकाच शाळेत एकत्र शिकणारी सर्व प्रकारची बालके. सर्वसमावेशित शिक्षण म्हणजे सर्व बालकांसाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध करणे. प्रत्येक बालक शिकू शकते आणि प्रत्येक बालकाची विशिष्ट वैशिष्ट्ये, आवडी, क्षमता आणि शिकण्याच्या गरजा या वेगवेगळ्या असतात. याचा अर्थ असा की शाळा, बालकाला त्याच्या क्षमता साध्य करताना मदत करण्यासाठी आवश्यक साहाय्य करते.

कोणतेही बालक दुसऱ्यापेक्षा चांगले किंवा वाईट मानले जात नाही. सर्व बालकांना शाळा/अंगणवाडी/बालवाडी येथील उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची समान संधी दिली जाते. सर्व प्रकारच्या विविधतेचा आदर केला जातो. त्यामुळे असे वातावरण देणारी शाळा/अंगणवाडी याला सर्वसमावेशक शाळा/अंगणवाडी म्हणतात.

**वंचितांना साहाय्यभूत ठरणारी धोरणे :** नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार ( NEP 2020), कोणत्याही बालकाने जन्म किंवा त्याच्या पार्श्वभूमीच्या परिस्थितीमुळे शिकण्याची आणि उत्कृष्ट कामगिरी करण्याची संधी गमावू नये असे उद्दिष्ट सुनिश्चित केले आहे.

त्यासाठी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटांवर (SEDGs) विशेष भर दिला आहे. ज्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे.

लिंग ओळख (विशेषतः महिला आणि ट्रान्सजेंडर व्यक्ती), सामाजिक–सांस्कृतिक ओळख (जसे की : अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक), भौगोलिक ओळख खेडे, लहान गाव आणि आकांक्षित जिल्ह्यांतील बालके, शारीरिकदृष्ट्या अक्षम (अध्ययन अक्षमतेसह) आणि सामाजिक आर्थिक परिस्थिती (जसे की : स्थलांतरित समुदाय, कमी उत्पन्न असलेली कुटुंबे, असुरक्षित परिस्थितीतील मुले, तस्करीचे बळी किंवा बळी पडलेली मुले, लहान मुलांसह अनाथ, शहरी भागातील भिकारी आणि गरीब). धोरणातील बहुतांश उद्दिष्टे ही या वंचित घटकांतील बालकांसाठी सर्वसमावेशकता निर्माण करण्याशी निगडित आहेत. पुढे जाऊन हे धोरण विशेष गरजा असलेल्या बालकांना लक्षात घेऊन, त्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षणप्रणालींमध्ये समाविष्ट करण्यावर विश्वास ठेवते. अक्षम व्यक्तींचे हक्क (RPWD) कायदा २०१६ च्या उद्दिष्टांशी हा विचार व्यापकपणे संरेखित करतो.

**लिंगभाव समानता :**

बालक मोठे व्हायला लागल्यावर आपापल्या लिंगभावानुसार वागायला, बोलायला सुरुवात करते. म्हणजे मुलगा ''मी आलो; मी जेवतो.'' असे म्हणते तर मुलगी ''मी खेळते; मी गाणे म्हणते.'' अशी भाषा वापरते; पण कधी कधी बालक लिंगभावाप्रमाणे भाषा वापरत नाही. म्हणजे मुलगा मुलीसारखी ''मी आले'' असे म्हणतो, तर मुलगी मुलासारखे बोलते. अशा वेळी बालकाला न रागावता किंवा त्यांची चूक न दर्शवता ते वाक्य योग्य प्रकारे बोलून त्यांचे बोलणे दुरुस्त करावे. बरेचदा मुलांना भातुकली खेळायला आवडते किंवा मुलीसारखे कपडे घालायला आवडतात. अशा वेळी ते आपल्या आईचे किंवा बहिणीचे अनुकरण करत असतात. मुलांनी क्रिकेटची बॅट, शेतीची अवजारे किंवा इंजिनिअर सेट हीच खेळणी घ्यावी व मुलींनी बाहुल्या आणि भातुकलीच खेळावी अशी अपेक्षा करून त्यांना खेळणी देऊ नये. त्यांना त्यांच्या आवडीनुसार खेळण्यांची निवड करू द्यावी.

**उपरोक्त उल्लेख केलेल्या गटांना समर्थन :**

नमूद केलेल्या गटांतील बहुतेक प्रकारच्या बालकांना अंगणवाडी स्तरावर विशेष हस्तक्षेपाची आवश्यकता नसते. या बालकांसाठी आवश्यक आणि अत्यावश्यक गोष्ट म्हणजे ते अंगणवाडीमध्ये उपस्थित राहतील आणि ते जसे असतील तसे त्यांना स्वीकारले जाईल याची खात्री करणे. त्यांना अध्ययन अनुभवासाठी आणि शैक्षणिक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सर्व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यांच्या बाबतीत

स्वीकृती, सुरक्षितता आणि आदराचे वातावरण असणे आवश्यक आहे. परंतु या अटी असूनही विशेष गरजा असलेली बालके (CWSN) हा असा एक गट असू शकतो ज्यांना त्यांचा समावेश करण्यात मदत करण्यासाठी अतिरिक्त समर्थन किंवा गरजेनुरूप व अनुरूप संसाधनांची आवश्यकता असू शकते किंवा विशेष गरजांच्या गटात त्यांची शारीरिक अक्षमतेची अधिक तीव्रता असू शकते.

**विशेष गरजा असणाऱ्या बालकांचा गट : (CWSN)**

आपल्या सर्वांना माहीत आहे की कोणतीही दोन मुले सारखी नसतात म्हणजेच कोणतीही दोन भावंडे एकसारखी नसतात किंवा कोणत्याही एकाच वयाची बालके सारखी नसतात. त्यामुळे नवीन शिक्षण धोरणानुसार ही तफावत मान्य आहे. ज्यामध्ये बालकांनी त्यांचा स्वतःचा विशिष्ट टप्पा गाठावा अशी प्रत्येक क्षमतेसाठी एक श्रेणीपट्टी दिलेली आहे व त्यानुसार प्रत्येक बालकाने स्वतःच्या क्षमतेचा विशिष्ट टप्पा गाठावा अशी अपेक्षा केलेली आहे.

अशी काही बालके आहेत जी इतर बालकांपेक्षा खूप वेगळी आहेत. काही बालके जी ५ वर्षांची असतानाही बोलत नाहीत किंवा काही बालके वर्षांची असूनही त्यांना चालता येत नाही किंवा काही बालके जी ५ वर्षांची असतानाही हातात कोणतीही वस्तू धरू शकत नाहीत. या बालकांची वाढ आणि विकास अपेक्षेप्रमाणे होताना दिसत नाही म्हणजे त्यांच्या वयानुरूप वाढ आणि विकास दिसत नाही. अशी बालके जन्माला येण्याची विविध कारणे असतात. काही दोष गर्भधारणेदरम्यान निर्माण होतात, काही दोष आनुवांशिक असतात, काही दोष बाळाच्या जन्माच्या वेळी प्रसूती दरम्यानसुद्धा येऊ शकतात. अशा प्रकारच्या अडचणी किंवा फरक जे त्यांच्या दैनंदिन जीवनात व्यत्यय आणतात अशा बालकांना विशेष गरजा निर्माण होतात म्हणून अशा बालकांना विशेष गरजा असणारी बालके (CWSN) म्हटले जाते.

विशेष गरजा असणाऱ्या बालकांना पाहणे, ऐकणे, शारीरिक आणि कारक हालचाली, संवाद साधणे, भाषा किंवा बोधात्मक क्षेत्र यापैकी कोणत्याही क्षेत्रात अडचणी येऊ शकतात. विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी त्यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार दृष्टिदोष, कर्णबधिर, बौद्धिक अक्षमता किंवा वर्तन समस्या, संवाद दोष यांसारख्या संज्ञा वापरल्या जातात. अशा प्रकारचे दिव्यांगत्व असणारी बालके या वर्गात येतात.

अंगणवाडी सेविकांसह पालक, समाज यांची भूमिकाही या बालकांना शाळेत स्वीकृती आणि शक्य तितक्या उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याची आहे.

**सुरुवातीच्या काळात बालकांमध्ये दिसून येणाऱ्या विशेष गरजांचे प्रकार :**

विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या (CWSN) दिव्यांगत्वाचे मानवी हक्क अधिनियम २०१६ नुसार २१ प्रकार सांगितले आहेत. त्यांपैकी काही प्रकारांचा येथे उल्लेख केला आहे.

**अ) बौद्धिक अक्षमता :**

या बालकांना अपेक्षित वेळी विकासाचे टप्पे गाठण्यास विलंब होतो. लहान बालकांना सामान्यतः संप्रेषण (संवाद), नियम समजणे, रांगणे किंवा चालणे यांसारखी शारीरिक कौशल्ये आणि आहार देणे

किंवा कपडे घालणे यांसारख्या दैनंदिन जीवनातील कौशल्यांमध्ये त्रास होतो. अक्षमतेच्या तीव्रतेवर त्याच्या दिव्यांगत्वाची तीव्रता अवलंबून असते.

**ब) स्वमग्नता (ऑटिझम) :**

अशी काही बालके असतात ज्यांना इतरांशी संवाद साधणे कठीण जाते, त्यांना एकटे राहणे आवडते, ते दुसऱ्यांच्या नजरेला नजर देऊ शकत नाहीत, इतरांशी खेळणे त्यांना आवडत नाही. काही वेळा ते बोलतात, पण कोणत्याही आवाजाचे मोड्यूलेशन न करता बोलतात. ही सर्व स्वमग्नतेची (ऑटिझमची) लक्षणे आहेत.

**क) शारीरिक अक्षमता :**

शारीरिक अक्षमता ही अशी स्थिती आहे जी बालकाच्या शारीरिक क्षमतेवर परिणाम करते. बालकाला चालणे, पेन्सिल/खडू हातात धरणे, बसणे, खेळणे, समन्वयीत हालचाल करणे कठीण जात असते. त्यांना बोलण्यातही अडचण येते. तोतरे बोलणे, काही शब्द उच्चारताना अवघड जाणे, अडखळत बोलणे, पूर्ण वाक्य बोलता न येणे, बोलण्यात गोंधळ असणे अशी लक्षणे बोलण्यात अडचण असणाऱ्या बालकांमध्ये दिसतात.

**ड) संवेदन अक्षमता :**

या प्रकारची अक्षमता पंचेंद्रियांशी संबंधित असते. श्रवण, गंध, चव, स्पर्श आणि दृष्टी. एखाद्या बालकास संवेदन अक्षमता असल्यास, याचा अर्थ असा होतो की बालकाला पाहणे, श्रवण किंवा स्पर्श यांचे आकलन होण्यात अडचण आहे. जर बालकाला श्रवणात अडचण येत असेल तर बालकाच्या अध्ययनावर परिणाम होईल. त्याचप्रमाणे दृष्टीदोष असलेल्या किंवा दृष्टी पूर्ण कमी झालेल्या बालकास वर्गात मदतीची आवश्यकता असते.

येथे नमूद करणे महत्त्वाचे आहे की केवळ एका क्षेत्रात अपंगत्व आले म्हणजे बालकाला सर्वच क्षेत्रात अडचणी येतील असे नाही. उदाहरणार्थ, दृष्टिदोष असलेले बालक डोळ्यांनी माहिती मिळवू शकत नाही, परंतु त्याच्या इतर इंद्रियांचा वापर करून ते अध्ययनासाठी सक्षम असेल. हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे की या टप्प्यावर आपण या लक्षणांना रेड अलर्ट म्हणतो. यासाठी ताईने किंवा शिक्षिकेने स्वतःच्या मनाने दिव्यांगत्वाविषयी निदान करणे आणि नावे ठेवणे (लेबलिंग) टाळावे.

**विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे (CWSN) समावेशन करताना घ्यावयाची दक्षता :**

अंगणवाड्यांमध्ये खेळताना, खेळणी देताना, कृती घेताना, उपक्रम करताना काही गोष्टी विशेष गरजा असणाऱ्या बालकांचा विचार करून काही अनुरूप बदल करावेत. विशिष्ट परिस्थितीतून येणाऱ्या, अक्षम बालकांना मदत करण्यासाठी या सूचना अतिशय उपयुक्त ठरतील.

रोजच्या साध्या खेळण्यांशी खेळताना साधे रूपांतरदेखील विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी (CWSN) उपयुक्त ठरेल.

- खेळण्यांना मोठी बटणे किंवा साधे लीव्हर/खटके ठेवावे ज्यामुळे खेळणी सक्रिय करण्यासाठी कठीण आणि गुंतागुंतीच्या हालचालींची आवश्यकता नाही.
- खेळण्यांवर सहज पकड बसण्यासाठी/पकडण्यासाठी मोठे हँडल असणे विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी उपयुक्त ठरते.
- खेळण्यांच्या पृष्ठभागावर हात अडकवण्यासाठी पट्टा असावा.
- खेळणी स्थिर ठेवण्यासाठी त्याच्या खाली वेल्क्रो जोडावे.
- दृष्टिदोष असलेल्या बालकांसाठी चेंडूमध्ये आवाज जोडणे किंवा उपक्रमामध्ये आवड नसलेल्या बालकांसाठी पर्याय म्हणून वापरणे.
- एखादी वस्तू प्रकाशित होण्यासाठी किंवा त्यातून आवाज येण्यासाठी बटण दाबायला द्यावे. अंगणवाडीत दृक्साधनांचा वापर करताना दृष्टिदोष असणाऱ्या बालकांसाठी त्या माध्यमाला श्रवण साधनाची जोड दिल्यास व तो मजकूर श्राव्य केल्यास दृष्टिदोष असणाऱ्या बालकांचे समावेशन करणे सोपे होईल.
- चेंडू, क्यूब्स, ठोकळे यांच्यावर वेगवेगळे पोत आणि आकार असल्याची खात्री करून घ्यावी. (मात्र त्यामुळे कोणतीही दुखापत होऊ नये, तीक्ष्ण टोके, कडा नसावे.)
- खेळणी, साधने यांचे रंग चमकदार व विरोधी रंगयोजनेतील असावेत. (सुरक्षित, विषारी नसलेले रंग असावेत.)
- न तुटणारे, मजबूत आणि वास्तववादी साहित्य आणि साधने, खेळणी असावीत. त्यामुळे हाताळण्यास सोपे जाईल. (भातुकली, टूल सेट, बाहुल्या आणि कठपुतळी बाहुल्या)
- विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी (CWSN) चित्र, पुस्तके हाताळण्यास सोपी जावीत म्हणून पुस्तके आणि चित्रकार्डे जाड कागदावर असावेत.
- विशेष गरजा असलेल्या बालकांना बुटाच्या लेस किंवा झिपर बांधण्यासारख्या कामांमध्ये निपुणता आणण्यात त्रास होऊ शकतो. बेल्ट, बक्कल, झिपर्स आणि बटण लावणे अशा कृती करण्याचे बोर्ड लावल्याने सर्व बालके त्यात व्यस्त होतील व सातत्याच्या सरावामुळे पुढे स्व – मदत कौशल्यांसाठी त्यांना उपयोग होईल.
- वेगवेगळ्या पोतांचे स्पर्शक्षम मार्ग अंगणवाडीत तयार केले तर विशेष गरजा असलेल्या बालकांना (CWSN) संवेदीकारक अनुभव मिळेल, तसेच त्यावरून चालताना संतुलन आणि समन्वय साधण्यास मदत होईल. हे सर्व बालकांसाठी मनोरंजकही ठरेल.

**जागतिक आरोग्य संघटनेने बालकाच्या विशेष गरजा जाणून घेण्यासाठी छाननी चाचणी (स्क्रीनिंग टेस्ट तयार केली आहे त्यासाठी दहा प्रश्नांची तपाससूची (चेकलिस्ट) तयार केली आहे.**

अंगणवाडीत जर थोडे वेगळे दिसणारे मूल असेल, तर याचा आधार घेऊनच त्या बालकाबद्दल थोडे अधिक जाणून घेण्यास मदत होईल.

**जागतिक आरोग्य संघटनेच्या दहा प्रश्नांची यादी**

१) इतर बालकांच्या तुलनेत बालकाला बसण्यात, उभे राहण्यात किंवा चालण्यात काही लक्षणीय विलंब होत आहे का?

२) इतर बालकांच्या तुलनेत बालकाला दिवसा किंवा रात्री दिसण्यास अडचण येते का?

३) बालकाला ऐकण्यास त्रास होत आहे का?

४) तुम्ही बालकाशी बोलत आहात आणि त्याला बोललेले समजत नाही, असे आढळून येते का?

५) बालकाला चालण्यात किंवा हात हलविण्यात अडथळे येतात का? किंवा त्याच्या हातामध्ये किंवा पायामध्ये सुलभ हालचाल जाणवते का? त्यांचे हात किंवा पाय यांमध्ये दुर्बलता किंवा ताठरता जाणवते का?

६) बालकाला फीट येणे, शरीर ताठ होणे, शुद्ध जाणे असे घडताना दिसून येते का?

७) बालक त्याच्या वयाच्या इतर बालकांप्रमाणेच कृती शिकू शकते का?

८) बालक बोलू शकते का? (बालकाचे शब्द इतरांना समजतात का? बालक समजण्याजोगे शब्द वापरते का?)

९) ३ ते ९ वर्षांतील बालकाचे बोलणे कोणत्याही प्रकारे सर्वसामान्य बालकांपेक्षा वेगळे आहे का? (उदा., बालकाचे बोलणे कुटुंबातील जवळच्या व्यक्तींव्यतिरिक्त इतरांना स्पष्टपणे समजत नाही.)

२ वर्षांचे बालक किमान एका वस्तूचे नाव सांगू शकते का? (उदा., प्राणी, खेळणे, कप, चमचा इ.)

१०) बालक त्याच्या वयाच्या इतर बालकांच्या तुलनेत निस्तेज किंवा मंद दिसते का?

**अंगणवाडीतील सर्वसमावेशनाचे फायदे :**

१) सर्व मुलांना योग्य विकासाच्या संधी मिळतात.

२) सर्वांगीण विकास सुनिश्चित होतो.

३) बालकांचा शालेय शिक्षणात प्रवेश अधिक चांगला होतो.

४) दिव्यांग मुलांमध्ये आत्मविश्वास आणि क्षमता वाढवण्यास मदत होते.

५) लिंग भेदभाव कमी करण्यास मदत होते.

सरकार आणि स्थानिक प्रशासनाद्वारे सर्वसमावेशक अंगणवाडी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध धोरणे आणि उपक्रम राबवले जातात.

**विशेष गरजा असलेल्या बालकांच्या समावेशनाचे महत्त्व :**

१) **प्रारंभिक हस्तक्षेप :** विशेष गरजा असलेल्या बालकांना लहान वयातच ओळखणे आणि त्यांच्या गरजेनुसार त्यांना मदत करणे, शैक्षणिक आणि सामाजिक जीवनात सहभागी होण्यासाठी महत्त्वाचे असते.

२) **समता आणि न्याय :** प्रत्येक बालकाला समान संधी मिळणे हे त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. अंगणवाड्यांमध्ये विशेष गरजा असलेल्या बालकांचा समावेश केल्याने सर्व बालकांना समान हक्क आणि सेवा मिळण्यास मदत होते.

३) **समुदायाची भूमिका :** अंगणवाड्या/बालवाड्या या त्या त्या भागातील समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहेत. त्यामुळे विशेष गरजा असलेल्या बालकांच्या पालकांनाही समाजाच्या मदतीने त्यांच्या पाल्यांची काळजी घेण्यास प्रोत्साहन मिळते.

४) **शिक्षकांमध्ये जाणीव जागृती :** विशेष गरजा असलेल्या बालकांच्या गरजा ओळखण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये जाणीवजागृती निर्माण करणे आवश्यक असते.

**समावेशनात येणाऱ्या अडचणी :**

१) **संसाधनांची कमतरता :** विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी अंगणवाड्यांमध्ये अद्ययावत सुविधा आणि उपकरणांची गरज आहे, जे अजून सर्व ठिकाणी फार प्रमाणात उपलब्ध नसते.

२) **तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता :** अंगणवाड्यांमध्ये तज्ज्ञांचा सल्ला आणि मार्गदर्शन उपलब्ध असणे आवश्यक आहे, ते वेळोवेळी मिळत राहिले पाहिजे.

३) **जाणीवजागृतीचा अभाव :** विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांना त्यांच्या पाल्यांच्या हक्कांबद्दल आणि उपलब्ध सेवांबद्दल योग्य माहिती नसणे ही मोठी समस्या आहे.

**उपाय :**

१) **आवश्यक संसाधनांची उपलब्धता करणे :** अंगणवाड्यांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी आवश्यक असलेल्या उपकरणांची आणि सेवांची व्यवस्था करणे.

२) **विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जाणे :** अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना नियमितपणे विशेष मुलांच्या गरजांबद्दलचे प्रशिक्षण देणे.

३) **पालकांसाठी जागरूकता कार्यक्रम :** विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या पालकांना योग्य माहिती देण्यासाठी आणि त्यांना उपलब्ध सेवांचा लाभ घेण्यासाठी समुदाय स्तरावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.

**सर्वांत महत्त्वाचे :**

**पालक व समुदायाचा सहभाग :**

यशस्वी समावेशनासाठी संपूर्ण समाजाचा पाठिंबा असणे आवश्यक आहे. जेव्हा विशेष गरजा असणारी बालके असतात तेव्हा अंगणवाडीमध्ये त्याची स्पष्टता आवश्यक असते. अशा वेळी पालक, आशा वर्कर्स किंवा समुदायातील तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ असावे. बालकाला त्याच्या क्षमतेनुसार जास्तीत जास्त कार्य करण्यास मदत करण्यासाठी संघटीत दृष्टिकोन आवश्यक आहे. याचा अर्थ असा नाही की बालकाबद्दल चर्चा केली जाऊन त्याला नावे ठेवली जावीत. याचा अर्थ असा आहे की, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा बालकासाठी योग्य लोकांची मदत घेणे सहज शक्य होईल.

❖❖❖

## प्रकरण ४. बालशिक्षणाची दिनचर्या (वयोगट ३ ते ६ वर्षे)

अंगणवाडीतील दररोज घ्यावयाच्या कृती, म्हणजेच अंगणवाडीतील दिनचर्या ही वेळापत्रकात दर्शवण्यात आलेली आहे. कृतींचे वेळापत्रक हे नियोजन, व्यवस्थापन यादृष्टीने आपल्याला दिशादर्शक असते. अभ्यासक्रमाचे परिवर्तन करणारे दिशादर्शक व पथदर्शक असणारे नियोजन म्हणजे 'वेळापत्रक'.

शिक्षिकांपर्यंत अभ्यासक्रम नियोजनपूर्वक व पूर्वतयारीनिशी पोहोचवण्याचे काम वेळापत्रक करत असते. त्यामध्ये शिक्षिकांनी करावयाच्या कृती व बालकांनी करावयाच्या कृती यांचा समावेश असतो. वेळापत्रक हे एक प्रकारचे घड्याळच आहे असे म्हणावे लागेल. वेळापत्रक हे एक साधन आहे.

**वेळापत्रकाची मूल्ये :**

१) शाळेचे काम क्रमवार व सहजतेने होण्यास मदत होते.

२) वेळेची व ऊर्जेची बचत व्हायला मदत होते.

३) श्रमाची योग्य विभागणी होण्यास मदत होते.

४) बालकांच्या अवधानकक्षेनुसार सर्व कृतींची व वेळेची विभागणी करता येणे शक्य होते.

५) बालकांच्या गरजांनुसार वेळेचे समायोजन करता येते.

६) बालकांना शिस्तीच्या चांगल्या सवयी लावण्यास मदत होते.

७) पुढे जाऊन असणाऱ्या औपचारिक शिक्षणाची पूर्वतयारी होते.

त्यामुळे चांगले वेळापत्रक नुसत्या कृतींना प्राधान्य देते असे नाही, तर त्याची परिणामकारकता सिद्ध करते. त्यामुळे वेळापत्रक खूप काटेकोर न करता, त्यामध्ये लवचीकता असावी, कारण काही गरजा व बदलती परिस्थिती यांमुळे केलेल्या नियोजनात बदल करावा लागतो.

या हस्तपुस्तिकेत दिलेले वेळापत्रक पाहिले असता, काही महत्त्वपूर्ण बाबी आपल्या लक्षात येतील; ज्या प्रत्येक दिवसासाठी काही प्रमाणात सारख्याच आहेत. यामध्ये दररोज बालकांचे करावयाचे स्वागत, वर्गाबाहेरील मुक्त खेळ, परिपाठ, वर्गातील मुक्त खेळ आणि दररोज अंगणवाडी सुटण्यापूर्वी दिवसभरात कृतींचा मागोवा किंवा आढावा, तसेच अंगणवाडीतील बालकांना रोजच गाणी आणि गोष्टी यांची मेजवानी या बाबी असतात. अशा वेळी या सर्व कृती दररोज घेताना घ्यावयाची दक्षता व या कृतींचे महत्त्व जाणून घेऊया.

**अ) स्वागत :**

बालकाच्या अंगणवाडीतील दिवसाची सुरुवात आनंदी आणि तणावमुक्त वातावरणामध्ये झाल्यास, ते सर्व उपक्रमांमध्ये मनापासून रमते व नवीन संकल्पना आत्मसात करण्यासाठी उत्सुक होते. त्यासाठी अंगणवाडीताईने प्रत्येक बालकाचे नाव घेऊन, बालकाला ते कसे आहे ते विचारावे. हे विचारताना

बालकाच्या नजरेला नजर मिळवावी, चेहऱ्यावर हसरे भाव ठेवावेत. काही बालकांना स्वागत करताना ताईने जवळ घेतलेले आवडते. उदा. हस्तांदोलन करणे, जवळ घेणे, पाठीवर थोपटणे, टाळी देणे, तर काही बालकांना फक्त शाब्दिक माध्यमातून स्वागत केलेले आवडते. बालकांना नेमके काय आवडते ते लक्षात घेऊन, ताईने बालकांचे आपुलकीने स्वागत करावे. आपली अंगणवाडीमध्ये येण्याची दखल घेतली जात आहे, आपल्या येण्यामुळे ताईंना आनंद झाला आहे, हे बालकाला समजणे महत्त्वाचे आहे.

- बालकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होते व पुढे काय घडणार आहे याचा अंदाज त्यांना येतो. सर्व वयोगटातील बालकांना एकत्र येऊन काही कृती करता येतात.
- एकत्र हसणे, गप्पा, गाणी या माध्यमातून सर्वांगीण विकास साधला जातो.
- सर्व बालके एकत्र असल्याने, त्यांच्यामध्ये आपण एका गटाचे सदस्य आहोत, एकमेकांशी जोडलेले आहोत हा दिलासा आणि सुरक्षितता देणारी भावना निर्माण होते.

या स्वागत कालावधीमध्ये पुढील उपक्रम घेतले जावेत –

१) **स्वच्छता आणि स्वास्थ्य तपासणी :** प्रत्येक बालक स्वच्छ दात घासून व अंघोळ करून आले आहे ना, याची खात्री करावी, तसेच बालकांची नखे, केस, डोळे, दात, त्वचा स्वच्छ आहे याची खात्री करावी. सर्दी, ताप, खोकला किंवा एखादा त्वचाविकार, यांमुळे एखादे बालक बाधित आहे का ते तपासावे. एखादे बालक अस्वच्छ असल्यास मदतनीसच्या मदतीने त्याला स्वच्छ करावे. शरीर स्वच्छतेचे महत्त्व बालकांना सांगावे व पुढच्या पालकसभेमध्ये या विषयावर चर्चा करावी. बालकाला सर्दी किंवा खोकला झाल्याचे दिसून आल्यास, त्याला इतर बालकांपासून शक्य तितके दूर ठेवावे. अशा बालकांच्या पालकांना त्यांना आरोग्यकेंद्रात जाण्यास किंवा आशा सेविकेचा सल्ला घेण्यास सांगावे.

२) **चेतना व्यायाम/योगासने (कृती क्र. १२३) :** अ) अंगणवाडीतील दिवसाची सुरुवात व्यायामाने केल्यास, बालकांना दिवसभर ताजेतवाने वाटते व रक्ताभिसरण योग्य प्रकारे होऊ लागते, तसेच श्वसनाचे व्यायाम (ओंकार, दीर्घश्वसन), योगासने यांमुळे त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर सकारात्मक परिणाम होतो. बालकांच्या ऊर्जेला समाजमान्य मार्गाने मोकळीक दिली पाहिजे. यासाठीच एक दिवसाआड चेतना व्यायाम व योगासने घेण्यात यावीत. हात वर–खाली करणे, शरीराला ताण देणाऱ्या हालचाली, पायांच्या विविध हालचाली, शरीर पुढे–मागे वाकवणे असे व्यायामाचे प्रकार घ्यावेत. योगासने घेताना मात्र तज्ज्ञव्यक्तींचा सल्ला घेऊनच, सोपे प्रकार बालकांकडून करून घ्यावे. यामध्ये सूर्यनमस्कार, पद्मासन आणि तज्ज्ञ सांगतील ते व्यायामाचे प्रकार यांचा समावेश असावा. ब) आपल्या अंगणवाडीत विशेष गरजा असणारे बालक असेल तर आणि वर्गातील सर्वच बालकांच्या दृष्टीनेसुद्धा अजून एक बदल आपण दैनंदिनी सांगण्याच्या मजकूरामध्ये करू शकतो. तो म्हणजे मजकूराला अनुसरून जिथे शक्य आहे तेथे चित्रांचा वापर करावा म्हणजे मजकूराला अर्थपूर्णता येईल व सर्वांनाच समजायला सोपे जाईल.

३) **उपस्थिती नोंद :** दैनंदिन उपक्रमांना सुरुवात करण्याअगोदर बालकांची उपस्थिती नोंदवावी. यातून बालकाला अंगणवाडीमध्ये आपल्या येण्याची दखल घेतली जात आहे हे समजतेच, शिवाय एखादे बालक नियमितपणे येत आहे ना ते लक्षात येते. ताईंनी उपस्थितीची नोंद आपल्या रजिस्टरमध्ये करण्याबरोबरच, एक मोठे उपस्थितीपत्रक वर्गात ठेवून त्यावर सही करावी, मदतनिसांना सही करायला सांगावे, तसेच बालकांना स्वलिपीमध्ये रोज सही करायला सांगावे. यातून बालकांना स्वतःचे व इतरांचे नाव ओळखता यायला लागते व लिपी परिचय होतो, तसेच त्यांचे नाव रोज पुकारले जाणे व त्यांनी ताई व मदतनिसांप्रमाणे सही करणे यातून त्यांची स्वतःबद्दलची प्रतिमा सकारात्मक बनत जाते. अंगणवाडीमध्ये किती बालके आली आहेत ते मोजावे व त्यांना सांगावे. पुढे बालकांना मोजणी यायला लागल्यावर त्यांना उपस्थित बालकांची संख्या मोजण्यास उद्युक्त करावे.

**ब) वर्गाबाहेरील खेळ (कृती क्र. ५३.१, ६५, ७२ आणि १२१ ते १३०) :**



अंगणवाडीतील दैनंदिन उपक्रमांमध्ये, वर्गाबाहेरील वैयक्तिक आणि सामूहिक खेळ यांचा समावेश होतो. बालकांना वर्गाबाहेर किंवा मैदानामध्ये रोजच्या रोज काही कालावधी खेळण्यासाठी द्यावा, त्यामुळे त्यांना सभोवतालचे निरीक्षण करण्याची, गटामध्ये खेळण्याची, एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळते. मैदानावरील झोपाळा, घसरगुंडी, जंगलजीम ही साधने वापरण्याबरोबरच, पकडापकडी, लंगडी यांसारखे खळे ताईंनी बालकांकडून खेळून घ्यावेत. खेळांमुळे मनोरंजनाबरोबरच पुढील गोष्टी साध्य होतात –

- **शारीरिक विकास :** उड्या मारणे, धावणे, लटकणे, एका/दोन पायांवर तोल सावरणे, चढणे, उतरणे यांसारख्या शारीरिक कृतींमुळे बालकांच्या शारीरिक क्षमता, स्थूल स्नायू, पद–नेत्र समन्वय यांचा विकास होतो.
- **सामाजिक कौशल्ये :** मैदानावरील घसरगुंडी, झोपाळे या साधनांच्या संख्येच्या तुलनेत, बालकांची संख्या बरीच जास्त असते. त्यामुळे बालकांना आपली पाळी येईपर्यंत वाट पाहावी लागते. या साधनांवर खेळण्यातून, तसेच इतर सामूहिक खेळांमधून खेळाचे नियम पाळणे, सहकार्य, सामोपचाराने मतभेद सोडवणे, एकमेकांशी संवाद साधणे, एकमेकांची काळजी घेणे, संघभावना, नेतृत्वगुण या सामाजिक कौशल्यांचा विकास होतो.
- **बोधात्मक आणि भावनात्मक विकास :** खेळाचे नियम समजून घेताना, आधी शिकलेले नियम समजून, त्याप्रमाणे खेळताना बालकांची तर्कबुद्धी विकसित होते, कार्यकारणभाव समजून घेण्याची इच्छा निर्माण होते. खेळताना कुतूहल पूर्ण करण्यासाठी ते प्रश्न विचारणे, दिसणाऱ्या वस्तू हाताळून बघणे, प्रयोग करणे इत्यादी विविध गोष्टी करतात. त्यातूनही त्यांची तर्कबुद्धी विकसित होते;

त्यांना कार्यकारणभाव समजतो. निसर्गाच्या सान्निध्यामुळे ताण नाहीसा होतो आणि नंतरच्या बैठ्या सत्रामध्ये बालके अधिक आवडीने व एकाग्रतेने सहभागी होतात.

**वर्गाबाहेरील खेळामध्ये अंगणवाडीताईंची भूमिका :** बालके वर्गाबाहेर दोन प्रकारचे खेळ खेळतात. ताईंनी सांगितलेले संरचित खेळ व मुक्त खेळ.

१) **अंगणवाडीताई दिग्दर्शित/संरचित खेळ :** अंगणवाडीताई विशिष्ट कौशल्ये किंवा अध्ययन निष्पत्तींवर आधारित वर्गाबाहेरील खेळ आयोजित करू शकतात. यामध्ये पकडापकडी, छोटे उंदीर–मोठे उंदीर, डोंगराला आग लागली पळाऽऽ पळाऽऽ यांसारखे संरचित खेळ, तसेच बॅट–बॉल यांसारखी विविध साधने घेऊन खेळण्याचे खेळ यांचा समावेश असू शकतो. स्थानिक परिस्थिती व उपलब्ध साधने यांनुसार या खेळांमध्ये बदल होऊ शकतो.

२) **मुक्त खेळ :** ताई काही वेळा केवळ काही साधने उपलब्ध करून देऊन किंवा साधनांशिवायही मुक्तपणे खेळण्याची संधी बालकांना देऊ शकतात. बालके त्यांच्या आवडीप्रमाणे खेळतात. अशा प्रकारचे स्वातंत्र्य बालकांना दिल्यास त्यांच्यामध्ये सर्जनशीलता आणि निर्णयक्षमता या कौशल्यांचा विकास होतो. बालके अशा प्रकारे खेळत असताना, नवीन खेळ शोधून काढतात, त्यांचे नियम तयार करतात, उपलब्ध साहित्यांमध्ये काही बदल करून हवे असणारे साहित्य तयार करतात. अशा वेळी ताईंनी बालकांचे निरीक्षण करावे, त्यांच्याशी बोलून ते काय आणि कसे खेळत आहेत, हे समजून घ्यावे. अशा वेळी बालकांनी जर मदत मागितली तर द्यावी.

वर्गाबाहेरील खेळ घेताना अंगणवाडी ताईंनी काही बाबींबाबत सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. विशेषतः बालकांच्या सुरक्षिततेचा विचार करून, ती जिथे खेळत आहेत ते ठिकाण सुरक्षित आहे ना, जवळपास काही टोकदार कोपरे, गंजलेली दारे, खिडक्या नाहीत ना यांची खातरजमा करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बालके ज्या साधनांचा खेळण्यासाठी वापर करत आहेत, ती साधने : घसरगुंडी, झोपाळा सुरक्षित आहे ना याचा विचार करावा. बालके खेळत असताना काही अपघात होऊ नये म्हणून ताईंनी सजग असणे आवश्यक आहे. वर्गाबाहेरील खेळ खेळताना ताईंनी पुढील मुद्दे लक्षात ठेवावेत –

- सर्व बालकांना खेळण्यासाठी पुरेसे साहित्य असल्याची खात्री करावी. साहित्य कमी असल्यास बालकांना खेळण्यासाठी अनुक्रम लावण्यास मदत करावी.
- बालकांबरोबर स्वतः खेळावे.
- प्रत्येक बालकाला त्याच्या क्षमतेनुसार खेळात सहभागी होण्यास प्रोत्साहित करावे.
- दिव्यांग बालकांना त्यांच्या क्षमतेनुसार कोणत्या ना कोणत्या खेळामध्ये सामील करून घ्यावे,

मात्र त्यांच्या शारीरिक अवस्थेमुळे तो खेळ खेळताना त्याला ताण येत नाही याची खात्री करावी.

- एखाद्या बालकाला एकटे खेळायचे असल्यास, त्याच्यावर गटात खेळण्याची सक्ती करू नये.

**काही अंगणवाड्यांमध्ये बाहेर पुरेशी जागा नसते. अशा वेळी पुढील उपाय योजावेत :**

- वर्गातील जास्तीत जास्त जागा रिकामी करून, वर्गातच तालावर हालचालींसारखे खेळ घेता येतील.
- कमीत कमी जागा लागणारे खेळ खेळण्यास बालकांना उद्युक्त करावे – यांमध्ये कृतियुक्त बडबडगीते, इतरांच्या नकला यांसारख्या कृती घेता येतील.
- पकडा–पकडी, लपंडाव यांसारखे खेळ कमी जागेत घेण्याचा प्रयत्न करावा.

**क) परिपाठ :**

परिपाठ हा बालशिक्षणाच्या दिनचर्येतील एक महत्त्वाचा घटक आहे. बालके शाळेत आल्यावर त्यांच्या दिवसाची सुरुवात काही ठरावीक बाबींनी केल्यास, त्यांना त्याचा फायदा होतो. परिपाठाअंतर्गत झालेला संवाद, ऐकलेल्या बोधप्रद गोष्टी, रोजच्या रोज केलेली काही गोष्टींची उजळणी हे सर्व आयुष्यभर लक्षात राहणारे असते. परिपाठात घेतल्या जाणाऱ्या गोष्टींचा चारित्र्य, मानसिकता आणि बालकांचा सर्वांगीण विकास घडवण्यात अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. शैक्षणिक उत्कृष्टतेच्या पलीकडे, नैतिक तत्त्वे, नैतिक सद्गुण आणि जीवनात गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या गोष्टी बालकांमध्ये नकळतपणे रुजतात.

शाळेत आलेली बालके ही वर्गाबाहेर मुक्त खेळ खेळून, आपली ऊर्जा खर्च करून आलेली असतात. आता वर्गात ती नवीन गोष्टी शिकण्यासाठी बसू शकतात. अशावेळी दिवसाची सुरुवात परिपाठाने झाल्यास बालकांना शांत बसणे, प्रार्थना करणे यांमुळे शांततेचा अनुभव मिळणे शक्य होते, यासाठी परिपाठात बालकांकडून प्रार्थना, डोळे मिटून शांत बसणे, प्राणायाम या बाबी करून घेण्यात याव्यात. याबरोबरच, आजचे दिनमान, सण–उत्सव साजरे करणे, हवामान, थोरा–मोठ्यांच्या जयंती, पुण्यतिथी साजऱ्या कराव्यात.

**१) आजचे दिनमान :** बालकांना दररोजची तारीख, वार, महिना व वर्ष दिनदर्शिकेमध्ये दाखवून, ते तोंडी सांगावे. दिनदर्शिकेमधील कार्डे बदलून आज कोणता वार आहे? काल कोणता वार होता? उद्या कोणता वार असेल? अशा प्रकारचे प्रश्न बालकांना विचारावेत. यातून बालकांची ‘काल’ विषयक समाज विकसित होते. तसेच एखाद्या विद्यार्थ्यांचा वाढदिवस असेल, तर फळ्यावर ‘आजचा वाढदिवस’ असे लिहून, पुढे त्या बालकाचे नाव लिहावे व त्याला शुभेच्छा द्याव्यात.

२) **दैनंदिनी सांगणे :** दिवसभरामध्ये तुम्ही कोणते उपक्रम घेणार आहात, हे रोजच्या रोज एका फळ्यावर लिहावे व बालकांना वाचून दाखवावे. त्यामुळे अंगणवाडीमध्ये एक नियोजन असते व रोज त्याच क्रमाने उपक्रम होतात हे बालकांना समजते. यातून बालकांची औपचारिक शिक्षण घेण्याची तयारी होत जाते, तसेच दैनंदिन जीवनातील दिनक्रम असण्याचे महत्त्व बालकांना समजते. यातून लिपीचा परिचय हा उदयोन्मुख साक्षरतेचा एक भाग बालकांपर्यंत पोहोचत असतो. लिहिलेल्या मजकुराचा काही एक अर्थ असतो आणि त्या अर्थानुसार कृती घडतात हे बालकांना समजते.

आपल्या अंगणवाडीत विशेष गरजा असणारे बालक असेल तर आणि वर्गातील सर्वच बालकांच्या दृष्टीनेसुद्धा अजून एक बदल आपण दैनंदिनी सांगण्याच्या मजकुरामध्ये करू शकतो. तो म्हणजे मजकुराला अनुसरून जिथे शक्य आहे तेथे चित्रांचा वापर करावा म्हणजे मजकुराला अर्थपूर्णता येईल व सर्वांनाच समजायला सोपे जाईल.

३) **हवामान तक्ता भरणे :** रोजचे हवामान कसे आहे, ढगाळ आहे, की लख्ख सूर्यप्रकाश पडला आहे, वारा वाहतो आहे का याचे बालकांना निरीक्षण करण्यास सांगावे व त्याप्रमाणे त्यांच्याकडून हवामान तक्त्यांमध्ये नोंद करून घ्यावी. यामुळे बालके निरीक्षण करायला, त्याबाबत बोलायला आणि त्याची नोंद करायला शिकतात, तसेच ती निसर्गाशी जोडली जातात.

४) **मुक्त गप्पा (कृती क्र. १४९) :** अंगणवाडीमध्ये आल्यावर आपण काल घरी काय केले, आज सकाळपासून काय घडले, अंगणवाडीमध्ये येताना काय पाहिले हे सांगण्याची उत्सुकता बालकांमध्ये असते. हे सांगण्याची संधी अंगणवाडीमध्ये आल्यावर लगेचच मिळण्याची आवश्यकता असते.



'मुक्त गप्पा' या सत्रात जी बालके जास्त बोलकी असतात ती एकदम बोलायला सुरुवात करतात. अशा वेळी लाजाळू बालके, विशेष गरजा असणारी बालके मागे पडू शकतात. अशा वेळी अंगणवाडीताईने या बालकांना चित्रे दाखवून, स्वतंत्रपणे प्रश्न विचारून या बालकांना बोलते करावे व त्यांनाही बोलण्याची संधी मिळेल असे पाहावे.

५) **सण-उत्सव (कृती क्र. ८८) :** सण म्हणजे, विविध प्रकारच्या संस्कृतींचे प्रतीक असते. सर्व समाजांमध्ये काही सण सारखेच असतात, तर काही सण विशिष्ट समाजाचे असतात. अंगणवाडीमध्ये आपण विविध समाजाच्या संस्कृतींची बालकांना ओळख करून देतो. त्यासाठी अंगणवाडीमध्ये सर्व प्रमुख सण साजरे केले जातात. यातून इतरांचा आदर करणे हे मूल्य रुजवले जाते. संपूर्ण वर्षभरात आपल्या देशात विविध सण व उत्सव साजरे केले जातात. सण-उत्सव हे निसर्गाचे

आभार मानणे, देशभक्तीची भावना रुजवणे, आपल्या संस्कृतीची जाण निर्माण करणे यांसाठी साजरे केले जातात.

अ) **ऋतुमानानुसार सण-उत्सव :** निसर्गात होत जाणाऱ्या बदलांनुसार हे सण साजरे केले जातात. उदा. कोजागिरी पौर्णिमा, चैत्रपाडवा.

ब) **धार्मिक सण-उत्सव :** प्रत्येक धर्म व समाजाच्या प्रथेनुसार, हे सण-उत्सव साजरे केले जातात. उदा. नवरात्र, रमजान ईद.

क) **राष्ट्रीय सण :** प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्यदिन, राष्ट्रीय नेत्यांची जयंती व पुण्यतिथी या संदर्भात दिली जाणारी माहिती अत्यंत सोप्या स्वरूपात असावी.

बालकांच्या आकलन पातळीनुसार माहिती दिली जावी.

**सण-उत्सव साजरे करण्याच्या पद्धती :** सण-उत्सव साजरे करण्यामागे मनोरंजन हा एकच हेतू नसून, इतरही अनेक हेतू मनात धरलेले असतात. ते हेतू साध्य करण्यास विविध पद्धती वापरल्या गेल्या पाहिजेत.

- सण-उत्सवाचे नियोजन करताना, त्या त्या समाजातील पालकांची मदत घ्यावी.
- विशिष्ट सणांची माहिती देण्यासाठी, त्या त्या समाजातील पालकांना बोलावून घ्यावे.
- बालकांना पारंपरिक पोशाखात बोलवावे.
- वर्तमानपत्रे, मासिके यांतून बालकांना चित्रे, फोटो आणायला सांगावे व वर्गाचे एक पुस्तक तयार करावे.
- प्रत्येक सणाच्या वैशिष्ट्यानुसार बालकांना खाऊ किंवा जेवण द्यावे.
- शाळेमध्ये उत्सवाचे वातावरण निर्माण करावे.

६) **ओळख थोरामोठ्यांची (कृती क्र. १२०) :** बालकांना आपल्या देशात होऊन गेलेल्या थोर लोकांची ओळख करून देण्यासाठी, ही माहिती सांगितली जावी. त्याची भाषा सोपी असावी. त्यांचे विचार, केलेले काम, देशासाठी शिक्षणासाठी केलेले काम यासंबंधी त्यांची जी ओळख असते, तेवढीच माहिती द्यावी. माहिती देताना त्यांचा फोटो वर्गात लावलेला असावा. त्या बरोबर देशाचा नकाशा, तिरंगा झेंडा या गोष्टी लावून ठेवाव्यात. त्यांनी युद्धात केलेली कामगिरी, देशासाठी केलेला त्याग सोप्या शब्दांत, शब्दांची फोड करून सांगावा.

यामध्ये देश स्वतंत्र करण्यासाठी बलिदान देणारे क्रांतिकारक, सैनिक, नेते, पुढारी, शिक्षणक्षेत्रात कामगिरी करणारे, समाजसेवा करणारे अशा लोकांची ओळख दिनविशेषानुसार करून द्यावी.

तसेच आपल्या समाजात काही लोक असे असतात की, त्यांना दिसत नसते, ऐकू येत नसते,

चालायला पाय नसतात किंवा एकच पाय असतो, हात नसतो किंवा आखूड हात असतो, बोटे नसतात तरीही अशी माणसे खूप मोठे काम करून दाखवतात म्हणजे हात-पाय नसतील किंवा बोटे नसतील तरी वेगवेगळ्या खेळात प्रावीण्य मिळवतात आणि देशासाठी खेळून देशाचे नाव मोठे करतात, चित्रकलेत प्रावीण्य मिळवतात किंवा नृत्यात प्रावीण्य मिळवतात. अशी ही प्रेरणादायी व्यक्तींची ओळख या निमित्ताने करून देण्यात यावी.

**ड) गाणी व संगीत :**

गाणी, संगीत, लयबद्ध हालचाली यांचे बालकाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. गाण्याच्या माध्यमातून आपण बालकांना अनेक गोष्टी शिकवू शकतो. संगीत हे सहसंबंधाचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. गाणी व संगीत यांमुळे शांतता मिळते व ताणरहित अनुभव येतो. बालकांना संगीताप्रति उत्स्फूर्त प्रेम असते. त्यामुळे त्याचाच उपयोग आपण बालशिक्षणाच्या अभ्यासक्रमात सहजगत्या करून घेऊ शकतो. जन्मानंतर बाळाला संगीताची जाणीव होऊन, त्यानुसार त्याचा प्रतिसाद असतो.

बाळाच्या सहवासात असणाऱ्या संगोपनकर्त्याने पारंपरिक गाणी, बडबडगीते तर सतत म्हणावीतच, पण उत्स्फूर्तपणे गाणी जुळवून तीसुद्धा म्हणावीत. संगीत हे बालकाच्या आयुष्यातील भाषिक, बोधात्मक, शारीरिक-कारक, सामाजिक-भावनिक विकास घडवणारे उत्तम साधनच आहे.

**बालशिक्षणातील गाण्यांची उद्दिष्टे :**

- शब्दसंपत्ती समृद्ध करणे.
- भाषाविकासास चालना देणे.
- नियंत्रित हालचाली शिकणे.
- आनंद व मजा मिळवणे.
- अवधान कक्षा वाढवणे.
- अनुकरणास वाव मिळणे.
- सामाजिक कौशल्य प्राप्त करणे.

**बालशिक्षणातील गाण्याचे फायदे :**

- बालकांना गाण्यांमुळे निखळ आनंद मिळतो.
- भाषाविकासामध्ये गाण्यांचे विशेष स्थान असते.
- संकल्पनांचे दृढीकरण करण्यामध्ये गाण्यांची मदत होते. संकल्पनांची तुलना करण्यास बालक शिकते. मोठा/हळुवार आवाज, गतिमान/संथ संगीत.
- बालकांच्या वयोगटानुसार गाण्यांची निवड केली गेली, तर अवधान कक्षा वाढवण्यास मदत होते.

- बालकांची उत्सुकता वाढवण्यास गाणी उपयुक्त ठरतात.
- गाण्यामुळे बालकांच्या उत्स्फूर्ततेला वाव मिळतो.
- ५ ते ६ वर्षे वयोगटातील मुले शिक्षकांच्या किंवा प्रौढांच्या मदतीने स्वतः कविता तयार करू शकतात, म्हणजेच बालकांच्या सर्जनशीलतेला वाव मिळतो.
- गाणी, बडबडगीते बालकांचे जीवन समृद्ध बनवतात.
- गाण्यामुळे सर्जनशीलतेचा विकास होतो.
- प्रायोगिकता, शोधकवृत्ती व प्रकटीकरणास वाव मिळतो.
- इतरांच्या भावनांची जाणीव होते.
- शब्द स्मरणात राहण्यास मदत होते.
- समाजमान्य पद्धतीने भावनांना मोकळीक मिळते.
- सौंदर्यदृष्टी विकसित होते.

**गाण्यांच्या निवडीचे निकष :**

- बालकांच्या वयोगटाप्रमाणे गाणी, बडबडगीते, कविता असाव्यात.
- बालकांच्या जगातील शब्द शक्यतो गाण्यात असावेत.
- बालकांच्या जगाशी, दिनक्रमाशी व अनुभवांशी जुळणारे गाणे असावे.
- काही गाणी संकल्पनेचे दृढीकरण होईल अशी असावीत.
- अगदी सुरुवातीला ४ ते ६ ओळीचीच गाणी असावीत, म्हणजेच गाणी लहान असावीत.
- गाण्यात काही शब्दांची, पुनरावृत्ती असावी.
- गाण्यांना लय असावी. लयबद्ध शब्द असावेत.
- लहान बालकांना खूप मोठी गाणी कंटाळवाणी वाटतात; परंतु ५ ते ६ वर्षे वयोगटातील बालके मात्र मोठी गाणी व कविता यांतून आनंद मिळवतात.
- शिक्षिकांनासुद्धा निवडलेल्या गाण्यातून आनंद मिळायला हवा.
- गाण्यांमधून शब्दसंपत्ती समृद्ध व्हायला हवी.
- गाण्यातील काही शब्द नवे असले, तरी जास्तीत जास्त शब्द, ओळखीचे असावेत, त्यामुळे बालकांचा गाण्याप्रति उत्स्फूर्त प्रतिसाद मिळवता येतो.

**नवीन गाणे कसे शिकवावे?**

- समोर असलेल्या वयोगटानुसार गाणे निवडावे.

- बालकांना तुमच्या मागून एकेक ओळ म्हणण्यास सांगू नका. गाण्याची एक ओळ दोनदा म्हणावी, म्हणजे बालके आपोआप एकदा ऐकून दुसऱ्या वेळी शिक्षिकेबरोबर गाणे म्हणतात.
- शब्दांचा उच्चार सुस्पष्ट करावा.
- गाणे म्हणताना फिंगर पपेट, स्टीक पपेट, ग्लेव्ह पपेट अशा वस्तूंचा वापर करावा.
- काही गाण्यांचे नाट्यीकरण करावे.
- गाणी म्हणताना हावभावांचा वापर असावा.
- गाणे शिकवण्यापूर्वी बालकांना गाण्याची पार्श्वभूमी सांगावी. गाण्यात कोण कोण आहे, गाण्यातील पात्रे काय करत आहेत, हे छोट्या प्रसंगातून अथवा गोष्टीतून सांगावे, म्हणजे मुले समजून गाणे म्हणतील.
- नवीन शिकवलेले गाणे एक पूर्ण आठवडा म्हणत रहावे. त्यानंतरच्या आठवड्यामध्ये गाणी म्हणताना त्याचा समावेश करावा.

**गाणे म्हणण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे :**

- गाणे अगोदर स्वतः नीट शिकावे.
- तुम्हांला गाणे नीट येते आहे, याची खात्री पटेपर्यंत सराव करावा.
- गाणे व त्याची चाल एकाच वेळी शिकावी.
- लहान व छोटे गाणे एकाच वेळी म्हणावे.
- गाण्याचे शब्द व गाण्याचा गोडवा, याला उठाव येण्याच्या दृष्टीने वाद्यांची साथ द्यावी.
- एखाद्या संकल्पनेशी संबंधित गाणे एका आठवड्यात शिकवले, तर पुढील आठवड्यात ते गाणे दोन तीनदा तरी म्हणावे.
- ज्या बालकाला गाणे म्हणण्यास येत नसेल, त्यास प्रोत्साहित करावे, पण जबरदस्ती करू नये.
- बालकांसाठी गाणे हा आनंददायक अनुभव असावा.

**बालकांच्या गाण्याच्या विकासाचा क्रम :**

- स्वतःच्याच आवाजाशी खेळ करतात.
- स्वकेंद्री शब्दांचा वापर असलेली गाणी म्हणायला आवडते.
- इतरांनी म्हटलेली गाणी ऐकणे आनंददायक वाटते.
- इतरांनी गायलेल्या गाण्यांवर अभिनय करायला आवडतो.
- गटाबरोबर व प्रौढांबरोबर गाणी म्हणायला आवडते.

- गाण्याची निवड करायला आवडते.
- गाणे चालीत म्हणता येते.

**गाणी व संगीताच्या सत्रामध्ये अंगणवाडीताईची भूमिका :**

- गाणी व संगीतामधील प्रकटीकरणास प्रोत्साहन द्यावे.
- गाणी म्हणताना, गाणी छान आवाजात म्हटल्याबद्दल, सगळ्यांनी म्हटल्याबद्दल बालकांचे कौतुक करावे.
- संगीताच्या सत्राच्या वेळी ताई उत्साही असावी.
- ताईच्या आवाजात उत्स्फूर्तता असावी.
- गाणे म्हणताना प्रसन्न आवाजात म्हणावे.
- गाणी म्हणताना सहभागी होण्याची बालकांना जबरदस्ती करू नये. ताईला माहीत हवे, की बालक गाण्याच्या वैकासिक पायऱ्यांमधून पुढे जात असते.
- बालकाने नैसर्गिरीत्या सर्जनशीलता दर्शवावी, म्हणून ताईने प्रोत्साहन द्यावे.
- एखाद्या कृतीची पार्श्वभूमी, विविध प्रकारच्या सूचना देणे यांसाठी ताईने संगीताचा वापर करावा.

**गाणे व संगीत सत्रासाठी वापरायचे साहित्य :**

गाणे, लयबद्ध हालचाली यांच्याबरोबर काही साहित्य वापरले तर, गाणे मनोरंजनात्मक व आवड उत्पन्न करणारे ठरते. विविध प्रकारचे साहित्य व वस्तू यांचा वापर करून गाणी म्हणणे व लयबद्ध हालचाली करणे मुलांना खूप आवडते.

हातात घेता येण्यासारख्या विविध वस्तूंमुळे (प्रॉप्स) मनावरचे दडपण कमी होऊन, मुक्त व उत्स्फूर्त हालचालींना उद्दीपन मिळते. साहित्य व वस्तू हालचाली करण्यास उपयुक्त ठरतात, तसेच बदल सुचवण्यासाठी, मुक्त हालचालींना चालना देण्यासाठी वस्तू व साहित्याचा उपयोग होतो.

- वाद्य, टेपरेकॉर्डर
- पपेट्स
- मुखवटे
- फुगे
- चेंडू
- रुमाल
- रंगीत कागदाच्या पट्ट्या, रिबीन्स

- कागदाचे विविध आकार

या सर्व साहित्याचा वापर करून, बालकांच्या नैसर्गिक हालचालींना व मुक्त हालचालींना चालना मिळते.

**इ) गोष्ट/कथा सांगणे :**

प्रत्येक वयोगटातील बालकांसाठी गोष्ट ऐकणे हा एक प्रसन्न अनुभव असतो. गोष्टींच्या माध्यमातून आपण मुलांना अनेक संकल्पना शिकवू शकतो. याचप्रमाणे मुलांच्या मनात मूल्ये रुजवू शकतो. बालक गोष्टींच्या माध्यमातून भाषाकौशल्य विकसित करते, कारण ते त्याच्याशी निगडित विविध अनुभव आणि कृतींमध्ये भाग घेते. कथा ऐकणे हा मुलांसाठी सर्वांत आवडीचा उपक्रम आहे. कुटुंबातील रचनात्मक बदलांमुळे, पारंपरिक गोष्ट ऐकणे, सांगणे याची जबाबदारी आता अंगणवाडीताईवर पडली आहे. कथेचे विषय पिढ्यान्‌पिढ्या बदलत असतील, तरी मूल्ये आणि उद्दिष्टे समानच राहतात.

**गोष्ट/कथा सांगण्याची उद्दिष्टे :**

- बालकांच्या भाषाविकासास मदत करणे.
- बालकांचे मनोरंजन करून त्यांना आनंद देणे.
- भाषाकौशल्य समृद्ध करणे.
- शब्दसंपत्ती समृद्ध करणे.
- विचार व तर्कशुद्ध विचार यांसाठी संधी देणे.
- कल्पनाशक्ती, सर्जनशीलता व स्वप्रकटीकरण यांसाठी मार्ग उपलब्ध करून देणे.
- मूल्ये रुजवणे.
- व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक विकास यांसाठी मदत करणे.
- सहसंपर्क साधण्याचे कौशल्य शिकवणे.
- बालकांच्या 'स्व' च्या भावनेला चालना देणे.
- अवधानकक्षा वाढवणे.
- भावनांना मोकळीक देणे.
- वाचनाच्या सवयीचा पाया रचणे.
- संकल्पना स्पष्ट करण्यास गोष्टींची खूप मदत होते.

**गोष्टी/कथा यांचे फायदे :**

- बालकाचे मनोरंजन होते.

- बालकांना नवीन शब्दांची ओळख होते.
- संवादात्मक भाषा कशी असते, हे कथेच्या माध्यमातून कळते/समजते.
- कथेमधील मुख्य पात्राशी बालक समरस होते, त्यामुळे भावनांना मोकळीक मिळते.
- अवधान कक्षा वाढते.
- एका जागी स्थिर बसण्याची क्षमता येते.

**गोष्टीच्या निवडीचे निकष :**

- बालकांच्या वयोगटानुसार गोष्टींची निवड करावी.
- रोजच्या जीवनातील प्रसंगांना अनुसरून व ओळखीच्या प्रसंगांवर आधारित गोष्टी असाव्यात.
- गोष्ट वाचून दाखवली जाणार असेल, तर ती लहानच असावी; परंतु गोष्ट सांगितली जाणार असेल; तर ती १२ ते १५ मिनिटे सांगता येईल एवढी वाढवावी.
- गोष्टीची भाषा सोपी असावी.
- ३ वर्षे वयोगटासाठी निवडलेल्या गोष्टीद्वारे बालकांची अवधानकक्षा व आवड वाढीस लागली पाहिजे.
- काल्पनिक गोष्टींचा पाया वास्तवातील व्यक्ती व प्राणी यांवर आधारित असावा.
- लहान बालकांना अजून अमूर्त विचार करता येत नसल्याने, त्यांच्यासाठी रोजच्या जीवनातील आधारावरच गोष्टी निवडाव्यात; परंतु परीकथा असू नयेत.
- गोष्टीचा शेवट भीतिदायक, किळसवाणा असू नये. शेवट नेहमी समाधानकारक व आनंददायी असावा. बालकांना खूप धक्कादायक किंवा दु:खदायक अनुभव देऊ नये.

**गोष्ट सांगण्याची तंत्रे :**

अनेक माध्यमे आणि तंत्रांचा वापर करून कथा/गोष्टी सांगता येतात. अंगणवाडीताई अशा माध्यमांचा खुबीने वापर करून, स्वतःकडे बालकांचे लक्ष वेधून घेऊ शकते. तिचे हावभाव, आवाजातील चढउतार, गोष्टीत केलेला गाण्यांचा, संगीताचा वापर आणि गोष्ट सांगताना केलेल्या हालचाली बालकांना गोष्ट ऐकताना खिळवून ठेवतात.

१) **कोणत्याही साहित्याशिवाय गोष्ट सांगणे :** यामध्ये ताईकडे कोणतेही साधन नाही, पण तिचा आवाज आणि चेहऱ्यावरचे हावभाव ही तिची साधने असतात, म्हणजेच गोष्ट सांगताना तिने आवाजातील चढउताराचा वापर करावा आणि चेहऱ्यावरचे हावभाव, देहबोली, हातवारे यांचा खुबीने वापर करावा.

**बैठकव्यवस्था :** साहित्याशिवाय गोष्ट सांगताना, ताईने छोट्या खुर्चीवर बसावे. आवश्यकता असेल तिथे मध्येच उभे राहावे. बालकांना समोर अर्धगोलात बसवावे.



२) **गोष्टीचे चित्रांसहित पुस्तक :** हे तंत्र वापरात असताना ताईने पुस्तक कसे धरावे हे महत्त्वाचे असते. पुस्तकावरून गोष्ट सांगत असताना कधीही खूप हावभाव व हातवारे करू नयेत. देहबोलीचा वापरही करू नये. आवाजातील चढउतार व पुस्तकातील चित्रे यांच्या आधारे गोष्ट सांगावी.

**पुस्तकावरून गोष्टी सांगताना पुस्तक धरायची पद्धत व बैठकव्यवस्था**





पुस्तक नेहमी त्याच्या कडांच्या बाजूने धरावे. पुस्तकामुळे ताईचा चेहरा झाकला जाता कामा नये. बुटक्या खुर्चीवर बसावे. बालकांना अर्धगोलाकार बसवावे. बालक अगदी जवळ नकोत. थोडी लांब असावीत, म्हणजे सर्वांना चित्रे दिसू शकतील.

जमिनीवर बसून गोष्ट सांगितल्यास चित्रात आहे, त्याप्रमाणे पुस्तक धरावे व मुलांना बसवावे.

३) **क्षणचित्रे (फ्लॅशकार्ड) :** क्षणचित्रे गोष्टीच्या पुस्तकाप्रमाणेच वापरायची असतात. आपण जी गोष्ट कार्डवर चित्रित करणार आहोत, ती गोष्ट अगोदर पूर्ण वाचावी. त्यानंतर गोष्टीत किती पात्र आहेत, कोणते प्रसंग आहेत, किती संवाद तयार होणार आहेत याचा अभ्यास करावा. त्यानंतर किती कार्डे तयार करावी लागतील, याचा अंदाज येतो. एका गोष्टीसाठी किमान ६ ते ८ कार्डे लागतात. जास्तीत जास्त १२ लागू शकतात. क्षणचित्रांद्वारे गोष्ट सांगताना कार्डे तोंडासमोर धरू नयेत. खूप हावभाव, हाताच्या हालचाली, देहबोली यांचा वापर टाळावा. आवाजातील चढउतार महत्त्वाचे असतात. जे चित्र असते, त्याच्या नंतरच्या कार्डवर दिसणाऱ्या चित्राचे वर्णन, म्हणजेच गोष्टीचा



प्रसंग लिहिलेला असावा. एका कार्डवरचा संवाद, प्रसंग सांगून झाला, की ते चित्र परत मागे टाकावे.

पहिले कार्ड नेहमी गोष्टीचे नाव, गोष्टीतील पात्रांची चित्रे असणारे असावे.

**क्षणचित्रांवरून गोष्टी सांगताना क्षणचित्रे धरायची पद्धत व बैठकव्यवस्था**

ताई खुर्चीत बसली, तर गोष्टीचे पुस्तक चित्रात दाखवल्याप्रमाणे असावे व जमिनीवर बसल्यावर वरील चित्रात दाखवल्याप्रमाणे बैठकव्यवस्था असावी. अगदी ताईच्या हाताजवळ चिकटून कोणालाच बसू देऊ नये, कारण त्या बालकांना चित्रे नीट दिसत नाहीत.

४) **कठपुतळी बाहुली (पपेट्स) :** गोष्ट सांगण्याचे पपेट हे खूप छान तंत्र आहे. यामध्ये कोणत्याही वयाची व्यक्ती रंगून जाते. मग लहान बालके तर किती गुंग होत असतील, याची कल्पनाच करता येत नाही.

- **बोटावरच्या बाहुल्या (फिंगर पपेट)**

  फिंगर पपेटच्या साहाय्याने गोष्ट सांगताना, समोर फक्त ५ ते ६ बालकांचा गट असावा. बोटावरच्या बाहुल्या मोठ्या गटात नीट दिसत नाहीत. फक्त आवाजाचा चढउतारच वापरायचा असतो. लहान गटात असल्याने बालके जवळच असतात.

  **लहान गटासाठी ही पद्धत वापरावी. साधारणत: ५ ते ७ बालके समोर असावीत. बालकांना अर्धगोलाकार बसवावे.**

  ताईने जमिनीवरच बसून गोष्ट सांगावी.





- **छडी बाहुली (स्टिक पपेट) :** काठीवरच्या बाहुल्या मोठ्या बनवल्या, तर मोठ्या गटालासुद्धा गोष्ट सांगता येते. गोष्ट समोर बसून, उभे राहून किंवा पडद्याआडून सांगता येते.







ताईने जमिनीवरच बसून, उभे राहून किंवा पडद्याआडून गोष्ट सांगावी. त्यामुळे बैठकव्यवस्था त्यानुसार करावी लागते. अर्धगोलाकार बैठकव्यवस्था, जमिनीवर बसून गोष्ट सांगण्यासाठी असते, परंतु पडद्याआडून गोष्ट सांगायची असेल, तर मात्र पडद्यापासून काही अंतरावर बसवावे. बसवताना बालकांना त्यांच्या उंचीप्रमाणे बसवावे.






- **हातमोजा बाहुली (ग्लोव्हज् पपेट) :** बालकांना सर्वांत जास्त आनंद हातमोजा बाहुल्या वापरून सांगितलेल्या गोष्टीतून मिळतो. यामध्ये प्राणी, माणसे, मुले, पक्षी अशा हातमोजा बाहुल्या बनवल्या आणि त्या माध्यमातून गोष्ट सांगितली, तर ती जास्त खरी वाटते. हातमोजा

बाहुली वापरून गोष्ट सांगताना पडद्याआडून सांगण्याचीच पद्धत आहे, परंतु बालकांसमोर उभे राहूनसुद्धा गोष्ट सांगितली तरी चालते.





७) **रोलोग्राफ :** कथेची चित्रे कागदाच्या किंवा कापडाच्या लांब शीटवर क्रमाने निश्चित केली जातात.



ती दोन्ही बाजूंच्या चौकटीच्या टोकांवर घातल्या जाणाऱ्या रॉडस्‌वर गुंडाळली जातात. जसजशी कथा पुढे जाते, तसतशी गुंडाळीवरची चित्रे सरकवत नेता येतात. चित्रे एकमेकांवर येऊन झाकली जाऊ नयेत, म्हणून चित्रांमध्ये अंतर ठेवावे लागते.

या पद्धतीनुसार दूरदर्शनवर चित्रपट बघितल्याप्रमाणे गोष्ट बघता येते, त्यामुळे बैठकव्यवस्था जमिनीवर, खुर्चीवर सोयीप्रमाणे करता येते.

८) **मुखवटे वापरून गोष्टीचे नाट्यीकरण करणे व गोष्ट सादर करणे :** या पद्धतीमध्ये चेहऱ्यावर प्राणी, पक्षी यांचे मुखवटे लावून, गोष्टीचे नाटक सादर केले जाते. गोष्टीमध्ये नाटकासारखे संवाद लिहून गोष्ट सादर करायची असते. या पद्धतीनुसार नाटक बघितल्याप्रमाणे गोष्ट बघता येते, त्यामुळे बैठकव्यवस्था जमिनीवर, खुर्चीवर सोयीप्रमाणे करता येते.




ताई जमिनीवरच बसून, उभे राहून किंवा पडद्याआडून गोष्ट सांगू शकते, त्यामुळे बैठकव्यवस्था त्यानुसार करावी लागते. अर्धगोलाकार बैठकव्यवस्था जमिनीवर बसून गोष्ट सांगण्यासाठी असते; परंतु पडद्याआडून गोष्ट सांगायची असेल, तर मात्र पडद्यापासून काही अंतरावर बालकांना बसवावे. बसवताना उंचीप्रमाणे बसवावे. स्टिक पपेट वापरून गोष्ट सांगताना, जशी व्यवस्था सांगितली आहे, तशीच करावी लागते.

९) **वाळूचा ट्रे वापरून गोष्ट सांगणे (सँड ट्रे तंत्र) :** यामध्ये वाळूने भरलेला ट्रे असतो आणि त्यामध्ये कमी उंचीची स्टिक पपेट वापरून गोष्ट सांगता येते. पपेट एका जागेवरून दुसऱ्या जागेवर हालवता येतात. ताईने जमिनीवर बसावे. वाळूचा ट्रे समोर एका छोट्या टेबलावर ठेवावा. बालकांना अर्धगोलाकार बसवावे.




१०) **फ्लॅनेल बोर्ड :** फ्लॅनेल बोर्डवर गोष्ट सांगण्याच्या तंत्रामध्ये चित्रांचे कटआउट्स तयार केले जातात. कटआउट्सच्या मागे कापूस किंवा सँडपेपर लावला जातो त्यामुळे ते कटआउट्स फ्लॅनेल बोर्डवर चिकटून बसतात. गोष्ट सांगत जाऊ, तशी वेगवेगळी चित्रे लावता येतात, नको असलेली काढून ठेवता येतात.



**बैठकव्यवस्था :** फ्लॅनेल बोर्डवर गोष्ट सांगताना, बोर्ड भिंतीवर लावलेला असावा, तो स्टँडवर ठेवावा किंवा एखाद्या बुटक्या खुर्चीवर, स्टुलावर आधाराने ठेवावा. बालकांना जमिनीवर अर्धवर्तुळाकार बसवावे. ताईने छोटी खुर्ची/स्टूलवर बोर्डच्या शेजारी बसावे आणि गोष्ट सांगावी.

**ताईंसाठी काही महत्त्वाचे :**

- गोष्ट सांगण्यापूर्वी खूप वेळा वाचलेली असावी.
- गोष्ट सांगण्यापूर्वी ज्या पद्धतीने सांगणार, त्या पद्धतीचा सराव केलेला असावा.
- गोष्टीचा सराव करताना नेहमी आरशासमोर उभे राहून सराव करावा, म्हणजे आपल्या चुका आपल्यालाच कळतात.
- गोष्ट सांगताना बैठकव्यवस्था महत्त्वाची असते.
- गोष्टीचा शेवट पुस्तकामध्ये कितीही वाईट असो, आपण तो शेवट बदलून आनंदी करून सांगायचा.
- गोष्ट नेहमी भूतकाळात सांगावी.
- गोष्टीत शक्यातो एखादे पात्र प्रमुख असावे, कारण बालके त्या पात्राशी तादात्म्य पावतात, म्हणजेच त्या पात्राशी समरस होतात.
- गोष्टीमध्ये आश्चर्य, उत्सुकता कायम ठेवावी.

**ई) वर्गातील मुक्त खेळ (Free Play) :**

खेळ हा बालकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. बालके खेळतात तेव्हा बघणाऱ्या प्रत्येकाला वाटते, की वेळ वाया जातो आहे, पण खेळ हे, विविध प्रकारचे अध्ययन अनुभव घेण्याचे उत्तम साधन आहे. बालकांसाठी खेळ याचा अर्थ करमणूक, मनोरंजन, निखळ आनंद असाच आहे, बालकांना मुक्तपणे खेळायला खूप आवडते, तसे त्यांना खेळूही द्यावे, परंतु काही वेळा काही बाबतीत, त्यांना मार्गदर्शक खेळ किंवा कृतींची आवश्यकता असते.

आज आपण इथे मुक्त खेळ याचा नेमका अर्थ जाणून घेऊ. मुक्त खेळ म्हणजेच कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय खेळलेला खेळ किंवा कोणाच्याही सांगण्यावरून न खेळता, स्वतःच्या मनाने खेळलेला खेळ. खेळाची निवड करताना, बालक त्यावेळी नेमके कोणत्या परिस्थितीत असेल, त्यावर त्याची निवड प्रक्रिया अवलंबून राहते.

प्रत्येक बालक वेगळे असते, त्यामुळे प्रत्येकाचे स्वप्रकटीकरण वेगवेगळे असते. कोणाला गटात खेळायला आवडेल, कोणाला स्वतंत्र खेळायला आवडेल, त्यामुळे बालकांवर निवडप्रक्रिया सोपवलेली असते; म्हणजेच मुक्त खेळासाठी वेळ दिलेला असतो, तेव्हा त्याला कसे खेळायचे आहे ते त्याचे त्याला ठरवू द्यावे.

मग बालक हा मुक्त खेळ कोणत्याही ठिकाणी खेळते. बालक अंगणवाडीत/बालवाडीत जायला लागल्यावर, कोणतीही गोष्ट करण्यासाठी त्याला ठरावीक वेळेला, ठरावीक साहित्य, साधने पुरवली जातात व ते बालक त्याबरोबर खेळते किंवा कृती करते.

याचाच अर्थ, बालक अंगणवाडीमध्ये वेळापत्रकानुसार अनेक गोष्टी करते. त्याला वेळेचं बंधन असते. कसे खेळावे हे कोणीतरी सांगत असते, पण रोजच्या वेळापत्रकात काही वेळ बालकांना त्यांच्या मनाप्रमाणे खेळू द्यावे. यालाच मुक्त खेळ किंवा Free Play म्हणतात.

अंगणवाडीमध्ये/बालवाडीमध्ये मुक्त खेळ हा, वर्गाबाहेर मैदानावर किंवा वर्गामध्ये दोन्ही ठिकाणी द्यायचा असतो. याचाच अर्थ वेळापत्रकात यासाठी स्वतंत्र वेळ राखून ठेवायचा असतो.

**मुक्त खेळाची उद्दिष्टे :**

- बालकांना खेळाच्या निवडीचे स्वातंत्र्य देणे.
- बालकांना स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ देणे.
- बालकांच्या शोधकवृत्तीला चालना देणे.
- बालकांच्या प्रयोगशीलतेला वाव देणे.
- बालकांच्या कल्पनाशक्तीला व सर्जनशीलतेला चालना देणे.
- बालकांची विचारशक्ती तर्कशुद्ध होण्यास मदत करणे.
- बालकांचा भाषाविकास अधिक समद्ध होण्यास मदत करणे.
- सामाजिक विकासास संधी मिळवून देणे.

**मुक्त खेळाचे फायदे :**

- बंधनमुक्त खेळण्याने बालके एकमेकांच्या मदतीने खेळतात, वाटणी करायला शिकतात, संघर्ष आपले आपण सोडवतात.
- निर्णयशक्ती विकसित होते, बालकांना त्यांच्या आवडीचे खेळ खेळता येतात.

  मुक्त खेळ खेळताना निरनिराळ्या वयोगटातील बालके खेळाच्या विकासाच्या ज्या पायरीत असतील, त्याप्रमाणे खेळतात.

| वयोगट | खेळाची पायरी |
|---|---|
| ८ महिने ते १ $\frac{१}{२}$ वर्षे (दीड वर्षे) | प्रेक्षकाच्या भूमिकेत, म्हणजेच दुसऱ्यांच्या खेळाचे निरीक्षण करणे आणि आनंद मिळवणे. |
| १ $\frac{१}{२}$ वर्षे ते २ वर्षे | एकट्याने खेळणे. |
| २ वर्षे ते ३ वर्षे | समांतर खेळ खेळणे. |
| ३ वर्षे ते ४ वर्षे | संबंध जोडून खेळणे. |
| ४ वर्षे ते ६ वर्षे | सहकार्यात्मक खेळ खेळणे. |

खेळाच्या पायऱ्या महत्त्वाच्या असतात. त्या वयोगटानुसार दिसतात, त्यामुळे बालकाच्या खेळाकडे बघताना, त्यांचे वय लक्षात घ्यायचे असते. मुक्त खेळ हा कोणत्याही नियमात खेळण्याचा खेळ नाही, म्हणूनच मुक्त खेळाला कशाचेही बंधन नसणारा, कोणतीही रचना नसणारा किंवा बंधनमुक्त खेळ म्हणतात.

मुक्त खेळामध्ये आपोआपच कल्पनाशक्ती, सर्जनशीलता वापरली जाते. खेळण्यासाठी उपलब्ध वस्तू, साहित्य–साधने यांचा वापर करताना, नवीन शोधही घेता येतो. प्रत्येक बालकाला त्याच्या विकासाच्या गतीनुसार खेळता येते, वातावरणाबरोबर उत्तम प्रकारे आंतरक्रिया करता येते.

मुक्त खेळ दोन प्रकारे खेळले जातात. मैदानावरील, म्हणजेच वर्गाबाहेरील मुक्त खेळ आणि वर्गातील मुक्त खेळ, त्यांपैकी वर्गाबाहेरील मुक्त खेळाची माहिती आपण यापूर्वी घेतली आहे. इथे आपण वर्गातील मुक्त खेळाविषयी अधिक जाणून घेणार आहोत.

**वर्गातील मुक्त खेळ :** वर्गातील मुक्त खेळ, म्हणजेच निरनिराळी खेळणी, गाड्या, ठोकळे, खेळणे, खेळघरात (बाहुलीघरात) खेळणे.

- वर्गातील मुक्त खेळाची मांडणी
  १) रोज खेळणी मांडून ठेवणे.
  २) चित्रकोडी मांडून ठेवणे.
  ३) खेळघराच्या कोपऱ्यात खेळू देणे.
  ४) गाड्या खेळायला देणे.
  ५) ठोकळे खेळायला देणे.

वेळापत्रकातील मुक्त खेळाच्या वेळी बालकांना इतके पर्याय समोर असतील, तेव्हा ते ठरवू शकतात, की त्यांना कोणत्या खेळण्याशी खेळायचे आहे आणि ते त्याच्याशी खेळतील.

**वर्गातील मुक्त खेळामध्ये शिक्षिकेची भूमिका :**

१) मांडलेल्या खेळण्यांपैकी, तुम्हांला जेथे खेळायचे असेल, तेथे खेळा अशी सूचना मुक्त खेळाच्या वेळी द्यावी.

२) एखाद्या खेळण्यावरून संघर्ष होत असेल, तर आळीपाळीने खेळण्यास शिकवावे.

३) बालके खेळत असताना अत्यंत जागरूकतेने देखरेख करावी.

४) बालकांनी मदत मागितल्यासच मदत करावी.

### फ) मागोवा (निरोप) :

दिवसभराच्या शेवटी बालके घरी जायला निघाल्यावर, स्वागताच्या वेळी घेतलेल्या परिपाठाप्रमाणेच त्यांना अर्धवर्तुळाकार बसवावे. दिवसभरामध्ये केलेल्या कृतींचा आढावा घ्यावा. या सत्रामध्ये ते दिवसभरामध्ये काय नवीन शिकले याची उजळणी होते. त्यांना त्यातील कोणते उपक्रम आवडले याबद्दल बोलण्याची संधी मिळते, तसेच त्या दिवशी शिकवलेली एखादी संकल्पना समजली नसेल, तर त्याबाबत ते शंका विचारू शकतात. या सत्रामुळे बालकांना आनंदामध्ये अंगणवाडीतील दिवसाचा शेवट करता येतो, तसेच दुसऱ्या दिवशीच्या उपक्रमांसाठी तयारी करता येते. मागोवा घेताना पुढील मुद्दे लक्षात ठेवणे आवश्यक आहे –

१) ताईंनी बालकांच्या पातळीवर खाली बसावे.

२) प्रत्येक बालकाला प्रश्न विचारण्याची व त्यांचे दिवसभरातील अनुभव व्यक्त करण्याची समान संधी द्यावी.

३) प्रत्येक बालक काय सांगते, विचारते याची नोंद ठेवावी व पालकसभेच्या वेळी ती पालकांना आवर्जून सांगावी.

४) एखादे छानसे गाणे गाऊन/विनोद सांगून बालकांचा निरोप घ्यावा.

**मागोवा/निरोप सत्रामध्ये पुढील कृती घ्याव्यात :**

**१) मुक्त गप्पा :** दिवसभरातील घटना, आज तुम्ही काय केले, काय शिकलात, आता घरी गेल्यावर काय करणार आहात याविषयी बालकांना मोकळेपणाने बोलण्यास प्रोत्साहन द्यावे.



**२) दिवसभर केलेल्या कृतींची उजळणी :** दिवसभर झालेल्या कृती आणि बालके आज नवीन काय शिकली यांची थोडक्यात उजळणी घ्या. त्यामुळे विविध कृतींमधील प्रक्रिया आणि त्यांचे अनुभव आठवण्यास मदत होईल.

**३) आवडती कृती :** बालकांना आजच्या दिवसातले काय आवडले, ते सांगण्यास प्रोत्साहित करा. ही आवडती गोष्ट एखादी कृती असू शकते, नवीन शिकलेली गोष्ट असू शकते किंवा दुसऱ्या मित्राबरोबर केलेली एखादी गंमत असू शकते. या आवडत्या गोष्टीबद्दल त्यांना काय वाटते, हे बोलण्यास उद्युक्त करावे.

४) **स्वच्छता :** अंगणवाडीतून बाहेर पडण्याआधी वर्गखोली नीटनेटकी करण्यासाठी बालकांची मदत घ्या. खेळणी आणि इतर साहित्य जागेवर ठेवणे, कागदांचे तुकडे किंवा इतर अनावश्यक गोष्टींची विल्हेवाट लावणे या गोष्टी ताईंनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांकडून करून घ्याव्यात; मात्र ही कामे त्यांच्याकडून करून घेताना, त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करावा.

५) **दुसऱ्या दिवसाची पूर्वतयारी :** दुसऱ्या दिवशी बालकांना अंगणवाडीमध्ये येण्याचा उत्साह वाटावा, म्हणून दुसऱ्या दिवशी कोणते उपक्रम घेतले जाणार आहेत त्याची थोडक्यात माहिती बालकांना द्यावी, यामुळे बालकांना केवळ दुसऱ्या दिवशी येण्याची उत्सुकता न वाटता, दुसऱ्या दिवशीच्या उपक्रमांची मानसिक तयारीही होते.



६) **वैयक्तिक निरोप :** दिवसांचा शेवट, बालकांकडून एखादे बडबडगीत म्हणवून घेऊन, सामूहिक कृती करून घेऊन किंवा 'मी आनंदी आहे; मी हुशार आहे; मी सुंदर आहे' यांसारखी सकारात्मक विधाने म्हणवून घेऊन करावा. प्रत्येक बालकाचा वैयक्तिक निरोप घ्यावा. त्याने त्या दिवशी केलेल्या एखाद्या कृतीचा मुद्दाम उल्लेख करावा. उदा. 'आज तू गाणे छान म्हटलेस किंवा आज तू काढलेले चित्र मला आवडले. उद्या अंगणवाडीत नक्की ये. मी तुझी वाट पाहते.' यांसारख्या वाक्यांमुळे बालकांची स्वप्रतिमा सकारात्मक होईल.

### ग) क्षेत्रभेट :

क्षेत्रभेट हा बालशिक्षणातील अत्यंत महत्त्वाचा सहज अध्ययन अनुभव आहे, तसेच प्रकल्प पद्धतीमधील पर्यावरण अभ्यास व सामाजिक अभ्यास यांच्या अध्यापन पद्धतीमधील एक बाजू आहे. बालशिक्षणामध्ये इतर सर्व कृतींइतकेच महत्त्व क्षेत्रभेटीला आहे.



अ) **क्षेत्र सहलीचे महत्त्व :** लहान बालकांना भौतिक परिस्थितीचे ज्ञान कमी असते, मर्यादित असते. बालकांना जेव्हा पुस्तके, चित्रे, खेळणी, दूरदर्शन यांमार्फत विविध अनुभव मिळतात, तेव्हा त्यांना अनेक संकल्पना स्पष्ट होतात, पण तरीही मूर्त आणि वास्तव/प्रत्यक्ष अनुभवांची जागा इतर कोणतेही अनुभव घेऊ शकत नाहीत. सभोवतालचा परिसर जाणून घेण्यासाठी बालके त्यांच्या पंचेंद्रियांचा वापर करतात. क्षेत्र सहलीतून बालकांना मूर्त अनुभव मिळतात.

पंचेंद्रियांच्या वापराने त्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट होतात.

- निरीक्षण कौशल्य विकसित होण्यास मदत होते.
- भाषा विकासास मदत होते.
- शब्दसंपत्तीचा विकास होतो.
- संकल्पना स्पष्टीकरणास मदत होते.
- समाजाबद्दल ज्ञान प्राप्त होते.
- पंचेंद्रियांच्या साहाय्याने एकत्रित अनुभव मिळतो.
- सभोवतालच्या वातावरणातून अनुभव मिळतात.
- दिलेल्या सूचना व दाखवली जाणारी दिशा यांचे पालन करण्यास शिकतात.

बालके जेव्हा शाळेत जायला सुरुवात करतात, तेव्हा क्षेत्रभेट हा त्यांचा पहिलाच अनुभव असतो. असे उपक्रम त्यांच्या परिचयाचे असतात. पहिल्यांदाच क्षेत्रभेट हा अनुभव घेताना, बालके गोंधळलेली असतात. त्यामुळे पहिली क्षेत्र सहल आयोजित करताना, जवळचीच जागा निवडावी, तसेच ती जागा ओळखीची असावी.

**ब) क्षेत्र सहल आयोजित करतानाचे टप्पे :**

- **नियोजन :** क्षेत्र सहलीचे आयोजन करताना, अंगणवाडीताईच्या मनात उद्दिष्टे स्पष्ट असावीत, म्हणजेच ही क्षेत्र सहल आपण का आयोजित केली आहे हे स्पष्ट असावे. क्षेत्र सहल ही प्रकल्पाशी निगडित असावी. त्यासाठी योग्य नियोजनाची आवश्यकता असते.
- **क्षेत्रभेटीपूर्वी ताईने पुढील गोष्टींचा विचार करावा.**
  - ➢ ध्येय व उद्दिष्टे
  - ➢ क्षेत्रभेटीची आर्थिक बाजू
  - ➢ क्षेत्रभेटीचे वेळापत्रक
  - ➢ शिक्षक–बालक प्रमाण
  - ➢ उद्भवू शकणाऱ्या समस्यांचा विचार
  - ➢ सहलीचे नियोजन डायरीत/वहीत केलेले असावे.
  - ➢ क्षेत्रभेट आयोजित करण्यापूर्वी, अंगणवाडीताईने त्या जागेला भेट देऊन यावे. बालकांच्या गरजा भागवणाऱ्या सर्व सुविधा क्षेत्रभेटीच्या ठिकाणी आहेत की नाहीत, हे भेटीपूर्वी बघून यावे.

- निर्माण होऊ शकणाऱ्या सर्व धोक्यांचा विचार करावा.
- आयोजित केलेल्या क्षेत्रभेटीतून कोणता अध्ययन अनुभव देता येईल याचा विचार करावा.
- पंचेंद्रियांना एकत्रितपणे अनुभव मिळून कशी चालना मिळणार आहे, याचा शोध घ्यावा.
- क्षेत्रभेटीचा मार्गदर्शक तक्ता तयार करावा.
- क्षेत्रभेटीच्या ठिकाणी अगोदर भेट देऊन आल्यानंतर, कदाचित ध्येयांमध्ये बदल करावा लागेल हे लक्षात घ्यावे.
- घेतल्या जाणाऱ्या क्षेत्रभेटीच्या नियोजन धारिका (फाईल) वेगळ्या जपून ठेवाव्यात.





- **क्षेत्रभेट नियोजन प्रपत्र :**

**क्षेत्रभेट**

क्षेत्र सहलीच्या जागेचे नाव : ..........................................................................

बालकांची संख्या : ...........................

प्रौढ–बालक प्रमाण : ..........................

जबाबदार अंगणवाडीताईचे नाव : ..........................................................................

ध्येय व उद्दिष्टे : १) ..........................................................................

२) ..........................................................................

३) ..........................................................................

४) ..........................................................................

दिनांक : ........................ निघण्याची वेळ : ................ परतण्याची वेळ : ................

वाहतुकीची व्यवस्था : ......................................... अंतराचा अंदाज : .........................

भेट देण्याच्या जागांचा क्रम : ..........................

प्रमुखांची स्वाक्षरी

- **पालकांसाठी सूचनापत्र व पालकांकडून भरून घेण्याचे संमती पत्र :**

प्रत्येक पालकांपर्यंत सूचनापत्र पोहोचेल याची काळजी घ्यावी. एक सूचनापत्र सूचनाफलकावर लावावे.

**सूचना**

सर्व पालक

आपल्या माहितीसाठी कळवण्यात येत आहे, की ...................................................... या ठिकाणी अंगणवाडीतील सर्व बालकांची क्षेत्रभेट ठरवली आहे. दिनांक ......................

निघण्याची वेळ : ........................

परतीची वेळ : ........................

यासाठी आपल्या पाल्यास कृपया ........................ वाजता अंगणवाडीत सोडावे.

**अंगणवाडीताई स्वाक्षरी**

सोबतच्या संमतिपत्रात सर्व माहिती भरून, त्यावर स्वाक्षरी करून, ते पत्रक परत पाठवावे. बालकाबरोबर पाठवण्याच्या वस्तूंची यादी दिलेली आहे, त्या वस्तू पाठवाव्यात.

**पालकांसाठी संमती पत्र**

दिनांक : .............................

बालकाचे नाव : ........................................... पालकांचे नाव : .......................................

पालकांचा पत्ता : ..........................................................................................................

........................................................................................................................................

पालकांचा कामाच्या ठिकाणचा पत्ता : ......................................................................

........................................................................................................................................

फोन नं. ............................

सदरच्या संमतिपत्राद्वारे मी माझा/माझी पाल्य ...................................................... याला/हिला क्षेत्रभेटीच्या ठिकाणी जाण्यास संमती देत आहे. आपण कोणती वाहतूकव्यवस्था केली आहे, याची मला माहिती आहे.

**पालकांची स्वाक्षरी**

पाल्याशी नाते ............................

- **क्षेत्रभेटीसाठी तयारी :**

  क्षेत्रभेटीसाठी शाळा सोडण्यापूर्वी खालील तयारी आवश्यक आहे :

  ✓ बरोबर घेतलेल्या वस्तूंची यादी.

  ✓ क्षेत्रभेटीसाठी येणाऱ्या बालकांची यादी.

  ✓ प्रथमोपचार पेटी.

  ✓ भ्रमणध्वनी क्रमांकाची यादी.

  ✓ बालकांना सुरक्षिततेचे नियम सांगणे.

  ✓ बालकांना क्षेत्रभेटीविषयी सर्व कल्पना देणे.

  ✓ योग्य सूचना देणे.

  ✓ बालकांच्या नावाची लेबल्स तयार करणे.

  ✓ लोकसेवार्थ असणारी वाहतुकीची सोय करावी किंवा पालकांना वाहनव्यवस्था करण्याची विनंती करावी.

  ✓ प्रत्येक ताई व मदतनीस यांनी जबाबदारी वाटून घ्यावी.

  ✓ आपत्कालीन प्रसंगी वापरावी लागेल, म्हणून काही रोख रक्कम जवळ ठेवणे.

  ✓ पालकांना मदतीसाठी आवाहन करावे.

**प्रत्यक्ष क्षेत्रभेटीच्या दिवशी :**



- बालकांची संख्या मोजावी.
- प्रौढ व्यक्ती व बालक यांचे प्रमाण योग्य राखावे.
- बरोबर घेतलेल्या वस्तू तपासून घ्याव्यात, यादी तपासावी.
- बालकांना परत एकदा सर्व सूचना द्याव्यात.
- शाळा सोडण्यापूर्वी बालकांना टॉयलेटला नेऊन आणावे.
- बालकांच्या शर्टवर त्यांच्या नावाची लेबल्स लावावीत.
- खाऊ व पाणी न विसरता घ्यावे.

या क्षेत्रभेटी जवळपासच्याच ठिकाणी बऱ्याचदा नेल्या जातात. उदा. पोस्ट ऑफिस, बाजार, छोटी बाग, शेत, आगीचा बंब असतो ते ठिकाण, दुकान, यंत्रे, बस स्टँड, रेल्वे स्टेशन, प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध असणारी ठिकाणे.

जवळच्या अंतरावरील क्षेत्रभेटीलासुद्धा तेवढीच तयारी लागते, फक्त अंतर व वेळ कमी लागतो.

## पोषण माह

अंगणवाडीमध्ये बालकांच्या पोषणाविषयी जनजागृती निर्माण होण्याच्या दृष्टीने सप्टेंबर व मार्च या महिन्यात ICDS विभागामार्फत 'पोषण माह' निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. पोषण माह संबंधित विविध उपक्रमांचे आयोजन हे बालकांचे वेळापत्रकानुसार दैनंदिन अध्ययन–अध्यापन संपल्यानंतर करण्यात यावे. मात्र अंगणवाडीताई या महिन्यातील आठवड्यांमध्ये आवश्यकतेनुसार वेळापत्रकातील कृतींचा क्रम लवचीक करू शकतात. उदा. जेवणाच्या सुट्टीनंतर घ्यावयाच्या 'कल्पक बनू' यातील कृती वर्गातील मुक्त खेळाच्या वेळी आयोजित करणे व जेवणानंतर वर्गातील मुक्त खेळ खेळण्यास संधी देणे. जेणेकरून ताईला पोषण माहच्या उपक्रमाचे पूर्वनियोजन देखील करण्यास वेळ मिळू शकेल.

## प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण (ECCE) दिवस

ECCE दिन हा बालपणीच्या विकासाचे महत्त्व आणि दर्जेदाररीत्या संगोपन आणि शिक्षण उपलब्ध करण्यात अंगणवाडीची व पालकांची भूमिका स्पष्ट करणारा उपक्रम आहे. ECCE दिनाच्या निमित्ताने सेविका व पालक यांनी एकत्र बैठका घेऊन बालकांच्या संगोपन व शिक्षणाबद्दल पालकांमध्ये जाणीव जागृती करून पालकांचा सहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे. ICDS विभागामार्फत दर महिन्याच्या १० तारखेस ECCE दिवस साजरा करण्यात येतो.

अंगणवाडीताईंना असे ECCE दिवस साजरे करण्यासाठी मदत व्हावी म्हणून खाली दिलेल्या QR Code मध्ये काही मार्गदर्शन देण्यात आले आहे. आपण पुढील QR Code Scan करून त्याचा लाभ घेऊ शकता.

## भाग ब : आठवडानिहाय वेळापत्रक

वेळापत्रकामध्ये प्रत्येक महिन्यासाठी एक विषयगोफ (थीम) दिला आहे. उदा. : प्राणी, वाहने इत्यादी. त्या विषयगोफानुसार त्या महिन्यामध्ये कृती घेणे अपेक्षित आहे. या सर्व कृती कशा घ्याव्यात ते सविस्तर दिले आहे. दिलेली कृती त्या महिन्यात दिलेल्या विषयगोफाला अनुसरून आवश्यक ते बदल करून करावी.

उदा. कृती क्र. १७ मध्ये 'पाहुणा ओळखूया' ही कृती मी, माझे कुटुंब आणि परिसर, पाणी–पाऊस, भाज्या व फळे, प्राणी' असे अनेक विषय गोफांसाठी दिलेले आहेत. ही कृती जर आपण 'मी, माझे कुटुंब आणि परिसर' या विषयगोफासाठी घेत असू तर ती पुढीलप्रमाणे घ्यावी. प्रथम बालकांना गोलाकार बसवावे. गोलात चार चित्रकार्डे किंवा चित्रपट्ट्या ठेवाव्यात. या चित्रकार्डांमध्ये तीन चित्रकार्डे ही एका प्रकारच्या वस्तूंची उदा. स्वयंपाकघरातील भांड्यांची असावीत व त्यातील एक चित्रकार्ड वेगळ्या वस्तूचे असावे, जसे : दप्तर किंवा चेंडू. त्यांना या चार चित्रांतील वेगळी वस्तू म्हणजेच पाहुणा ओळखायचा आहे. अशी सूचना देऊन त्यांना वेगळ्या वस्तूचे चित्र ओळखण्याची संधी द्यावी. मोठ्या गटास ही वस्तू तू पाहुणा म्हणून कशी ओळखलीस असे विचारून त्यांना त्यासंदर्भात बोलण्याची संधी देता येईल.

जर हीच कृती भाज्या व फळे या विषयगोफासाठी घ्यायची झाल्यास पाहुणा ओळखण्यासाठी द्यावयाच्या चित्रकार्डांमध्ये भाज्या आणि फळे याविषयींची चित्रकार्डे वापरावीत. जसे : तीन चित्रकार्डे ही पालेभाज्यांची, तर एक चित्रकार्ड फळभाजीचे असावे. बालकांना पाहुणा ओळखण्यास सांगावे.

या प्रकारे प्राणी या विषयगोफासाठी ही कृती घेताना तीन चित्रकार्डे पाळीव प्राण्यांची, तर एक जंगलातील प्राण्याचे घ्यावे किंवा याउलट तीन चित्रकार्डे जंगलातील प्राण्यांची, तर एक पाळीव प्राण्याचे घेता येईल. अशा प्रकारे दिलेली कृती ज्या विषयगोफासाठी आहे त्यानुसार चित्रकार्डांचा वापर करावा.

याप्रमाणे इतर कृतींचाही विषयगोफनुसार विचार करणे अपेक्षित आहे. यासाठी आपणसुद्धा आपल्या कल्पकतेचा अधिकाधिक वापर करून बालकांना विविध अनुभव देण्यासाठी सज्ज होऊया.

वेळापत्रकात नमूद **(कृ. प. बा. १,२, ३)** याचा अर्थ कृतिपत्रिका बालवाटिका १, २, ३ साठी असा लक्षात घ्यावा.

## आरंभीचे व समावेशाचे आठवडे

### आठवडा क्र. १ ते ४

**मुले काय शिकतील :**

- ओळख नसलेल्या व्यक्तींशी मोकळेपणाने संवाद साधण्यास सुरुवात करतील.
- इतर बालकांसोबत खेळण्यासाठी आणि काम करण्यासाठी तयारी दाखवतील. (उदा., खेळात सामील होण्यासाठी बोलावतील, परस्पर नियम पाळतील, वाटाघाटी करतील, खेळासाठी भूमिका घेतील.)
- खेळाधारित उपक्रमांमध्ये इतर बालकांसोबत भाग घेणे, पुढाकार घेणे आणि आनंद घेणे सुरू करतील.
- ओळखीच्या बालकांबरोबर उत्स्फूर्तपणे खेळण्यास प्राधान्य दाखवतील, आपल्या पालकांच्या मदतीने बालकांच्या गटात सामील होतील.
- पालक किंवा ओळखीच्या व्यक्तींशिवाय वर्गात राहण्याची भावना दर्शवतील. खेळण्यासाठी पालकांपासून स्वेच्छेने बहुतांश वेळा बाजूला होऊन खेळतील.

| | | वेळ | सोमवार / मंगळवार | बुधवार / गुरूवार | शुक्रवार / शनिवार |
|---|---|---|---|---|---|
| स्वागत आणि मुक्त खेळ | चला सुरुवात करूया. | ३० मि. | पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्ती यांनी बालकांसोबत बसून सक्रियपणे सहभाग घेऊ द्यावा. | पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्ती आणि अंगणवाडीताई यांनी एकमेकांशी संवाद साधावा व एकमेकांना ओळख करून द्यावी. | पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्ती आणि अंगणवाडीताई इतर बालकांसोबत खेळण्यात सहभाग घ्यावा. |
| | चला खेळूया. | ३० मि. | वयोगटानुसार अध्ययन कोपऱ्यांची व्यवस्था करा, खेळणी/पुस्तके/शैक्षणिक साहित्य प्रदर्शित करा आणि बालकांना हव्या त्या बाबींचा शोध घेऊ द्यावा. | बालकांना खेळणी उचलून खेळण्यासाठी प्रोत्साहित करा. | पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्ती आणि अंगणवाडीताईने बालकांना खेळणी वाटून घेण्यासाठी आणि एकत्र खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. |
| छोटी सुट्टी | | १० मि. | छोटी सुट्टी | | |
| | चला गाणी, गोष्टी सांगूया. | २० मि. | पालक, अंगणवाडीताई व बालके यांनी एकत्रित बसून गाणी म्हणावीत.<br>बालकांची आवड जाणून घेण्यासाठी परिचित/लोकप्रिय लोककथा/गोष्टी/छंद यांवर भर द्यावा. | अंगणवाडीताईने सांगितलेली गोष्ट किंवा गाणी पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्ती यांनी आपल्या बालकांना त्या गोष्टी व गाणी पुन्हा सांगावी आणि बालकांना समजावून सांगावे. | पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्ती छोट्या गटातील बालकांसोबत चित्र पुस्तक/गोष्ट सांगणे/वाचन यामध्ये सहभाग घ्यावा. |
| | चला नवीन काही शिकूया. | २० मि. | • अंगणवाडीताईने (AWW) एक अध्ययन निष्पत्ती निवडावी आणि बालकांना खेळण्यासाठी खेळणी/शैक्षणिक साहित्य (TLM) देऊन त्यांच्या खेळाचे निरीक्षण करावे.<br>• पालक/घरातील काळजी घेणाऱ्या व्यक्तीने प्रदान केलेले शैक्षणिक साहित्य (TLM) वापरून आवश्यक परिणाम साध्य करण्यासाठी संवाद साधावा.<br>• अंगणवाडीताईने छोटे/मोठे गट तयार करून आणि बालकांच्या वर्तमान स्थितीतील अध्ययन पातळीचे निरीक्षण नोंदवावे.<br>• बालकांच्या खेळात सहभाग घेण्यासाठी अंगणवाडीताईने इतर बालकांसोबत एकत्र खेळावे आणि खेळणी/गोष्टी/संवादांची देवाणघेवाण करावी. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मंगळवार | गाणी | सर सर उंच | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | गगा आणि गगीची गोष्ट | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | झाडांचे बोल | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | ससा आणि आजीबाई | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | खाऊन टाका | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. १४ वनस्पती (फुले आणि शेती) | सोमवार | गोष्ट | सिंह आणि उंदीर | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | फुलांचा राजा | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | ही पिसे कोणाची | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | आजोबांचे शेत | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | बछड्याची डरकाळी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | अटटू गट्टू | हस्तपुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| आठवडा क्र. १५ वनस्पती (फुले आणि शेती) | सोमवार | गोष्ट | फुलांची दोस्ती | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | एक बडी गाजर | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | बांबूचे उपयोग | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | इतना बडा पहाड | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | बछडयाची डरकाळी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | चना किसने बोया | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. १६ वनस्पती (फुले आणि शेती) | सोमवार | गोष्ट | फुलांची दोस्ती | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | चना किसने बोया | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | गगा आणि गगीची गोष्ट | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | फुलांचा राजा | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | ससा आणि आजीबाई | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | आजोबांचे शेत | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. सराव १ | सोमवार | गोष्ट | झाडांची गरज | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | अटट्रू गट्टू | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | फुलांची दोस्ती | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | एक बडी गाजर | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | बांबूचे उपयोग | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | इतना बड़ा पहाड | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. सराव २ | सोमवार | गोष्ट | अप्पूचे स्वप्न | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | आई मला | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | शेरू आणि चंपी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | दख्खनची राणी | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | वैशालीचे रंगकाम | हस्तपुस्तिका |
| | शनिवार | गाणी | आजी | हस्तपुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| आठवडा क्र. सराव ३ | सोमवार | गोष्ट | मोहाची फुले | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | ये रे ये रे पावसा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | जंबो आणि मिनू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | रिमझिम सरी ग | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | चल रे भोपळ्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | छत्रीबाई छत्रीबाई | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. १७ प्राणी (जंगली व पाळीव) | सोमवार | गोष्ट | दोन बकऱ्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | ट्रिंग ट्रिंग | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | उंदीर | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | सांगतं कोण ? | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | राजू आणि मिनू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | थरथर हलते पाणी जेव्हा | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. १८ प्राणी (जंगली व पाळीव) | सोमवार | गोष्ट | बेडकाची शर्यत | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | हत्तीदादा | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | दोन बकऱ्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | दोन लहान उंदीर | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | पिंकू आणि सोनू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | बैलजोडी | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. १९ प्राणी (जंगली व पाळीव) | सोमवार | गोष्ट | मांजराची मेजवानी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | जंगलातल्या प्राण्यांनी | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | उंदीर | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | इटूकली मिटूकली | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | राजू आणि मिनू | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | एक होता ससा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| आठवडा क्र. २० प्राणी (जंगली व पाळीव) | सोमवार | गोष्ट | दोन बकऱ्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | कोंबडेदादा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | बेडकाची शर्यत | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | खार बाई खार | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | दोन बकऱ्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | लाडोबा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. २१ पक्षी आणि कीटक | सोमवार | गोष्ट | बडबडे कासव | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | मोरा मोरा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | हुशार मुंग्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | मिठ्ठू | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | मुंगी आणि फुलपाखरू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | या चिमण्यांनो | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. २२ पक्षी आणि कीटक | सोमवार | गोष्ट | फरीदा की दावत | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | लिटल बर्ड | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | चांदणी आणि तिची सात पिल्ले | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | निसर्गाचे सोबती | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | पंछियों की पाठशाला | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | सहा पाय डासाला | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. २३ पक्षी आणि कीटक | सोमवार | गोष्ट | चिमणा चिमणी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | एक होते सुरवंट | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | रंगीत पाखरू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | छान किती दिसते | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| | शुक्रवार | गोष्ट | कोंबडी आणि अंड | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | मोरा मोरा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. २४ पक्षी आणि कीटक | सोमवार | गोष्ट | हुशार मुंग्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | मिठ्ठू | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | ही पिसे कोणाची | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | या चिमण्यांनो | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | फरीदा की दावत | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | लिटल बर्ड | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. २५ ऋतू | सोमवार | गोष्ट | हुशार कावळा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | सर्दी आयी | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | राजूचा माठ | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | बादल गर्जे | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | पाऊस पाड ना | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | टिम्बक टू | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. २६ ऋतू | सोमवार | गोष्ट | Raju and Squirrel | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | आली हवा | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | Chintoo | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | गर्मी आयी | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | हुशार कावळा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | टिम्बक टू | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. २७ ऋतू | सोमवार | गोष्ट | पाऊस पाड ना | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | आली हवा | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | राजूचा माठ | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| | गुरुवार | गाणी | लवलव साळूबाई | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | Raju and Squirrel | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | टिम्बक टू | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. २८ ऋतू | सोमवार | गोष्ट | Chintoo | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | आली हवा | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | Raju and Squirrel | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | बादल गर्जे | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | पाऊस पाड ना | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | गर्मी आयी | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. २९ वाहन | सोमवार | गोष्ट | टोपीवाला आणि माकडे | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | चाललो आम्ही | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | झुकझुकची शाळा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | लाल टांगा | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | मूनमून आणि मुन्नू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | नाव चली | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. ३० वाहन | सोमवार | गोष्ट | Meher on the Road | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | दख्खनच्या राणी | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | झुकझुकची शाळा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | गाडी कशी धावते | बालभारती |
| | शुक्रवार | गोष्ट | मूनमून आणि मुन्नू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | नौ सवारी | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| आठवडा क्र. ३१ वाहन | सोमवार | गोष्ट | Meher on the Road | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | लाल बत्ती कहती रुको | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | टोपीवाला आणि माकडे | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | नाव चली | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | झुकझुकची शाळा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | चाललो आम्ही | हस्तपुस्तिका |
| आठवडा क्र. ३२ वाहन | सोमवार | गोष्ट | मूनमून आणि मूननू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | लाल टांगा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | Meher on the Road | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | दख्खनच्या राणी | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | झुकझुकची शाळा | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | गाडी कशी धावते | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. ३३ मदतनीस | सोमवार | गोष्ट | एकीचे बळ | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | क्लाऊड्स | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | टेडी आणि बडी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | माऊची पिल्लं | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | दिनूचे बिल | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | हम्मा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. ३४ मदतनीस | सोमवार | गोष्ट | Beera in the Forest | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | धोबी आया | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | मुंगी ताईची सहल | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |

| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |
|---|---|---|---|---|
| | गुरुवार | गाणी | जंगलातल्या प्राण्यांनी | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | Dilbar and Mario in the Park | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | नाई क्या क्या करता | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. ३५ मदतनीस | सोमवार | गोष्ट | गुलगुले | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | टिम्बक टू | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | एकीचे बळ | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | आली हवा | हस्तपुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | टेडी आणि बडी | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | धोबी आया | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. ३६ मदतनीस | सोमवार | गोष्ट | दिनूचे बील | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | मोरा मोरा | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | Beera in the forest | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | नाई क्या क्या करता | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | मुंगी ताईची सहल | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | या चिमण्यांनो | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. सराव ४ | सोमवार | गोष्ट | Dilbar and Mario in the Park | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | सहा पाय डासाला | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | गुलगुले | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | एक होते सुरवंट | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | वैशालीचे रंगकाम | हस्तपुस्तिका |
| | शनिवार | गाणी | छान किती दिसते | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| वार व विषय | आठवडा | गोष्ट व गाणी | गोष्टीचे/ गाण्याचे नाव | गोष्ट किंवा गाणे उपलब्धतेचा संदर्भ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आठवडा क्र. सराव ५ | सोमवार | गोष्ट | मोहाची फुले | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | सहा पाय डासाला | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | जंबो आणि मिनू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | एक होते सुरवंट | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | चल रे भोपळ्या | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | छान किती दिसते | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| आठवडा क्र. सराव ६ | सोमवार | गोष्ट | उंदीर | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | मंगळवार | गाणी | पळा रे पळा | हस्तपुस्तिका |
| | बुधवार | गोष्ट | राजू आणि मिनू | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | गुरुवार | गाणी | मिळून खेळूया | बालभारतीमार्फत प्रकाशित गाण्यांची पुस्तिका |
| | शुक्रवार | गोष्ट | बडबडे कासव | बालभारतीमार्फत प्रकाशित गोष्टींची पुस्तिका |
| | शनिवार | गाणी | आली हवा | हस्तपुस्तिका |

वरील यादीतील गाणी ही सूचक आहेत. यासोबत अधिकची गाणी म्हणवून घ्यावीत. याशिवाय बालकांच्या आवडीनुसार बोलीभाषेतील तसेच इंग्रजी व हिंदी भाषेतील बडबडगीते/गाणी ही देखील समाविष्ट करावीत. निळ्या रंगात दर्शविलेल्या गोष्टींसाठी बालभारतीमार्फत उपलब्ध कार्यपुस्तिकेत गोष्टींची चित्रे दिली आहेत. ती कापून पुठ्ठ्यावर चिटकून घ्यावीत. तयार झालेल्या चित्र कार्डांचा गोष्ट सांगण्यासाठी वापर करावा.

गाणी व गोष्टींसाठी स्कॅन करा.

## ब) गंमत गाणी

### (१) आई मला....

आई मला छोटीशी मोटार घे ना,
मोटार मी घेईन, ड्रायव्हर मी होईन
गावाला जाईन, पॉम्, पॉम्, पॉम् ।।१।।
आई मला छोटीशी बस घे ना,
बस मी घेईन, कंडक्टर मी होईन
तिकीट काढीन, पट, पट, पट ।।२।।
आई मला छोटेसे जहाज घे ना,
जहाज मी घेईन, कॅप्टन मी होईन
पाण्यावरून जाईन, सर, सर, सर ।।३।।
आई मला छोटेसे विमान घे ना,
विमान मी घेईन, पायलट मी होईन
आकाशातून जाईन, भर, भर, भर ।। ४।।

### (२) दख्खनच्या राणी

दख्खनच्या राणी तू नेतेस का मला?
पेशवाई पुणे पहायचे मला ।।ध्रु।।
गाडीचा आवाज धड धड, झुक झुक आणि फूस फूस
हे जिंगल जिंग जिंगल जिंग आवडतंय मला
दख्खनच्या राणी तू नेतेस का मला
आई नि बाबा जाऊन आले,
पुणे शहर पाहून आले
मला मात्र नेलं नाही सांगते तुला, ।।१।।
खिडकीतली जागा बसायला हवी
दऱ्या नि डोंगर पहायला हवी
डोकं बाहेर काढणार नाही सांगते तुला, ।।२।।

### (३) आजी

आजी मी तुझ्याशी खेळेन ग ।।
हांड्यावरती तपेलं, चुलीवरती पातेलं,
तुझं माझं घरकुल मांडीन ग ।।१।।
दाण्याचा लाडू, गुळाची पोळी,
पोह्याचा भात तुला शिकवीन ग ।।२।।
भराभरा जेवीन, ऑफीसला जाईन,
येताना खाऊ तुला आणीन ग ।।३।।
रात्र करू मौजेची, गोष्ट सांग तू राजाची,
तुझ्या कुशीत मी झोपेन ग ।।४।।

### (४) जेवण

पीठ चाळ सरसर
कणीक भिजव भरभर
भाजी कर चमचमीत
दशमी कर खुसखुशीत
कोशिंबीर कर चटकन
जेवून टाक पटकन

### (५) चिकूपिकू

एक होता चिकू, एक होता पिकू
दोघे निघाले फिरायला, नदीतून पोहायला
नदीत दिसला लाल फुगा, दोघे म्हणाले त्यावर बसा
फुगा चालला तरंगत, चिंकू पिंकू बसले हसत
वरून पाहिले घारीने, टोक मारली चोचीने
फुगा फुटला फटकन्, दोघे पडले धपकन्
पोहत पोहत आले वरती, अशी झाली त्यांची फजिती

### (६) गोल–गोल

सूरज गोल, चंदा गोल,
मम्मी जी की रोटी गोल,
पापा जी के पैसे गोल।
दादा जी का डंडा गोल,
दादी जी का चश्मा गोल।
हम भी गोल, तुम भी गोल
सारी दुनिया गोल मटोल

### (७) चन्दा मामा

चन्दा मामा गोल मटोल,
कुछ तो बोल, कुछ तो बोल
कल थे आधे, आज तो गोल,
खोल भी दो अब अपनी पोल।
रात होते ही तुम सांग–साथ सितारे लाते ।
लेकिन हदन में किाँ छिप जाते,
कुछ तो बोल, कुछ तो बोल ।

## (८) इन्ना मिन्ना

इन्ना मिन्ना घोडा दोडाओ । इन्ना मिन्ना घोडा दोडाओ ।
घोडे को चोट लगी – मलम लगाओ ।
मलम पे मख्खी बेठी – चदर ओढाओ ।
चदर का कोना फटा – दर्जी बुलाओ ।
तुटी दर्जी की सुई तुटी – लोहार बुलाओ।
लोहार का हात तुटा – डॉक्टर बुलाओ ।
डॉक्टर की  बॅग खोई – पुलिस बुलाओ ।
पुलिस, की टोपी उडी – उठा के दे दो ।

## (१०) भाज्या

गोड गाजर, कारली कडू
कांदा चिरताना येते रडू
शेवगा, भेंडी खूप चवदार
कोबी, काकडी आवडे फार
चवळीच्या शेंगा हिरव्यागार
पालक, मेथी खावी गवार
पसंत कुणाची बटाटा, मुळा
कुणी खातो दुधी भोपळा

## (९) कोकण आपले

झाडावरून आंबा पडला,
टुणकन जाऊन टोपलीत बसला
फणसबुवा हळूच हसला,
पोट धरून पेटीत बसला
आंब्याची टोपली, फणसाची पेटी
सरकत सरकत बोटीत बसली
भो भो भो भो वाजला भोंगा
उभा होता मुंबईचा टांगा
टांगा मोटार झाली टक्कर
फणसबुवांना आली चक्कर
आंबा गेला गडगडत
फणसबुवा गेले धडपडत
आंबा झाला पिवळा पिवळा
फणसाचा झाला लोळा गोळा
नको रे बुवा मुंबईची हवा
कोकण आपले बरे बुवा.

## (११) डाळिंब

डाळिंब असते लाल लाल
सफरचंदाचे तर गुलाबी गाल
आंबा हा तर फळांचा राजा
मला आवडतो पेरू ताजा

## (१२) फुलांचा राजा

गुलाब फुलांचा आहे राजा
बघा मोगरा आहे ताजा
सूर्यफूल हे पाहा डुले
पाण्यावरती कमळ फुले

## (१४) गाडी आली गाडी आली

गाडी आली गाडी आली चला पळारे,
गाडी थांबली, गाडी थांबली धक्का मारा रे ।।ध्रु।।
गाडी आली नाशिक वरून
द्राक्षं आणली भरून भरून
द्राक्षं उतरून घ्यारे आणि धक्का मारा रे ।।१।।
गाडी आली नागपूर वरून
संत्री आणली भरून भरून
संत्री उतरून घ्यारे आणि धक्का मारा रे ।।२।।
गाडी आली कोकणातून,
आंबे आणले भरून भरून,
आंबे उतरून घ्या रे आणि धक्का मारा रे ।।३।।

## (१३) आजोबांचे शेत

आज एका आजोबांचे शेत पाहून येऊ
शेतामध्ये लावला त्यांनी एकदा खूप गहू
भराभर गहू कापूया
गरम पोळी खाऊया
आज एका आजोबांचे शेत पाहून येऊ
शेतामध्ये लावला होता त्यांनी एकदा खूप ऊस
भराभर ऊस तोडूया
गोड साखर खाऊया
आज एका आजोबांचे शेत पाहून येऊ
शेतामध्ये लावला होती त्यांनी एकदा खूप ज्वारी
भराभर ज्वारी कापूया
खमंग भाकरी खाऊया
आज एका आजोबांचे शेत पाहून येऊ
शेतामध्ये लावली होती त्यांनी एकदा खूप तूर
भराभर तूर तोडूया
गरम आमटी पिऊया
आजोबांनी धान्य पिकवलं
शेतांतून आमच्या ताटात आलं
सगळे भरपेट जेऊया
ढुर्रकन ढेकर देऊया

– डॉ. वृषाली देहाडराय

## (१५) अट्टू आणि गट्टू

अट्टू आणि गट्टू फिरायला चालले
फिरायला चालले ।।ध्रु।।
अट्टू आणि गट्टू फिरायला चालले,
जाता जाता चालले जंगलातून ।।२।।
जंगलात दिसली छोटीशी झुडपे
छोट्याशा वेली मोठी मोठी झाडे
झाडावर चढता येईच ना ।।१।।
अट्टू गट्टू फिरायला चालले,
जाता जाता चालले जंगलातून ।।२।।
जंगलात ऐकली कोल्ह्याची कोल्हेकुई,
सिंहाची गर्जना, वाघाची डरकाळी, ।।२।।
अट्टू आणि गट्टू फारच भ्यायले
रडायला लागले ।।३।।
तिकडून आले घोडेस्वार
टप टप टप टप घोडेस्वार ।।४।।
अट्टू आणि गट्टू घोड्यावर बसले
हसायला लागले ।।५।।

## (१६) एक बड़ी गाजर

अट्टू आणि गट्टू फिरायला चालले
फिरायला चालले ।।ध्रु।।
अट्टू आणि गट्टू फिरायला चालले,
जाता जाता चालले जंगलातून ।।२।।
जंगलात दिसली छोटीशी झुडपे
छोट्याशा वेली मोठी मोठी झाडे
झाडावर चढता येईच ना ।।१।।
अट्टू गट्टू फिरायला चालले,
जाता जाता चालले जंगलातून ।।२।।
जंगलात ऐकली कोल्ह्याची कोल्हेकुई,
सिंहाची गर्जना, वाघाची डरकाळी, ।।२।।
अट्टू आणि गट्टू फारच भ्यायले
रडायला लागले ।।३।।
तिकडून आले घोडेस्वार
टप टप टप टप घोडेस्वार ।।४।।
अट्टू आणि गट्टू घोड्यावर बसले
हसायला लागले ।।५।।

## (१७) ट्रिंग ट्रिंग

ट्रिंग ट्रिंग ट्रिंग ट्रिंग
ऐकू आली फोनची रिंग
कुणीच नाही फोनपाशी
उंदीरमामा बिळापाशी !
उंदीरमामा हसले मिशीत,
टेबलावरती चढले खुशीत –
फोन लावला कानाला
जोरात लागले बोलायला –
''उंदीरमामा मी इकडे;
कोण बोलतंय हो तिकडे? ''
– विचारले मामांनी झटकन
उत्तर आले की पटकन –
''मी तुमची मनीमावशी,
कालपासून आहे उपाशी.''
– उंदीरमामा भलते हुशार,
मनीचा आवाज ऐकून बिळात पसार!!

## (१८) सांगतं कोण?

पहाट झाली – सांगतं कोण?
कुकुचकू कोंबडा – आणखी कोण?
लाल लाल पेरू खातं कोण?
विठू–विठू पोपट – आणखी कोण?
ताजं–ताजं दूध – देतं कोण?
गोठ्यातली हम्मा – आणखी कोण?
चोरून दूध – पितं कोण?
म्यॉव म्यॉव माऊताई – आणखी कोण?
घराची राखण – करतं कोण?
भू: भू: कुत्रा – आणखी कोण?
बागेतली भाजी – खातं कोण?
मऊ मऊ ससेभाऊ – आणखी कोण?

## (१९) थरथर हलते पाणी जेव्हा

थरथर हलते पाणी जेव्हा
मासा म्हणतो गाणी तेव्हा
सळसळ जेव्हा होते पानात
साप तेव्हा येतो रानात
स्तब्ध होते जंगल किती
डरकाळीला सगळेचे भीती
झाडाचे झाले हातच वाकडे
लटकली जेव्हा फांदीला माकडे
आकाशात वाजला ढगांचा बाजा
गरजला जेव्हा जंगलचा राजा
पांढरे ठिपके सोनेरी रंग
कुणाचे एवढे चमकते अंग?
छोटेसे पाय अन् भले मोठे पोट
अस्वलाने घेतला मधाचा घोट

– जयेश जोशी

## (२०) हत्तीदादा हत्तीदादा

हत्तीदादा हत्तीदादा, केवढे तुमचे पोट ।
कितीतरी कापड लागेल, शिवायला कोट ।।१।।
हत्तीदादा हत्तीदादा, दात केवढे मोठे ।
रोज सकाळी साफ करायला, हवेत खराटे ।।२।।
हत्तीदादा हत्तीदादा, केवढे मोठ्ठे तुमचे कान ।
आईने का ओढून ओढून, केले आहेत इतके लांब ।। ३।।
हत्तीदादा हत्तीदादा, पाय तुमचे केवढे लठ्ठ ।
मिळायचा नाही कोठे, तुमच्या पायासाठी बूट ।।४।।
लठ्ठ लठ्ठ पाय उचलून धावता कसे दुडूदुडू ।
सोंड अडकून पायामध्ये, नका कुठे हो धडपडू ।।५।।
मोठे पोट, मोठे दात, कान मोठे, मोठे पाय ।
डोळे मात्र बारीक याचे कारण सांगाल काय ।।६।।

## (२१) दोन लहान उंदीर

दोन लहान उंदीर, विणायला बसले,
विणायला बसले, विणायला बसले
तिकडून एका मांजराने डोकावले,
मांजराने डोकावले, मांजराने डोकावले
तुम्ही काय करता रे उंदरांनो,
काय रे उंदरांनो, काय रे उंदरांनो
बाळासाठी आम्ही कपडे विणतो,
कपडे विणतो, कपडे विणतो
आम्ही यावे का मदत करायला,
मदत करायला मदत करायला
नको नको बाईसाहेब, डोके की हो उडवाल, डोके की हो उडवाल.

## (२२) बैलजोडी

आमच्या मळ्यात आहे बैलगाडी (२)
तिला चालवते एक बैलजोडी (२)
एकाचे नाव आहे काळ्या
दुसऱ्याचे नाव आहे पांढऱ्या
आमच्या मळ्यात आहे बैलगाडी,
तिला चालवते एक बैलजोडी
दोघे आहेत धष्टपुष्ट
रानात करतात खूप कष्ट
आमच्या मळ्यात आहे बैलगाडी
तिला चालवते एक बैलजोडी
काळ्या खातो उसाचे वाढे
पांढऱ्या खातो गवताचे काढे
आमच्या मळ्यात आहे बैलगाडी
तिला चालवते एक बैलजोडी
बेंदूरला आम्ही त्यांना रंगवतो
गावात सगळ्या त्यांना मिरवतो
आमच्या मळ्यात आहे बैलगाडी
तिला चालवते एक बैलजोडी

## (२५) निसर्गाचे सोबती

मुंगी सदा घाईत, घास नेते खाईत
मुंगळा आहे हुशार, कण घेऊन पसार
सापाची कशी कमाल, आयत्या बिळात धमाल
सरड्याचे तीन रंग, लाल पिवळे हिरवे अंग
कोळी विणतो जाळे, गोल गोल वाटोळे
डास नुसता फिरतो जरी, कानामध्ये भुणभुण करी
गांधील माशी चावा घेई, दैना सगळी होऊन जाई
फुलपाखरू किती छान, निसर्ग आपला किती किती छान

## (२३) टिम्बक टू

टिम्बक टू रे टिम्बक टू
उन्हाळ्यात खातो लिंबू
गारेगार पिऊनी सरबत
आणि म्हणतो सुसुसू

– जयेश जोशी

## (२४) जंगलातल्या प्राण्यांनी

जंगलातल्या प्राण्यांनी जेवण बनवले
कुणी काय केले? कुणी काय केले? ।।धृ।।
तिकडून आला हत्ती तिकडून आला हत्ती
तो म्हणाला सर्वांना मी वाढतो पंगती ।।१।।
तिकडून आला ससा, तिकडून आला ससा
तो म्हणाला ताट वाटी पुसा नि मांडी घालून बसा ।।२।।
तिकडून आली चिमणी, तिकडून आली चिमणी
ती म्हणाली, सर्वांना वाढते मी चटणी ।।३।।
तिकडून आला वाघ, तिकडून आला वाघ
तो म्हणाला सर्वांना मी वाढतो भात ।।४।।
तिकडून आले हरीण, तिकडून आले हरीण
ते म्हणाले सर्वांना मी वाढतो वरण ।।५।।
तिकडून आले माकड, तिकडून आले माकड
ते म्हणाले सर्वांना, मी वाढतो पापड ।।६।।

## (२६) आली हवा

आली हवा, गेली हवा
सर सर सर सर चालली हवा
आली हवा, गेली हवा
सर सर सर सर चालली हवा
आला सूर्य आला, आला सूर्य आला
आला सोबत घेऊन, गरम गरम हवा
आली हवा गेली हवा
सर सर सर सर चालली हवा
आला चंद्र आला, आला चंद्र आला
आला सोबत घेऊन, थंड गार हवा
आली हवा गेली हवा
सर सर सर सर चालली हवा
गोल गोल गोल गोल, फिरली हवा
नाच नाच नाच नाच, नाचली हवा
गोल गोल गोल गोल फिरली हवा
नाच नाच नाच नाचली हवा
आली हवा गेली हवा
सर सर सर सर गेली हवा

## (२७) लाल टांगा घेऊन आला लाला टांगेवाला

लाल टांगा घेऊन आला लाला टांगेवाला
ऐका लाला गातो गाणे ल लल ल लल ला...
लालेलाल सदरा, त्याची विजार लालेलाल
लालेलाल टोपी, त्याचा गोंडा लालेलाल
लाल परकर नेसून आली लीला बोले त्याला,
देखा लाला गातो गाणे ल लल ल लल ला...
लीला बसली टांग्यामध्ये टांगा सुरू झाला
ऐका लाला गातो गाणे ल लल ल लल ला...

## (२८) चाललो आम्ही खेळ खेळायला

चाललो आम्ही खेळ खेळायला (२)
येणार तुम्ही का लवकर बोला (२)
डब्ब्याडब्ब्यांची आली गाडी
झुक झुक झुक आवाज काढी
बोगद्यातून जाऊया गावाला
येणार तुम्ही का लवकर बोला
पो पो पो आली मोटार
धुळीची उडाली पावडर फार
जाऊया आपण कोकणाला
येणार तुम्ही का लवकर बोला
घर घर येईल विमानाची
संधी मिळते उडण्याची
आकाशात उंच उडण्याला
येणार तुम्ही का लवकर बोला
नावेतून जाऊ प्रवासाला
मज्जा वाटेल हो तुम्हांला
सप सप वल्हे वल्हवायला
येणार तुम्ही का लवकर बोला
चाललो आम्ही खेळ खेळायला
चाललो आम्ही खेळ खेळायला
येणार तुम्ही का लवकर बोला
येणार तुम्ही का लवकर बोला (२)

## (२९) पळा रे पळा

पळा रे पळा, पळा रे पळा;
गोलावर सर्व जण पळा रे पळा
पळा रे पळा, पळा रे पळा
गोलावर सर्व जण पळा रे पळा
उडा रे उडा, उडा रे उडा;
वाऱ्यावर सर्व जण उडा रे उडा
उडा रे उडा उडा रे उडा;
वाऱ्यावर सर्व जण उडा रे उडा
नाचा रे नाचा, नाचा रे नाचा;
थय थय थय थय नाचा रे नाचा
थय थय थय नाचा रे नाचा
हसा रे हसा, हसा रे हसा
ही ही ही ही हसा रे हसा
ही ही ही ही हसा रे हसा
बसा रे बसा, बसा रे बसा
गोलावर सर्व जण बसा रे बसा
निजा रे निजा, निजा रे निजा
डोळे मिटून शांत जरा निजा रे निजा
डोळे मिटून शांत जरा निजा रे निजा

## (३०) प्राण्यांची जत्रा

एकदा प्राण्यांची भरली जत्रा, (२)
एकूण प्राणी आले त्यात सतरा, (२)
एकदा प्राण्यांची भरली जत्रा (२)
एक होता वाघ एक होता वाघ, (२)
त्याला यायचा फार फार राग (२)
एकदा प्राण्यांची भरली जत्रा (२)
दोन होते हत्ती दोन होते हत्ती, (२)
करीत होते खूप खूप मस्ती (२)
एकदा प्राण्यांची भरली जत्रा (२)
तीन होते घोडे तीन होते घोडे, (२)
खेळत होते तिघे पत्ते थोडे थोडे (२)
एकदा प्राण्यांची भरली जत्रा (२)
चार होते गेंडे चार होते गेंडे, (२)
उभे हातात धरून छोटे मोठे झेंडे (२)
एकदा प्राण्यांची भरली जत्रा (२)
पाच होती माकडे पाच होती माकडे, (२)
कोणाला येऊ देत नव्हती तिकडे (२)
एकदा प्राण्यांची भरली जत्रा, (२)
अशी आहे ही प्राण्यांची जत्रा (२)
बोल तू बघायला येतोस का मित्रा (२)

## (३१) फट फटाका

सण आला घरा, फराळाचे करा
लावा दिवा पणती, उजळू दे भिंती
गूळ साखर हसली, करंजीत जाऊन बसली
कुरकुरीत चकली, पोटभर खाल्ली
सोनियाचे ताट, चंदनाचा पाट
आली आली दिवाळी, बहीण भावा ओवाळी
फट फटाका फुटला, धम धमाका झाला

## (३२) एक होती इडली

एक होती इडली
ती फार चिडली
धावत धावत आली
सांबारात जाऊन पडली
सांबार होते गरम गरम
इडली झाली नरम नरम
चमचा आला खुशीत
जाऊन बसला बशीत
चमच्याने पाहिले इकडे तिकडे
इडलीचे केले तुकडे तुकडे
इडली झाली होती मस्त
मुलांनी केली सगळीच फस्त

## (३३) मनीमाऊ

मनीने चोरली साय
ऐका, एकदा झाले काय !
दुधावर जमली छानशी साय
सायीवर टपली मनीमाऊ
राखणीला होता मोतीभाऊ
मोती तिथेचे बसला हटून
मनीला साय मिळेल कोठून?
मनीने केली युक्ती एक
मोतीच्या पुढ्यात टाकला केक
मोतीला वाटले, पडले काय?
मनीने चटकन चोरली साय

– प्रसेनजित गायकवाड

## (३४) गाडी आली गाडी आली झुक् झुक् झुक्

गाडी आली गाडी आली – झुक् झुक् झुक्शिट्टी कशी
वाजे बघा – कुक् कुक् कुक्इंजिनाचा धूर निघे – भक्
भक् भक् चाके पाहू तपासून – ठक् ठक् ठक् जायचे का
दूर कोठे – भूर् भूर् भूर् कोठेहि जा नेऊ तेथे – दूर दूर
दूर तिकिटाचे पैसे काढा – छन् छन् छन् गाडीचीही घांट
वाजे – घण् घण् घण् गाडीमधे बसा चला – पट पट पट
सामानाहि ठेवा सारे – चट चट चट
नका बघू डोकावून – शुक् शुक् शुक् गाडी
आता निघालीच – झुक् झुक् झुक्

## (३५) कोण काय करतं?

कोण काय करते? कोण काय करते?
बाबा काय करतो? बाबा काय करतो?
भाजी चिरतो, भाजी चिरतो
आई काय करते? आई काय करते?
बाजार आणते, बाजार आणते
ताई काय करते? ताई काय करते?
अभ्यास करते, अभ्यास करते
दादा काय करतो? दादा काय करतो?
अभ्यास करतो, अभ्यास करतो
काकी काय करते? काकी काय करते?
टीव्ही बघते, टीव्ही बघते
काका काय करतो? काका काय करतो?
स्वयंपाक करतो, स्वयंपाक करतो
नानी काय करते? नानी काय करते?
पेपर वाचते, पेपर वाचते
नाना काय करतात? नाना काय करतात?
गाणी म्हणतात, गाणी म्हणतात
सगळे काय करतात? सगळे काय करतात?
कामे करतात, कामे करतात
मी काय करतो? मी काय करतो?
सगळ्यांना पाहतो, सगळ्यांना पाहतो
मी काय करते? मी काय करते?
सगळ्यांना पाहते, सगळ्यांना पाहते

## (३६) लाह्या फोडणे

या लाह्या कशाच्या?
या लाह्या मक्याच्या....
या लाह्या कशाच्या?
या लाह्या जोंधळ्याच्या....
या लाह्या कशाच्या?
या लाह्या साळीच्या....
या लाह्या कशाच्या?
या लाह्या राजगिऱ्याच्या....

## (३७) आई करते गंमत

आई हसली आणि बोलली,
फळीवर डबा, लाडूचा डबा... ताई काढेल
वारा भरभर, कचरा घरभर... दादा काढेल
बॅट आणायची, बॉल आणायचा... ताई खेळेल
शिवणापाणी आणि लंगडी... दादा खेळेल
झूऽऽझूऽऽ झूऽझू गाडी चालवायची... ताई चालवेल
झर झर झर झर सायकल चालवायची... दादा चालवेल
ढम ढम ढम ढम वाजवायचा ढोल... ताई वाजवेल
झन झन झन झन वाजवायचा झांज... दादा वाजवेल
शिट्टी मारीत शूर पोलीस... ताई होईल
टक टक टक टक मोजे रुमाल... दादा विणेल
हे दादाचे, ते ताईचे काम असे काही नाही
ताई दादा दोघांनाही जमते सगळे काही
चिंगी आमची कामामध्ये खटपट लुडबुड करते
या नकटीला आतापासून सारे काही जमते

– विद्याधर शुक्ल

## (३८) ससा ससा

ससा ससा, दिसतो कसा ?
कापूस पिंजून ठेवलाय जसा !
लाल लाल, डोळे छान,
लहान शेपूट, मोठे कान.
पाला खाऊन फुगतो टुम,
चाहूल लागताच पळतो धूम !

## (३९) करंगळी मरंगळी

करंगळी, मरंगळी, मधले बोट, चाफेकळी, अंगठा ।
तळहात, मळहात, कोपर, खांदा ।।
गळागुट्टी, मानगुट्टी, हनुवटी, गालाच्या पुऱ्या ।
दाताचे बोळके, नाकावरचा राग ।।
काजळाच्या डब्या देवाचा पाट ।
वर चिमण्यांचा किलबिलाट ।।

## (४०) इतना बड़ा पहाड़

इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़
इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़, पेड़ पे टहनी
इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़, पेड़ पर टहनी, टहनी पे घोसला
इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़, पेड़ पर टहनी, टहनी पे घोसला, घोसले मे चिड़िया
इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़, पेड़ पर टहनी, टहनी पे घोसला, घोसले में चिड़िया, चिड़िया की चोच
इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़, पेड़ पर टहनी, टहनी पे घोसला, घोसले में चिड़िया, चिड़िया की चोच, चोच मे संदेश
इतना बड़ा पहाड़, पहाड़ पे पेड़, पेड़ पर टहनी, टहनी पे घोसला, घोसले में चिड़िया, चिड़िया की चोच, चोच में संदेश, हम सब एक हैं, हम सब एक हैं ।

## (४१) मछली जल की रानी है

मछली जल की रानी है
जीवन उसका पानी है
हाथ लगाओ तो डर जाएगी
बाहर निकालो तो मर जाएगी
पानी मे डालो तो तैर जाएगी
पानी मे डालो तो तैर जाएगी

## (४२) चुहिया रानी

चुहिया रानी, चुहिया रानी
लगती हो तुम बडी सयानी ।
जैसे हो इस घर की रानी,
तभी तो करती हो मनमानी ।
कुतर–कुतर सब कुछ खा जाती,
आहट सुन झटसे छुप जाती ।
जब भी बिल्ली मौसी आती,
दुम दबा बिल में घुस जाती ।

## (४३) तोता

तोता हूँ मैं तोता हूँ !
डाल डाल पर जाता हूँ !
हरे रंग का तोता हूँ !
कच्चे–मीठे फल खाता हूँ !
चोच बनी है मेरी लाल !
सुंदर सुंदर मेरी चाल !

## (४४) बन्दर मामा पेहन पैजामा

बन्दर मामा पेहन पैजामा दावत खाने आये।
ढीला कुरता, टोपी, जूता पेहन बहुत इतराए।
रसगुल्ले पर जी ललचाया, मुँह में रखा गप से।
नरम नरम था, गरम गरम था,
जीभ जल गई लप से।
बन्दर मामा रोते रोते वापस घर को आए।
फेंकी टोपी, फेंका जूता, रोए और पछताए।

## (४५) आलू–कचालू बेटा कहाँ गए थे

आलू–कचालू बेटा कहाँ गए थे,
बन्दर की झोपडी में सो रहे थे।
बन्दर ने लात मारी रो रहे थे,
मम्मी ने प्यार किया हँस रहे थे ।
पापा ने पैसे दिए नाच रहे थे,
भैया ने लड्डू दिए खा रहे थे।

### 46. Johny Johny Yes Papa

Johny, Johny!
Yes papa?
Eating sugar?
No papa.
Telling lies?
No papa.
Open your mouth!
Ha ha ha!

### 47. Humpty Dumpty

Humpty Dumpty sat on a wall
Humpty Dumpty had a great fall
All the king's horses and all the kings men
couldn’t put Humpty Dumpty together again

### 48. One, two, three, four, five

One, two, three, four, five,
Once I caught a fish alive,
Six, seven, eight, nine, ten,
Then I let go again.
Why did you let it go?
Because it bit my finger so.
Which finger did it bite?
This little finger on the right

### 49. Baa Baa Black Sheep

Baa-baa black sheep, Have you any wool?
Yes sir, yes sir Three bags full.
One for my master, and one for my dame
One for the little boy who lives down the lane.

### 50. Rolly Polly

Roly Poly Roly Poly, up, up, up
Roly Poly Roly Poly, down, down, down
Roly Poly Roly Poly, out, out, out
Roly Poly Roly Poly, in, in, in
Roly Poly Roly Poly, right, right, right
Roly Poly Roly Poly, left, left, left
Roly Poly Roly Poly, slow, slow, slow
Roly Poly Roly Poly, fast, fast,fast.
Roly poly, Roly poly, Clap-clap-clap.
Roly poly, Roly poly, Lay them in your lap

### 51. Head Shoulders Knees and Toes

Head, shoulders, knees and toes,
Knees and toes.
And eyes, and ears, and mouth, and nose.
Head, shoulders, knees and toes,
Knees and toes.

### 52. I’m a Little Teapot

I’m a little teapot,
Short and stout
Here's is my handle,
Here's is my spout.
When I get all steamed up,
Hear me shout!
Just Tip me over
and pour me out!

याशिवाय बालकांसाठी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या इतर गाण्यांच्या संग्रहाचादेखील वापर करावा.

## क) गंमत गोष्टी

### (१) गंमत भाजीची

आईने बाळूला जेवण वाढले. बाळू कडू कारले पाहून नाक मुरडू लागला, ''आई, आई ! मलाही भाजी नको,'' बाळू बोलला व तसाच ताटावरून उठून गेला. आई बाळूवर खूप रागावली. बाळूहीआईवर चिडून तसाच झोपी गेला.

भाजी मंडईत भाजीची दुकाने होती. सगळीकडे भाजीच भाजी, बाळू म्हणाला, ''बापरे ! किती ही भाजी !'' आणि काय गंमत, बाळू समोर बटाटा आला आणि म्हणाला ''मला भाजून खा,उकडून खा, तळून खा, वजन वाढवायचे तर मलाच खा.'' पळत पळत टोमॅटो आला. बाळूला पाहून हसू लागला व म्हणाला, ''मला जर खाल तर होतील गाल लाल–लाल ! कोशिंबीर खाणार तर जेवण रुचकर होणार !'' मुळा आणि गाजर ऐटीत बोलले, ''रोज मला खाणार तर डोळे सुंदर राहणार आणि ताकदही मिळणार.''

काकडी आली ठुमकत बोलली, ''मी असते थंडगार, मला खाल तर मजा येईल फार, तुला मिळेल ताकद मला बसशील चाखत. ''लगेच आले कारले, हिरवेगार, खडबडीत अंगाचे आणि बोलले, ''मला पाहून नका हसू, चुकूनही कधी नका रुसू. मी आहे खूप गुणी, घे, रे बाळू तू जाणूनी... मी आहे औषधी, आजारपण येणार नाही कधी.'' मेथी आली पळत पळत, तिने सोबत आणले चुका, माठ, पालक, चाकवत. सगळे जण फेर धरून गाऊ लागले, ''हिरवी हिरवी पालेभाजी, रोज खावी ताजी ताजी, मला खाऊन येईल ताकद आणि मिळतील पोषक घटक.''

बाळू लक्ष देऊन ऐकत होता. सगळे काही तरी सांगत होते. भेंडी, गवार, वांगी, पडवळ आणि कोबीही मनात म्हणाला होता. सगळे एकच घाई करत होते, एकच गलका करत होते, 'मला खा, मला खा.' आईची हाक ऐकू आली. बाळूला जाग आली, 'मी आज पासून भेंडी, कारले, भोपळा, बटाटा, मुळा, किंवा काकडी, असो कोणतीही भाजी, न चिडता खाणार आणि ताकदवान होणार', आईने जेवणाचे ताट बाळू समोर ठेवले आणि बाळूनेही आनंदाने जेवण केले. आईला बाळूचे खूप कौतुक वाटले.

**– सुनिता घरटे**

## (२) हुशार चिऊताई

एक छोटीशी चिऊ होती. आईने चिऊला सांगितले, ''बाळा ! मी तुला खाऊ घेऊन येते.बाहेर आकाशात काळे काळे ढग दाटून आले आहेत. बहुतेक खूप जोराचा पाऊस येईल. मी खाऊ घेऊन लगेचच परत येते. तू अजिबात बाहेर जाऊ नकोस.'' चिऊने आईला होकार दिला. काही वेळानंतर चिऊला घरात काही करमेना. बसून बसून खूप कंटाळा आला होता. आईला घरी यायला खूप वेळ आहे. तोवर थोडा वेळ बाहेर फिरून यावे असे तिला वाटले. ती हळूच बाहेर आली. तिने इकडेतिकडे पाहिले आणि निघाली फिरायला. थोडी पुढे गेली, वाटेत जोराचा पाऊस आला. तिचे पंख भिजून ओलेचिंब झाले. तिला आता उडताच येईना. चिऊ खूप घाबरली, आता काय करावे तिला काहीच सुचेना, तरीही तिची धडपड चालूच होती.

या गडबडीत ती खाली चिखलात पडली. समोरून एक तांबूस रंगाचा बोका आला. तो फारभुकेला होता. चिऊला पाहताच बोकोबाने झडप घालून चिऊला पकडले. चिऊ तशी फार हुशार होती. ती धीटपणाने बोकोबाला बोलली, ''बोकोबा – बोकोबा तू मला खाणार आहेस, हे मला माहीत आहे, पण माझे सगळे अंग चिखलाने माखलेले आहे. जर तू मला असेच चिखलाने माखलेले खाशील तर तुझे पोट दुखेल.'' ''अरे हो ! हे तर माझ्या लक्षातच आले नाही. मग मी आता काय करू?'' बोकोबा गुरगुरत बोलला. ''अगदी सोपे आहे, अगोदर तू मला नदीवर घेऊन जा. तेथील पाणी अंगावर ओतून मला चांगले चोळून साफ कर, मग मला खाऊन टाक,'' चिऊ बोलली.

बोकोबाला चिऊचे बोलणे पटले. तो चिऊला घेऊन नदीवर गेला. नदीवर जाऊन चिऊचे अंग चांगले साफ केले. ''आता तुला खाऊ का?'' असे बोकोबाने तिला विचारले. चिऊ बोलली, ''नको नको, अगोदर तू मला सुकवून कोरडी तर कर. मला खाताना, माझी पिसे तुझ्या घशात अडकतील ना !'' बोकोबाला हेही पटले. तो लगेच चिऊला घेऊन खडकाजवळ गेला. चिऊला खडकावर ठेवले. चिऊला आता बरे वाटले. थोडा वेळ जाताच चिऊचे पंख थोडेसे कोरडे झाले. चिऊने पंख झटकले आणि पटकन उडून घरी आली. बिचारा बोकोबा तसाच उपाशी राहिला.

**– राणी मोरे**

## (३) वैशालीचे रंगकाम

वैशाली नाावाची एक मुलगी होती. ती चौथीत शिकत होती. तिला रंगांची खूप आवड होती. तिला जसा वेळ मिळेल तशी ती घेऊन चित्रं काढायची. जणू तिला रंग वापरायचा छंदच होता. नदी.. पाणी... झाडं झुडपं... डोंगर.. देऊळ... झरे.... आकाश, अशी वेगवेगळी चित्रे रंगांनी तिने.. काढली होती. गुरुजी तिचे खूप कौतुक करायचे. वैशालीने आईला सांगितले, ''अगं आई गुरुजीनीं विविध रंगांचा वापर करून सुंदर फुले काढायला सांगितली आहेत, वैशाली आईबरोबर बाजारात गेली, आणि नवीन रंगपेटी घेऊन आली.

वैशाली तयार होऊन शाळेत गेली. ती खूप खूश होती, कारण ती गुरुजींना रंगाने फुले काढून देणार होती. गुरुजींनी तिला एका जागी बसवले. तिला एक कोरा कागद दिला. ती कागदावर फुले काढायला रंगपेटी शोधू लागली, तिला रंगपेटी सापडली नाही. ती खूप उदास झाली, कारण तिची रंगपेटी घरीच विसरली होती. तिने थोडा विचार केला. आता काय करावं? ती शाळेतील बागेत पळत गेली आणि रंगीबेरंगी फुले घेऊन आली. गुलाब, बोगनवेल, मधुमालती, चाफा, झेंडू या फुलांची एक एक पाकळी आणि काही पाकळ्या कागदावर घासू लागली. त्यांचा रंग कागदावर उमटत होता. त्यातून तिने बघता बघता सुंदर आणि विविध रंगांची फुले कागदावर चितारली. वैशालीचे गुरुजींनी खूप कौतुक केले.

**– वैशाली कदम**

## (४) झाडांची गरज

एका गावात मधू व यश असे बहीण भाऊ राहत होते. दोघेही छान खेळायचे, मजा करायचे.मधूला झाडे खूप आवडत होती तिने घरापुढील अंगणात छोटी बागच तयार केली होती, पण यश येता जाता उगीचच तेथील रोपांची पाने–फुले तोडत असे. मधूने यशला खूप वेळा सांगितले. 'अरे, झाडांची पाने फुले विनाकारण तोडू नये, पण तो तिचे ऐकत नसे.'

मधूची एक मावशी होती. तिची मुलगी रीना मधूकडे रहायला आली होती. मधू व यश तिला ताई अशी हाक मारायचे. एकदा मधू व रीना बोलत असताना, झाडांची पाने–फुले तोडताना तिने यशला पाहिले. रीनाताईने यशला हाक मारली. यश आला आणि विचारले, ''काय ग ताई, का बोलावले ?'' रीनाताईने यशला विचारले, ''तू असा, येता–जाता झाडांची पाने–फुले का तोडतोस ?'' यश म्हणाला, ''मला मजा वाटते.'' ताईने यशला समजावून सांगितले. मानवी जीवनात झाडे खूप गरजेची आहेत. झाडांपासून फुले, फळे, लाकूड, इंधन, कागद, औषधे मिळतात.

हिरवीगार झाडे ताजी हवा देतात. ताजी हवा जर आपणास मिळाली, तर शरीर निरोगी राहते. माणसांबरोबर पशू–पक्षी यांनाही झाडांची गरज असते. पक्षी आनंदाने झाडावर राहतात. तिथे घरटे करतात. झाडांमुळे सावली मिळते. झाडांमुळे जमिनीची धूप कमी होते. खरं तर आपण प्रत्येकाने एक तरी झाड लावले पाहिजे व झाडांची निगा राखली पाहिजे. झाडाला खत पाणी घालून वाढवले पाहिजे.

झाडे लावली, तर पाऊसही भरपूर पडेल. शेती चांगली होईल, ताज्या भाज्या खायला मिळतील. यशला रीनाताईने झाडाविषयी सांगितलेली सगळी माहिती पटली आणि यशने नंतर कधीही झाडांची पाने–फुले तोडली नाहीत, उलट यशने मधूला आणखी झाडे लावायला मदत केली.

**– पल्लवी क्षीरसागर**

## (५) बंटी आण साबण

बंटीला नेहमी मैदानी खेळ खेळायला तसेच कागदाच्या विविध वस्तू बनवायला व वाळूचा किल्ला करायला खूप आवडत असे. एकदा बंटी मैदानावर खेळत होता. बंटीच्या आईने बंटीला घरात बोलावले आणि म्हणाली, ''बंटी, साबण लावून हातपाय स्वच्छ धुऊन ये.'' बंटी नाही....''असे जोरात ओरडला आणि पळून गेला. खेळून खूप दमल्यामुळे बंटी रात्री लवकर झोपला.

रात्री त्याच्या स्वप्नात काय दिसले ? वाळूच्या किल्ल्याला रोगजंतूंनी वेढा घातला होता आणि तेच जंतू त्याचा पाठलाग करत होते. ''वाचवा वाचवा'' करत बंटी जोरात पळू लागला. तेवढ्यात तिथे साबण आला आणि त्याला म्हणाला, ''बंटी, घाबरू नकोस, मी आहे ना !'' त्याने लगेच आपल्या फेसाच्या सैन्याला आदेश दिले, ''जंतूंवर हल्ला करा.'' फेसाच्या सेनेने लगेचच जंतूंना पळवनू लावले. तेवढ्यात बंटीला जाग आली.

सकाळी उठल्यावर बंटीने आईला रात्री पाहिलेले स्वप्न सांगितले आणि म्हणाला, ''आजपासून खेळून आल्यावर साबण लावून स्वच्छ अंघोळ करेन.'' बंटी तेव्हापासून दररोज स्वच्छ राहू लागलाआणि कधीही आजारी पडला नाही.

**– संगीता रणवरे**

## (६) मुंगी आणि फुलपाखरू

एकदा एका तुतीच्या झाडाच्या फांदीवर एक किडा कोषातून बाहेर येत होता. एका मुंगीने ते पाहिले व ती म्हणाली, ''अरेरे? किती त्रास होत असेल याला... मला त्याचा हा त्रास पाहवत नाही. या उलट मी किती नशीबवान आहे. मला मनाप्रमाणे हिंडता फिरता येते.'' असे बोलून मुंगीलगबगीने तेथून निघून गेली.

काही दिवसांनी मुंगी पुन्हा त्या फांदीवर आली. तेवढ्यात एक सुंदर फुलपाखरू तिच्याजवळ आले व तिला म्हणाले, ''काय मुंगी मावशी कशी आहेस तू? ओळख का मला ?'' मुंगीने त्याच्याकडे पाहिले आणि म्हणाली, ''नाही.... मी नाही ओळखले.'' ''अगं मी तोच किडा आहे. मी त्या कोषातून बाहेर पडलो. आता मी मोठा झालो आणि माझे रुपांतर आता सुंदर फुलपाखरामध्ये झाले आहे. मी सुद्‌धा आता मनसोक्त या फुलावरून त्या फुलावर उडतो. मी पण आहे ना तुझ्यासारखाच नशीबवान ?'' फुलपाखराला असे उडताना बघून मुंगीला ही खूप आनंद झाला.

**– वैशाली कदम**

## (७) शेरू आणि चंपी

बाबांनी शेरूला अगदी लहान असताना घरी आणले होते. शेरूचा रंग काळा आणि शेपूटलांब होती. ती अगदी जमिनीवर लोळायची. शेरू खूपच चलाख होता. कुणाची चाहूल लागली किंवा जरा आवाज झाला, तरी शेरू भुंकायचा. तो नेहमी सावध असायचा. घरातील सगळे शेरूचे लाड करायचे.

मी व शेरू रोज सकाळी व सायंकाळी नदी किनारी फिरायला जातो. घरापासून थोडे दूर जातो, तोच चंपी आमची वाट पाहत बसलेली असायची. मला व शेरूला आता चंपीची चांगलीच सवय झाली होती. शेरूला पाहताच चंपी आनंदाने भुंकत असे. चंपी कोणी देईल ती भाकरी खात असे. तिचे पोट भरत नसेल, असे वाटून मी रोज चंपीसाठी एक भाकरी घरातून घेऊन जात असे. शेरू पण मला रोज भाकरी घे, असे भुंकून भुंकून सांगत असे.

चंपी लाल रंगाची होती. तिचे डोळे बोलके होते. शेपूट झुपकेदार होती. शेरू व चंपीची चांगलीच जोडी जमली होती. एकदा मी व शेरू सायंकाळी नदी किनारी फिरायला निघालो, पण चंपी नेहमी जिथे दिसते, तिथे आज दिसली नाही. शेरू कावराबावरा होऊन तिला शोधू लागला. मी पण आवाज देत होतो. चंपी भुंकत होती. शेरूला चंपीचा आवाज आला तसा, तो धावतच सुटला. काही मुलांनी चंपीला बांधून ठेवलेले होते. शेरूला पाहताच मुले घाबरली व पळू लागली. शेरूही मुलांमागे पळत सुटला. मी चंपीला सोडवलं. तिला घेऊन मी व शेरू घरी आलो. शेरू भुंकत भुंकत सांगत होता, चंपीला भाकरी दे. मी भाकरी देताच, शेरू भुंकायचा थांबला. आता चंपी व शेरू दोघे एकजुटीने राहतात. मी, चंपी व शेरू तिघेही सकाळी व सायंकाळी नदीकिनारी फिरायला जातो.

**– जोत्स्ना सुतार**

## (८) सरबत

एक चिनू नावाचा मुलगा होता. चिनू आई–बाबा आणि त्याची छोटी बहीण नाजूका हे सगळे आनंदाने राहत असत. चिनूला सरबत खूप आवडत असे. लिंबू, कैरी, कोकम, आवळा, अगदी कसलेही सरबत तो आवडीने पीत असे, पण चिनूची एक सवय होती. तो नाजूकाचे सरबत पटकन पिऊन टाकत असे. चिनू व नाजूकासाठी आई नेहमी वेगवेगळे सरबत बनवून देत असे. चिनूची सवय आईला माहीत होती. आई नाजूकासाठी एक सरबताचा पेला वेगळा काढून ठेवत असे. चिनूला खूपदा सांगूनही चिनूची ही सवय जाईना. एकदा काय झाले, चिनू नेहमीसारखा बाहेर खेळायला गेला होता. बराच वेळ खेळून तो घरी आला. हातपाय धुतले. आईने छान सरबत करून ठेवले होते, ते पटकन चिनूने पिऊन टाकले आणि टेबलावरचा दुसरा पेला पण चिनूने घाईघाईने घेतला व तोंडाला लावला, छी... ! थू.... काय हे ? किती कडू ! कसले सरबत आहे हे ? चिनूचे तोंड कडू कडू झाले. काय गंमत झाली माहिती आहे का? आईने आजोबांसाठी केलेला कडुनिंबाचा रस भरलेला पेला टेबलावर ठेवला होता. सरबत समजून चिनूने तो घेतला. चिनूची चांगलीच खोड मोडली.

**– जयश्री गायकवाड**

## (९) मुंगीताईची सहल

एएके दिवशी मुंगीताई विचार करू लागली. घरात बसून तिला खूप कंटाळा आला होता. कोरोनामुळे बरेच दिवस ती घरातच होती. तिला कुठेतरी बाहेर जायचे होते. आज वातावरण छान होते. मुंगीताईला वाटले, चला आज आपण एकटीनेच सहलीचा आनंद लुटूया. ती छान कपडे घालून, वातावरणाचा अंदाज घेऊन घराबाहेर पडली. अगदी थाटात निघाली. वाटेत तिने आधी शनिवारवाडा पाहिला. शनिवारवाडा बघून हळूहळू चालत चालत ती लालमहालात पोहोचली. लालमहाल तिला खूपच आवडला.

शिवाजी महाराज व जिजाऊंचे फोटो बघून तिचा आनंद गगनात मावेना. तशीच ती चालत चालत पुढे निघाली आणि दगडूशेठ गणपती जवळ जाऊन पाया पडली. आज सगळे अगदी मानासारखे होत होते. फिरून फिरून तिला खूप तहान लागली होती. मुंगीताई तशीच पुढे मंडईत आली. थंडगार ऊसाचा रस पिऊन पुढे चालू लागली. जवळच सारसबाग होती. सारसबागेत जाता जाता तिने चणेही घेतले. बागेत फिरून तिला खूप भूक लागली. तिने ओली भेळ घेतली. चटपटीत भेळ तिला खूप आवडली. आज दिवसभर फिरून ती दमली होती. तिला घराची आठवण आली. हळूहळू चालत घराकडे निघाली. आज मुंगीताईची सहल छान झाली.

**– विभावरी वाळूंज**

## (१०) झुकझुकची शाळा

एक आगगाडी होती. तिचे नाव झुकझुक होते. झुकझुकला आईने शाळेत घातले, ती रोज शाळेत जाऊ लागली. ती शाळेतून आली, की सांगायची, शाळेतले शिक्षक खूप छान शिकवतात. एक दिवस तिला शाळेत शिकवले; की रुळावरून कसे धावायचे ? लाल झेंडा दिसला की थांबायचे, हिरवा झेंडा दिसला की चालायचे, पण झुकझुकला हे लक्षातच राहायचे नाही. बाई शिकवतात तिकडे ती लक्ष देत नसे. ती रुळ सोडून इकडेतिकडे धावतच सुटायची. ती शेतातपण शिरायची.शेतातील पिकांचे सगळे नुकसान करायची. एक दिवस शेतकरी रामूने हे पाहिले आणि तो शाळेत गेला. बाईंना तिची सगळी हकीकत सांगितली. बाईंनी रामूला सांगितले, झुकझुक शेतात आली, की तिला लाल झेंडा दाखवा. ती तिथे थांबेल. मग तुमचे पिकांचे नुकसान पण होणार नाही.

एके दिवशी झुकझुकची शाळेची सहल जाणार होती, पण झुकझुकला उठायला उशीर झाला. तिने पटकन आवरले, ती पण निघाली सहलीला, पण सगळेजण पुढे निघून गेले होते. आता तिला कसे कुठे जायचे माहीत नाही. मग ती शेतात जाऊ लागली. रामून तिला लाल झेंडा दाखवला. झेंडा पाहून ती एकदम थांबली. रामूने तिला रुळावरून सगळेजण पुढे गेले आहेत असे सांगितले आणि परत रामूने तिला हिरवा झेंडा दाखवला. आता झुकझुकला कळले, की लाल झेंडा असेल, तर थांबायचे आणि हिरवा झेंडा दाखवला तर चालायचे. मग ती हळूहळू पुढे चालू लागली.

## (११) ही पिसे कोणाची

सोनूचे घर शेतात होते. एक दिवस ती खेळता खेळता घरापासून खूप लांब आली होती. तिला दोन पिसे सापडली. तिने ती पिसे उचलून घेतली. तिला ती पिसे खूप आवडली. पुढे जाता जाता वाटेत तिला कबुतर दिसले. तिने कबूतराला विचारले, ''कबुतरदादा, कबुतरदादा ही पिसे तुझी आहेत का ?'' कबुतराने पिसांकडे निरखनू पाहिले. ''नाही गं, बाई, ही तर माझी पिसे नाहीत,'' असे बोलून कबूतर पुढे निघून गेले. ''कोणाची असतील बरं ही पिसे?'' असे बोलत सोनू पुढे गेली. वाटेत सोनूला कोंबडीताई भेटली. तिने कोंबडीताईला विचारले, ''कोंबडीताई, कोंबडीताई, ही पिसे तुझी आहेत का?'' ''नाही गं बाई, ही पिसे माझी नाहीत.'' असे बोलून कोंबडीताई परत दाणे टिपू लागली. सोनू मनात विचार करू लागली, कोणाची असतील बरं ही पिसे ? मग तिला एका झाडीतून बदक बाहेर येताना दिसले. सोनूने हातातली पिसे बदकाला दाखवत विचारले, ''ही पिसे तुझी आहेत का?'' पिसे पाहून बदक हसून बोलले ''हो. ही माझीच आहेत, ही पिसे तुला मिळाली का ?'' सोनूला खूप आनंद झाला. ती बदकाशी बोलू लागली, ''खेळताना मला ही पिसे सापडली, घे ही पिसे आणि लाव परत पंखात.'' बदकाला सोनूचे कौतुक वाटले व ते तिला सांगू लागले, ''अगं वेडे, या पिसांचा मला आता काही उपयोग नाही, एकदा पिसे गळून पडली की, ती काही परत लावली जात नसतात,'' ही पिसे तुलाच ठेव. माझी आठवण आली, की पाहात जा. सोनू आनंदाने घरी गेली. बदकाने दिलेली पिसे तिने वहीत जपून ठेवली.

## (१२) हरणाचे पिलू

एकदा माधुरीची शाळेची सहल एका जंगलामध्ये गेली होती. सगळी मुले खूप खूश होती. जंगलात वड, पिंपळ, चिंच, आंबा अशी मोठमोठी झाडे पाहून काही मुले झाडांवर चढली. काही मुले–मुली खाली वेगवेगळे खेळ खेळत होती.

खेळता खेळता माधुरीला एक फुलपाखरू दिसले. माधुरीला ते खूप आवडले. ती फुलपाखरामागे पळत जाऊ लागली. बरेच अंतर ती पुढे गेली. तिला एका झुडपामागून कसलातरी आवाज आला. माधुरीने सगळीकडे पाहिले. हळूहळू ती झुडपाजवळ गेली.

तिथे तिला एक हरणाचे छोटे पिलू ओरडताना दिसले. माधुरी खूप मायाळू आणि समजूतदार होती. तिने नीट पाहिले, तर पिलाचा पाय झूडपात अडकला होता. माधुरीने पिलाला अलगद उचलून बाहेर काढले. ते खूप दमले होते, जणू काही तिला, 'माझा पाय बघ, दुखतो आहे' असे सांगत होते. माधुरीने पिलाचा पाय पाहिला, तिला खूप वाईट वाटले. पायाला खूपच खोल जखम झाली होती. माधुरी जिखमेवर औषध लावायला पिलाला घेऊन बसजवळ आली. सगळी मुले पिलाला पाहून पुढे आली. तिला विचारू लागली. ''कुठे सापडलं पिलू? काय झालय पिलाला ?'' माधुरीने पिलाला जवळ घेऊन, अंगावरून हात फिरवला. तिला वाटले हे पिलू किती छोटे आहे, आईशिवाय राहू शकणार नाही. पिलाची आई पिलाला शोधत असेल. मग माधुरी पिलाला घेऊन पुढे चालत गेली. सगळी मुलेही पिलासाठी आईचा शोध घेऊ लागली. पिलाला पाणी आणि दूध पाजले. मग पिलाची जखम साफ करून औषध लावले, वरून कापड बांधले. जरा वेळाने पिलाला तरतरी आली.

सगळी मुले खूश झाली. माधुरीलाही खूप छान वाटले. तोच माधुरीला एक हरीण कावरेबावरे होऊन फिरताना दिसले. हीच असेल या पिलाची आई, असे वाटून माधुरीने पिलाला खाली सोडले तर ते लगेचच धावत आईकडे गेले. पिलाला आई भेटली आणि आईला तिचे पिलू.

**– सुलक्षणा पठारे**

## (१३) असीमला आला वास

एका नदीच्या शेजारी एक छोटे गाव होते. त्या गावामध्ये बसस्टॉपच्यामागे एक पांढऱ्या रंगाच्या घरांची रांग होती. त्यामध्ये दुसरे घर होते असीमचे. त्या घरामध्ये असीम, त्याचे आईबाबा, आजी आणि दादा राहायचे. असीम त्याच्या मित्रांपेक्षा थोडा वेगळा होता. असीमला पूर्ण वाक्यात नीट बोलता यायचे नाही. पण इतर काय बोलले ते मात्र नीट समजायचे. त्याला आई म्हणाली, की असीम इकडे ये, की असीम तिकडे जायचा. मात्र तोंडाने म्हणायचा. ''असीम इकडे ये, असीम इकडे ये.''त्याला दादाने सांगितले, की माझे पुस्तक आणून दे, की तो पुस्तक आणून द्यायचा. पण तोंडाने म्हणायचा, ''पुस्तक आणून दे; पुस्तक आणून दे.'' अशा प्रकारे त्याला एखादी गोष्ट करायला सांगितली, की तो करायचा. पण दुसऱ्याने त्याला जे काही सांगितले असेल ते म्हणत राहायचा. हे बोलताना तो दुसऱ्या माणसाकडे बघायचा नाही. एका ठिकाणी बसला की डोलत राहायचा. खोलीमध्ये गोल गोल फिरत राहायचा. जोरजोराने हात हलवायचा.

असीमला नीट बोलता येत नसले, तरी काही गोष्टीत मात्र तो एकदम हुशार होता. त्याला सगळ्यांच्या आधी वास ओळखता यायचा. नुसता वास घेऊन तो सांगायचा, की बाबांनी आज काय खाऊ केला आहे. आजीने बागेतून कोणती फुले आणली आहेत हे तो न बघताही ओळखायचा.

एकदा डॉक्टरकाका आईला म्हणाले, ''असीमला आता अंगणवाडीमध्ये जाऊदे. तिथे त्याला नवीन मित्र मिळतील.'' मग असीमचे बाबा आणि आई त्याला अंगणवाडीमध्ये घेऊन आले. ताईंनी इतर मुलांना सांगितलं, ''हा असीम. आजपासून आपल्या अंगणवाडीमध्ये येईल. तुम्ही सगळे एकत्र खेळा.''

मग काही मुले पुढे आली आणि त्यांनी त्यांची नावे असीमला सांगितली. असीमने त्यांच्याकडे बघितले नाही. पण त्यांनी सांगितलेली नावे तो परत परत म्हणत राहिला. ''मी सलीम; मी नेहा''अंगणवाडीतले काही खेळ असीमला खूप आवडायचे. ताई कधी कधी मुलांना बीया आणि पाने मोजायला द्यायच्या तर कधी निळ्या हिरव्या रंगांचे कागद वेगळे करायला सांगायच्या. ते असीमला खूप आवडायचे. कधी मातीचा चिखल करून खेळायला द्यायच्या. चिखलात खेळायला काही असीमाला आवडायचे नाही.

अंगणवाडीमधे असीमला जरी मित्र मिळाले असले तरी काही खोडकर मुले मात्र त्याला नीट बोलता येत नाही, सारखे हात हलवतो म्हणून चिडवायची. शशी तर नेहमीच असीमला त्रास द्यायचा.

एके दिवशी सगळेजण अंगणवाडीमध्ये खाऊ खात होते. तेवढ्यात असीम एकदम उभा राहिला आणि मोठ्याने ओरडायला लागला, ''धूर, आग, धूर, आग.'' ताईंनाही माहिती होते, की असीमला

सगळ्यांच्या आधी वास येतो. असीम असे ओरडायला लागल्यावर ताईंनी घाईघाईने सगळ्या मुलांना खोलीच्या बाहेर जाऊन लांब उभे राहायला सांगितले. पण असीम काही बाहेर जाईना. सगळे खाऊ खात होते तेव्हा शशी काही मुलांबरोबर लपाछपी खेळत होता. असीमने शशीला कपाटामागे लपला ते पाहिले होते. सगळी मुले बाहेर गेली तरी शशी कपाटामागेच राहिला. असीमच्या हे लक्षात आले. तो म्हणायला लागला, ''शशी, कपाट, शशी, कपाट'' ताईंना जरावेळाने लक्षात आले, की असीम म्हणतोय की शशी कपाटामागे आहे. तेव्हा ताईंनी शशीला कपाटामागून बाहेर काढले आणि दोघांना घेऊन त्या बाहेर गेल्या.

सगळी मुले बाहेर गेल्यावर त्या पुन्हा अंगणवाडीमधे खरंच धूर येतो आहे का ते बघायला आल्या. बघितले तर उंदराने कुरतडल्यामुळे खरोखरच एका वीजेच्या तारेमधून धूर यायला लागला होता. ताईंनी लगेच खोलीच्या बाहेर जाऊन विजेचे मुख्य बटण बंद केले. मग वीजतारेची दुरुस्ती करायला वायरमन काकांना बोलावले.

सगळ्यांनी असीमचे खूप कौतुक केले. कारण त्याच्यामुळे सगळे जण अपघातातून वाचले. आता शशी असीमला त्रास देत नाही. तुम्हीच सांगा बरं तो असीमला का त्रास देत नाही?

**– डॉ. वृषाली देहाडराय**

## १४) अप्पूचे स्वप्न

अप्पू नावाचा एक लहान मुलगा होता. तो त्याची आई, बाबा आणि मोठी बहीण पिहू यांच्याबरोबर राहायचा. सगळे जण अप्पूचे खूप लाड करायचे. लहानपणापासून अप्पूच्या दोन्ही पायांमध्ये पुरेशी ताकद नसल्यामुळे तो चाकाच्या खुर्चीत बसून सगळीकडे फिरायचा. चाकाच्या खुर्चीत बसून तो रोज बालशाळेत जायचा. शाळेत आल्यावर त्याचे बाबा त्याला कडेवर उचलायचे आणि वर्गात एके ठिकाणी बसवायचे. अप्पूची सगळ्या मुला–मुलींबरोबर छान दोस्ती होती. चिंकीशी त्याची खास दोस्ती होती.

शाळेमध्ये सर्वजण एकत्र खेळत असत–ठोकळे रचणे, बॉलला फेकणे–झेलणे. खेळघरात तर ते मस्त मज्जा करतात. कोणी तरी आई होई, तर कोणी वडील, एखादा मुलगा तर चक्क फुलपाखरू व्हायचा आणि मग दुसरी मुलगी एक रंगीत फूल होत असे. एकदा तर गंमतच झाली. चिंकी बॅट घेऊन आली आणि म्हणाली. मी विराट कोहली आहे. अप्पूसुद्धा त्याच्या खुर्चीवर बसून यातले अनेक खेळ खेळत असे.

एक दिवस असेच खेळघरात खेळताना अप्पू चिंकीला म्हणाला ''मला ना जसे, आपण वर्गात खेळतो ना तसेच वर्गाबाहेर पण खेळायला आवडत. माझे एक स्वप्न आहे छोटसे. माझ्या घरी ना माझ्यासाठी एक उतार करून घेतलाय. मी माझ्या खुर्चीवर बसून घराबाहेर अंगणात जातो आणि रस्त्यावरची मजा बघतो. तसे आपल्या शाळेत असेल तर किती बरं होईल ना ! मी पण तुमच्याबरोबर चाकांच्या खुर्चीवर बसून वर्गाबाहेर येऊन तुमचा खेळ बघितला असता. तू बॅटिंग करताना मी बॉल टाकला असता.'' हे ऐकल्यावर चिंकीला वाईट वाटले. तिने ठरवले की, आपण हे आपल्या ताईला नक्की सांगूया आणि ती ताईंकडे गेली आणि म्हणाली, ''ताई मला ना तुम्हाला एक सांगायचे आहे. आपल्या वर्गात अप्पू आहे ना, त्याला ना, वर्गाबाहेर खेळायचे. त्याला ना क्रिकेट खेळायला खूप आवडते. त्याला पण धोनी, कोहली आणि बूमराह सारखे खेळायचे आहे. त्याची खुर्ची वर्गाबाहेर नेण्यासाठी आपण काही करूया का?''

ताई म्हणाल्या, ''अग, तू म्हणतेस तसे करता येईल. परवा मी पालक सभा घेणार आहे. तिथे ही कल्पना मी सगळ्यांना सांगते.''एक दिवस ताई सगळ्या मुलांच्या पालकांना पालकसभेला बोलवतात. २५–३० पालक येतात आणि त्यांना त्या अप्पूविषयी सांगतात, ''अप्पूला वर्गाबाहेर खेळायला जायचंय आणि स्वतः चाकाच्या खुर्चीवर बसून बाहेर जायचे आहे. आपल्या वर्गाच्या बाहेर एक सिमेंटचा उतार करायचा आहे. त्यासाठी मला आपली मदत हवी आहे. जयचे बाबा म्हणाले, ''अहो, अप्पू तर आपलाच आहे. आपण सगळे मिळून त्याच्यासाठी हे नक्कीच करूयात.'' सलीमची अम्मी म्हणाली, ''माझ्या ओळखीचा एक गवंडी आहे. त्याला विचारते. तो आपल्याला

कमी किमतीत एक भक्कम उतार करून देईल का?'' ताईंनी सर्व पालकांचे आभार मानले. पालकांनी कबूल केल्याप्रमाणे ताईच्या पुढाकाराने गवंडीकाकांनी कमी किमतीत दोन्ही बाजूला स्टीलचे रॉड असणारा एक मजबूत उतार बांधून दिला. यानंतर ताई एक दिवस ठरवतात आणि त्या दिवशी अप्पूचे बाबा त्याला वर्गाबाहेर नवीन सिमेंटच्या उतारावरून त्याची खुर्ची ढकलत वर्गात आणून बसवतात. सर्व मुले अप्पूचे वर्गात आल्यावर टाळ्यांच्या गजरात स्वागत करतात आणि त्याला गुलाबाचे फूल देतात. अप्पूच्या वडिलांना हे बघून खूप आनंद होतो ते चिंकीला जवळ बोलावून शाबासकी देतात. ताईंना पण थँक्यू म्हणतात आणि अप्पूला टाटा करून त्यांच्या घरी जातात. थोड्या वेळाने ताई त्याला चाकाच्या खुर्चीतून उतारावरून वर्गाबाहेर घेऊन जातात. अप्पूला खूप आनंद होतो. तो टाळ्या वाजवत म्हणतो, ''आता मला तुमच्याबरोबर वर्गाबाहेर पण खेळता येईल. सगळ्यांना खूप खूप थँक्यू.''

---

याशिवाय बालकांसाठी आपल्याकडे उपलब्ध असलेल्या गोष्टींचादेखील वापर करावा.

---

# परिशिष्ट - २
# अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती

प्रस्तुत परिशिष्टात प्रत्येक क्षमतेसाठी अध्ययन निष्पत्ती उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. या निष्पत्ती पायाभूत स्तरावरील पाच वर्षांसंबंधित क्षमता संपादनासाठी अध्ययन मार्ग आहेत.

- अभ्यासक्रमाच्या ध्येयांचे स्वरूप विकासात्मक असल्यामुळे, अध्ययन क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती देखील विकासात्मक आहेत.
- पायाभूत स्तरावर सर्व वयोगटांसाठी अध्ययन निष्पत्ती या विकासात्मक मार्गाच्या स्वरूपात आहेत त्यामुळे त्यांच्याकडे विशिष्ट वयानुरूप ध्येय या स्वरूपात न पाहता, सलगपणे पाहिले पाहिजे.
- तीन ते आठ वयोगटातील बालकांचे शिक्षण हे विकासात्मक असून, प्रत्येक बालकांची शिकण्याची गती वेगळी असते. सगळ्या बालकांचा एकाच वेळी एकाच वयानुसार अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकत नाही. अध्ययन निष्पत्ती ही एका ठरावीक वर्षापुरती मर्यादित नसते. ती मुलांच्या विकासानुसार प्रत्येक टप्प्यातून प्रवाही उलगडत जाते, त्यामुळे याकडे सातत्यपूर्ण प्रवास म्हणून पाहणे आवश्यक आहे.
- पुढे वयानुसार दिशादर्शक अध्ययन निष्पत्ती दिल्या असून, त्या वर्गातील प्रत्येक बालकासाठी अध्ययन अनुभव आयोजित करण्यासाठी शिक्षकांना उपयोगी ठरतील.
- प्रत्येक अध्ययन निष्पत्तीही निरीक्षणक्षम आहे. अध्ययन निष्पत्तीचा वापर करून, शिक्षक मुलांच्या क्षमतांची प्रगती ठरवू शकतो.
- अध्ययन निष्पत्ती संचयी स्वरूपाच्या असल्यामुळे, त्या एकत्रितपणे वाचल्या पाहिजेत. बालकांचे आधीच्या वयोगटानुसारचे अध्ययन, पुढील वयोगटातसुद्‌धा क्रमाने सुरू असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, 'न सांडता खाणे' ही अध्ययन निष्पत्ती ४ ते ५ या वयोगटाची आहे, असे गृहीत धरले, तर हे ५ ते ६ वयोगटालासुद्‌धा लागू होईल.

पुढील विभागात **अभ्यासक्रमाची ध्येये** CG - 1, CG - 2, CG - 3, म्हणून दिली आहेत आणि **क्षमता** या C-1.1, C-2.1, C-3.1 याप्रमाणे दिल्या आहेत. अध्ययन निष्पत्तींची क्षमतांशी सांगड घातलेली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे अध्ययन निष्पत्ती या एकत्रितपणे पाहिल्या पाहिजेत. सहज वापर करण्यासाठी, खालील सारणीतील १, २, ३ उभ्या अक्षामध्ये आणि अ, ब, क, ड, इ आडव्या अक्षामध्ये, याप्रमाणे वाचन चौकटी दिल्या आहेत.

### १.१.१. शारीरिक विकास (अन्नमय व प्राणमय कोश विकास)

निरोगी शरीरात निरोगी मन असते. या टप्प्यामध्ये बालके त्यांच्या सर्व ज्ञानेंद्रियांचा वापर खेळ आणि कृतींमध्ये करतात. तेव्हा त्यांचे शिकणे अधिक उपयुक्त होते, म्हणूनच पोषक आहार घेणे

आणि स्वच्छतेच्या सवयी विकसित करणे, सुरक्षिततेबद्दल जागरूक होणे, इंद्रिय संवेदना आणि त्यांच्या विविध स्नायूंचा व्यायाम आणि समन्वय यांच्या विकासावर येथे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

## CG - 1 : बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात

बालकांमध्ये पोषक आहार आणि आहाराचे महत्त्व समजून घेणे या दोन्ही सवयी विकसित होत असतात. वेगवेगळ्या खाद्य पदार्थांची चव विकसित करण्यासाठी, वेगवेगळ्या अन्नघटकांची ओळख लहान वयात करून देणे आवश्यक आहे.

बालके स्वच्छतेच्या अभावामुळे अनेकदा आजारी पडतात. त्यामुळे पौष्टिक आहारातून होणारे फायदे त्यांना मिळत नाहीत. त्यासाठी शाळेच्या सुरुवातीच्या काळात स्वच्छतेच्या चांगल्या सवयी विकसित करणे महत्त्वाचे ठरते. बालपणाचा काळ हा महत्त्वाचा असतो. याकाळात बालकाची प्रतिकारशक्ती देखील विकसित होत असते. मुले गटांनी एकत्र शाळेत येत असल्याने शाळेच्या संदर्भात काही मूलभूत स्वच्छतेच्या सवयी आवश्यक आहेत.

शाळा हे सार्वजनिक ठिकाण असल्याने, शाळेच्या तयारीमध्ये सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

सुरक्षा आणि सुरक्षिततेच्या विशिष्ट पद्धती आत्मसात करून, बालके भौगोलिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या घरापासून दूर असली, तरी शाळांमध्ये शिकण्याकरिता अधिक चांगल्या प्रकारे तयार होतात.

क्षमता साध्य होण्यासाठी निर्धारित कालावधी लागत असल्याने, त्या साध्य झाल्या का? हे तपासण्यासाठी काही अंतिम निदर्शके/सूचके असणे आवश्यक आहे. तीच निदर्शके/सूचके म्हणजे अध्ययन निष्पत्ती होय.

खालील सारणीत क्षमतेनुसार अध्ययन निष्पत्तींचे तपशील दिले आहेत. सारणीतील प्रत्येक स्तंभ (अ–इ) हे महत्त्वाचे टप्पे (Milestones) आहेत. त्यानुसार क्षमता संपादित करण्याचा अध्ययन मार्ग दर्शविला आहे.

*तक्ता – १*

### C-1.1 : पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • खाण्यायोग्य आणि खाण्यास अयोग्य अन्नपदार्थ ओळखतो.<br>• मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरुवात करतो व त्यांची नावे सांगतो. | • मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ खातो. (उदा., धान्य, भाज्या, फळे, डाळी, शेंगा, सुकामेवा (nuts), दुधाचे पदार्थ | • स्वतःहून विविध अन्नपदार्थ खातो. | • विविध गटांतील अन्नपदार्थांचा आस्वाद घेतो. | • पोषणविषयक विविध गरजा पूर्ण करतो. |
| २ | • आरोग्यास पोषक व अपायकारक अशा काही पदार्थांची नावे सांगतो. | • दुकानातील आरोग्यास पोषक आणि अपायकारक अन्नपदार्थ स्पष्ट करतो.<br>• काही पदार्थ पोषक असण्यामागची कारणे स्पष्ट करतो. | • वेगवेगळ्या खाद्य–पदार्थांतील अन्नघटक ओळखतो आणि त्यांचे फायदे व तोटे स्पष्ट करतो.<br>• पोषक आहाराची काही गुणवैशिष्ट्ये सांगतो. (अंडी आणि डाळी शरीरास शक्ती देतात. पालकाची भाजी रक्त शुद्ध करते. दुधामुळे दात मजबूत होतात.) | • मोठ्यांच्या मदतीने परिचयाच्या पदार्थां–मधील महत्त्वाचे घटक ओळखतो. (उदा., वरणामधील डाळ आणि चटणीमधील दाणे.) अन्नघटक आणि पोषकता यांमधील संबंध सांगतो. (उदा., चिक्कीमधील शेंगदाणे आणि गूळ)आरोग्यासाठी चांगले असतात. | • शिजविलेल्या पदार्थातील अन्नघटक सांगतो व ते आरोग्यासाठी योग्य आहे की अयोग्य, याचा अंदाज बांधतो.<br>• बंद पाकिटातील अन्न पदार्थ आरोग्यासाठी योग्य की अयोग्य हे ओळखतो. उदा., बिस्कीट, नूडल्स. |
| ३ | | • चित्रकृतींच्या मदतीने साधा नाष्टा/स्नॅक्स बनवितो. | • मोठ्यांच्या साहाय्याने पौष्टिक नाष्टा तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतो. (उदा., उकडलेले चणे, मोड आलेली कडधान्ये घालून भेळ करतो.) | • पाककृतींचा आधार घेऊन पौष्टिक नाष्टा स्वतंत्रपणे बनवतो. | |
| ४ | | • अन्नपदार्थ न सांडता खातो. | • योग्य प्रमाणात वाढलेले अन्न वाया न घालवता खातो. | • आवश्यक तेवढेच अन्न मागतो. | • अन्नपदार्थ न सांडता स्वतःच्या हाताने इतरांना योग्य प्रमाणात वाढतो. |

## C-1.2 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २*

**C-1.2 : स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • शौचाला जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो. | • शौचाल जाण्यापूर्वी व नंतर, तसेच जेवणापूर्वी व नंतर हात धुतो आणि पुसतो, या क्रिया स्वतःहून करण्यास सुरुवात करतो. | • शौचाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर, नियमितपणे हात धुतो आणि पुसतो. | • शौचालयाचा योग्य वापर करतो. | • स्वावलंबीपणे स्वतःची काळजी घेतो व स्वच्छता राखतो. |
| २ | • स्वत: कपडे घालतो. बटण लावण्यासाठी व स्वत:च्या पायात चप्पल/बूट घालण्यासाठी मोठ्यांची मदत घेतो. | • मदतीशिवाय स्वतः कपडे, चप्पल/बूट घालतो. | • देखरेखीखाली सुई–दोऱ्याचा वापर करून सोपे शिवणकाम करायला सुरुवात करतो. | • मोठ्यांच्या मदतीने सुई–दोऱ्याच्या साहाय्याने बटणे लावतो आणि साधे शिवणकाम करतो. | • मदतीशिवाय स्वतंत्रपणे सुई–दोऱ्याच्या साहाय्याने बटणे लावतो आणि साधे शिवणकाम करतो. |
| ३ | | • स्वतःहून वैयक्तिक वापराच्या वस्तूंचा योग्य वापर करतो. (कंगवा, ब्रश) | | • स्वतःची काळजी घेण्याच्या वस्तू व्यवस्थितपणे वापरतो. | |

## C-1.3 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ३*

**C-1.3 : शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • स्वतःच्या वस्तू, जसे की पिशव्या, बाटल्या, बूट रुमाल इ. यांच्याबाबत सजग असतो. | • स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो. | • स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो. | • अभ्यासाचे साहित्य काळजीपूर्वक हाताळतो. | • शाळेची मालमत्ता, फर्निचर, पुस्तके आणि इतर साहित्य यांची काळजी घेतो. |
| २ | • मोठ्यांच्या मदतीने अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | • स्वच्छ पेले, ताटल्या ओळखतो आणि वापरतो. तसेच स्वतंत्रपणे अस्वच्छ (खरकट्या) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | • स्वतःच्या ताटल्या आणि भांडी स्वच्छ करतो. | • वर्गात आणि मैदानावर स्वच्छता राखण्यास सुरुवात करतो. | • वर्ग आणि मैदान स्वच्छता यांमध्ये सहभागी होतो. |
| ३ | • इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतो. | • कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात करतो. | • नेहमी कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचाच वापर करतो. | • कचऱ्याचे सुका आणि ओला असे वर्गीकरण करायला सुरुवात करतो. | • योग्य प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण करतो. |

## C-1.4 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४*

**C-1.4 : वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • आग, गॅस, सुरी, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक गोष्टींना हात लावणे टाळतो. | • कात्री, सुरी, आगपेटी अशा धोकादायक आणि हानिकारक वस्तू काळजीपूर्वक हाताळतो. | • कात्री, सुरी या वस्तू देखरेखीखाली वापरतो. | • नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर देखरेखीखाली करतो. | • कात्री, नेलकटर आणि छोटी सुरी यांचा वापर मदतीशिवाय करतो. |

## C-1.5 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ५*

**C-1.5 : हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्य रीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालविणे)**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • रस्त्यावरील सुरक्षितता महत्त्वाची आहे, हे ओळखतो. रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो. | • रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पाहतो, बरोबरच्या मुलांचे किंवा प्रौढांचे हात पकडून सुरक्षितपणे चालतो. | • स्वतंत्रपणे रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळतो. (रस्त्याच्या कडेने चालणे, रस्ता ओलांडणे इ.)<br>• वाहतुकीची चिन्हे ओळखतो. (सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, यू-टर्न, पूल/रेल्वे पूल इ.) | • सायकल चालवताना व इतर वेळेस रस्त्यावर सार्वजनिक वाहतुकीचे नियम पाळतो. | • रस्त्यावर चालताना आणि सायकल चालवताना वाहतुकीचे नियम पाळतो.<br>• सुरक्षिततेची चिन्हे ओळखतो आणि संभाव्य धोका टाळतो. (विद्युत, आग, दुरुस्ती, खोदकाम इ.) |

C-1.6 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-1.6 : असुरक्षित/धोकादायक परिस्थितीचे आकलन होऊन मदत मागतो.** | | | | |
| | **वय – ३ ते ८** | | | | |
| १ | • परिचित आणि अपरिचित व्यक्ती यांतील फरक ओळखतो. | • परिचित आणि विश्वासू प्रौढांनी विचारपूस केल्यास वाटत असणारी अस्वस्थता व्यक्त करतो.<br>• अपरिचित व्यक्तीकडून खेळणी, चॉकलेट, पैसे आणि इतर वस्तू स्वीकारत नाहीत. | • सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श कळतो.<br>• अपरिचित व्यक्तीपासून दूर राहतो.<br>• परिचित मोठ्या व्यक्तीकडे स्वतःहून अस्वस्थता, भीती व्यक्त करतो. | • मोजक्या शब्दांत प्रौढांची आणि समवयस्कांची मदत मागतो. | • अयोग्य स्पर्श आणि अयोग्य वर्तन दिसल्यास, त्याची तक्रार करतो आणि त्या व्यक्तीपासून दूर राहतो. |
| २ | | | • जखम झाल्यानंतर मोठ्यांची मदत मागतो. (उदा. खरचटणे, भाजणे, विजेचा धक्का) आपत्कालीन परिस्थितीमध्ये समाजातील मदत करणाऱ्या व्यक्तींना ओळखतो. – डॉक्टर, अग्निशमन दल | • सुरक्षिततेचे मूलभूत नियम समजून घेऊन वागतो. (भाजल्यानंतर जखम थंड पाण्याने धुतो.) | |

## CG - 2 : बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

ज्ञानेंद्रियांचा विकास हा अध्ययनाचा सार्वत्रिक पाया आहे. आपल्या संवेदनांच्या विकासामध्ये, आपल्या चेतापेशी, चेतातंतू त्यांच्यामधील परस्पर बांधणी आणि आपले विचार, आपले भौतिक जग यांवर होणारा परिणाम, सद्यःस्थितीमध्ये अधिक स्पष्ट झाला आहे. ज्ञानेंद्रियांच्या विकासामध्ये पूरक अनुभव फक्त बालकाच्या बोधात्मक विकासाकरिताच गरजेचे असतात असे नाही, तर ते बालकाच्या संपूर्ण सर्वंकष विकासाकरिता महत्त्वाचे असतात. ज्ञानेंद्रियांच्या विकासामध्ये लक्ष पुरविल्यास, भविष्यात अध्ययनावर परिणाम करणाऱ्या अडचणींचे लवकर निदान करण्याची संधी सुद्धा मिळते.

## C-2.1 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ७*

**C-2.1 : आकार, रंग आणि त्यांच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी) | • मूळ प्राथमिक व दुय्यम रंगांमधील छटा यांतील फरक ओळखतो. उदा., फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा. | • दोन रंग मिसळल्यावर/ एकत्र केल्यावर कोणता नवीन रंग तयार होईल याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. (उदा., निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो आणि लाल व पांढरा एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो. | • दोन रंग एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल याबाबत अंदाज बांधतो. | • कलाकृती चित्रकला, सजावट प्रदर्शन यामध्ये रंगाचा वापर आणि प्रयोग करतो. |
| २ | • वस्तूंचे त्यांच्या रंगांनुसार/गट करतो. (उदा., सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो.) | • लांबी, रुंदी, उंची या मितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो. (उदा. सर्व लांबसर वस्तू एकत्र करतो.) | • रंग आणि आकार या दृश्य वैशिष्ट्यांनुसार वस्तूंचे गट करतो. (जसे– सगळे लाल त्रिकोण एकत्र, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो.) | • विविध रंग, आकार आणि त्यांच्या छटा यांनुसार गट करून, आकृतिबंध तयार करतो, कोडी सोडवतो व खेळ खेळतो. | |

## C-2.2 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ८*

**C-2.2 : चिन्हे आणि प्रतीके यांकरिता दृक् स्मृती (Visual Memory) विकसित करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • दोन सारखे आकार, चिन्हे, यांच्या समान दिशा यांनुसार जोड्या लावतो. उदा. $+ \longleftrightarrow +$ $\infty \longleftrightarrow \infty$ | • समान रचना, परंतु भिन्न आकार व दिशा असणारी चिन्हे/प्रतीके जोडतो. उदा. $\times \longleftrightarrow +$ $\infty \longleftrightarrow 8$ | | • दृक् प्रतिमा ओळखतो, आठवतो व त्यांच्या जोड्या लावतो. (Memory game using cards.) | |

## C-2.3 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ९*

**C-2.3 : आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) आणि सूर-ताल-लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • मानव, प्राणी, वाहने, टाळ्या यांचा आवाज, पाण्याचा आवाज, वस्तूंचा आवाज इ. वातावरणातील आवाजांमधील वेगळेपणा ओळखतो. | • पक्षी, प्राणी, वाद्ये आणि मानवी आवाज यांच्या आवाजांच्या पातळींमधील चढउतारांतील फरक ओळखतो. | • आवाजाच्या पातळीमधील मध्यम स्वर ओळखतो. | • आवाजाची पातळी व मात्रा संदर्भात कोणतेही दोन ध्वनी, स्वर जुळत असल्यास ते ओळखतो. | • आवाजाच्या दिलेल्या पातळीतील स्वर चिन्हाच्या रेखीव व अरेखीव प्रगतिपथामध्ये फरक ओळखतो. |
| २ | • कर्कश व मृदू आवाजांतील फरक करतो. | • तालबद्ध ठेक्यातील मंद व वेगवान लयींमध्ये फरक करतो. | • मात्रा व लय यांमधील मध्यम श्रेणी ओळखतो. | • गाण्याच्या कडव्यामधील आवाजातील चढ-उतार/लयीमधील बदल ओळखतो. | |

## C-2.4 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – १०*

**C-2.4 : वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • सुगंध आणि दुर्गंध ओळखतो. उदा., अत्तर फुले, कचरा इ. | • फूल, अत्तर, खाद्यपदार्थ यांच्या सुगंधामधील फरक ओळखतो. | • धोकादर्शक गंध ओळखतो. उदा., धूर, सडलेली अंडी. | | |
| २ | • गोड, खारट, कडू, आंबट आणि तिखट चव ओळखतो. | • वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्यपदार्थांची चव व पोत (Texture) यांचा अनुभव घेतो. | | | |

C-2.5 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – ११

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-2.5 : विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.** | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | • कठीण/कडक – मऊ, गार– गरम, खरखरीत, खडबडीत, गुळगुळीत स्पर्शांमधील फरक समजतो. | • दोन वस्तूंमधील कठीण/ कडक – मऊ, गार–गरम, खरखरीत, खडबडीत व गुळगुळीत अशी स्पर्शांची तुलना करू शकतो. | • ३ ते ५ वस्तूंची कठीण/कडक – मऊ, गार–गरम, खरखरीत, गुळगुळीत अशा स्पर्शांनुसार क्रमवार मांडणी करू शकतो. (उदा., अति मऊ, मऊ, टणक , अति टणक) | • स्पर्शाबाबत सूक्ष्मपणे तुलना करतो. जसे – गुबगुबीत केसाळ, विणलेली, काटेरी, खडबडीत. | |

C-2.6 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – १२

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-2.6 : अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरिता, ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो.** | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | • जोराने श्वास बाहेर सोडणे. (उच्छ्वास) | • हलक्या वस्तू जोरात फुंकर घालून उडवतो. उदा. कागद | • लयबद्ध रीतीने श्वासोच्छ्वास | • श्वास आत घेण्यापेक्षा श्वास बाहेर सोडण्याची प्रक्रिया सावकाश व जास्त काळासाठी करू शकतो. | • अनुलोम – विलोम क्रिया करतो. |
| २ | | • अल्प काळासाठी स्थिर बसतो किंवा पडून राहू शकतो. (शवासन करणे.) | • स्थिर बसून अल्प काळासाठी आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करतो/नियंत्रण ठेवतो. | • स्थिर बसतो आणि अल्प काळासाठी आपल्या इतर ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांवर लक्ष केंद्रित करतो. | • स्थिर बसतो आणि स्वत:च्या विचारांचे निरीक्षण करतो. |

## CG - 3 : सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते.

विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्याकरिता या वयोगटातील मुलांसाठी विविध स्नायूंचा व्यायाम आणि त्यांच्यात समन्वय साधणे, ही एक महत्त्वाची विकासात्मक गरज आहे. शारीरिक समतोल राखणाऱ्या कारक हालचाली करताना, शरीराच्या स्थूल स्नायूंचा समन्वय आवश्यक असतो. सूक्ष्मकारक कौशल्यांशी निगडित हालचाली करताना, शरीरातील सूक्ष्म स्नायूंचा (उदा. डोळे व हातांची बोटे यांच्याशी संबंधित) सहभाग असतो. विविध स्नायूंच्या हालचालींमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे.

## C-3.1 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – १३*

**C-3.1 : विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडविणे (kick) या कृती नियंत्रितपणे करतो. | • मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडविणे या कृती जोर लावून करू शकतो.<br>• जवळच्या लक्ष्यावरील चेंडू काही प्रमाणात अचूकतने फेकतो. | • वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने उडविणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. | • एखादा खेळ, स्पर्धा इ. प्रसंगामध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि लाथेने उडविणे. (kicking Balls) या कृती सहजतेने करतो. | |

## C-3.2 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – १४*

**C-3.2 : विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभे राहू शकतो. | • एका पायावर जास्त काळासाठी आधाराशिवाय उभे राहू शकतो.<br>• ४–५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो.) | • १० ते १५ पावले एका पायावर उड्या मारतो. (लंगडी घालतो.) | • सक्षमपणे एका पायावर उड्या मारतो आणि लंगडीचा खेळ खेळता येतो. | • दोरीच्या उड्या सहजतेने मारतो. |
| २ | • अल्प वेळासाठी एका पायावर संतुलन साधू शकतो. | • वेगवेगळ्या पृष्ठभागांवर संतुलन साधू शकतो. जसे – विटा, शिडी | • डोक्यावर, हातावर वस्तू ठेवून तोल सांभाळतो. जसे – पुस्तक डोक्यावर ठेवून चालणे.<br>• चांगले शारीरिक संतुलन दर्शवतो. जसे – मदतीशिवाय सायकल चालवितो. | • जड वस्तू जसे – खुर्ची/टेबल/पिशवी योग्य तंत्राने आणि संतुलन साधत एका जागेवरून दुसरीकडे हलवितो/ठेवतो.<br>• गती प्राप्त करताना शारीरिक तोल सांभाळतो. (उदा. सायकल गतीने चालवतो. | • चपळता आणि संतुलन दर्शवतो. जसे – झाडावर चढणे, जंगल–जीमवर खेळणे.<br>• दुसरा पाय दुमडून एका पायावर एका मिनिटासाठी उभे राहू शकतो. जसे – ध्रुवासन. |

C-3.3 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ९५*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-3.3 : हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.** | | | | |
| | **वय – ३ ते ८** | | | | |
| १ | • साध्या कृतींमध्ये सूक्ष्म स्नायू विकास, हस्त–नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवितो. (उदा. गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटविणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम) | • ज्या कृती करताना सूक्ष्म स्नायूंचा वापर केला जातो, तसेच हस्त–नेत्र समन्वयात काही प्रमाणात अचूकता लागते, अशा कृती करताना स्नायूंवर नियंत्रण दर्शवतो. (उदा. मोठे आकार कापणे, मोठे मणी ओवणे, बटण लावणे, स्क्रू लावणे, बाटलीचे झाकण लावणे–उघडणे, क्रेयॉन्सचा वापर करून चित्र काढणे.) | • जास्त अचूकता लागणाऱ्या कृती सूक्ष्म स्नायूंच्या समन्वयाने थोड्या मदतीसह करतो. (उदा. पेन्सिलने चित्र काढणे, सरळ रेषेवर किंवा वक्र रेषेवर कापणे, छोटे मणी ओवणे) | • हस्त – नेत्र समन्वयासाठी आवश्यक असणाऱ्या कृती मदतीशिवाय करतो. (उदा. छोटा चेंडू झेलता येणे, भौमितिक आकार काढणे, वेगवेगळे आकृतिबंध तयार करता येणे.) | • सूक्ष्म स्नायूंवर जास्त अवधीसाठी ताबा लागणाऱ्या कृती जास्त अचूकतेने आणि तपशिलासह करतो. उदा. सुईत दोरा ओवणे, शिवणकाम, चित्रकला, रेखाटन करणे. |

## जास्तीची उदाहरणे

### वय – ३ ते ४

- एका हाताने ग्लास पकडतो.
- अंगठा आणि बोटाने रंगीत खडू धरतो.
- गिरगिटणे, रंगविणे यांसारख्या मनगटाशी निगडित कृतींमध्ये सहजतेने भाग घेतो.
- मातीकामात चेंडू/विविध आकार तयार करतो.
- चमच्यातील पदार्थ न सांडता चमचा पकडतो.
- कागदाची अगदी सोपी एक घडी करतो.
- मणी ओवतो, छिद्रात छोट्या वस्तू बसवितो, मोठी बटणे लावतो, बोथट कात्रीने पेपर कापतो.
- कागदाचे छोटे तुकडे मोठ्या कागदावर चिकटवताना समन्वय साधणाऱ्या हालचाली करतो.
- ठोकळ्यांचा/ब्लॉक्स्चा वापर करून साध्या रचना करतो.

### वय – ४ ते ६

- स्वतःचे जेवणाचे ताट स्वतः वाढून घेतो.
- जेवताना किंवा खाताना चमच्याचा योग्य वापर करतो.
- चित्रकलेच्या विविध साहित्याचा वापर करतो. जसे– क्रेयॉन्स, ब्रश, ठसे काम.
- ठोकळ्यांच्या मदतीने पुस्तकात दाखवलेले वेगवेगळे आकार तयार करतो.
- सरळ रेषेवर आणि वक्र रेषेवर कापतो.
- गुंतागुंतीच्या कृती, जसे रेषेवर कापणे, ओतणे, बटण लावणे इ. कृती करतो.
- लहान ठोकळ्यांचा मनोरा रचतो. (८ ते १० ठोकळे)
- ठरावीक आकृतिबंध विचारात न घेता देखील शिवणपाटीवर दोरी ओवणे, फुलांची माळ गुंफणे इ. कृती करतो.
- एखाद्या गोष्टीच्या रचनेसाठी दोन्ही हातांचा वापर करतो.
- ओळखता येतील अशी अक्षरे किंवा अंक यांचे लेखन करतो.
- सातत्याने लेखनासाठी किंवा चित्र काढण्यासाठी एकाच हाताचा वापर करतो.

### वय – ६ ते ८

- जमिनीवरून उसळी मारलेला चेंडू पकडतो.
- मणी किंवा फुले हव्या त्या आकृतिबंधात ओवतो.
- लेखन किंवा चित्र काढण्यासाठी बोटांच्या चिमटीत पेन्सिल अचूक पकडतो. कापताना, पकडताना, शिवताना, बटण लावताना वगैरे हाताच्या आणि बोटांच्या योग्य अशा हालचाली करतो.
- लेखन किंवा चित्र रंगवताना समन्वयित हालचाली करतो.
- लेखन आणि चित्रकला साहित्य हाताळताना, अचूक दाब व नियंत्रण दर्शवितो.
- दोन बाय दोन आकाराच्या ठोकळ्याची कडा कागदावर रेखाटतो.
- सोप्या भौमितिक रचना आणि नक्षींची नक्कल करतो.

C-3.4 : अध्ययन निष्पत्ती *तक्ता – १६*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-3.4 : एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवितो.** | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | • सरळ रेषेत चालतो.<br>• उलट चालतो.<br>• पायाच्या चवड्यावर चालतो. (६ पेक्षा अधिक पावले)<br>• दिशा व गती बदलून सहजतेने चालतो किंवा धावतो. | • सरळ, नागमोडी, वक्ररेषेवर सहजतेने चालतो.<br>• ६ इंच रुंदी असलेल्या फळीवरून तोल सांभाळून चालतो.<br>• एका वेळी एकाच पायाचा वापर करून, जिन्यावरून सहजतेने चढ-उतार करतो.<br>• बोगद्यामध्ये अरुंद जागी रांगू शकतो. | • शारीरिक हालचालींचा सहजतेने समन्वय साधत चालतो, धावतो.<br>• हात डोक्यावर ताणून धरून १० मीटरपर्यंत चवड्यावर चालतो. (ताडासन) | • विविध भूभागांवर सहजतेने १ किलोमीटर किंवा त्याहून जास्त चालतो.<br>• १ मिनिटपर्यंत ताडासन करतो. | • विविध भूभागांवर लांब अंतरापर्यंत (२ ते ३ किमी) चालण्याची क्षमता आणि चिकाटी दाखवतो. |
| २ | • एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळ्यावरून उडी मारतो.<br>• उंचावरून उडी मारून पायावर स्थिर उभे राहतो. (उंची – २.५ ते ३ फूट.) | • दोन्ही पायांनी उडी मारतो आणि एखाद्या कमी उंचीच्या वस्तूवरून कोणाच्यातरी साहाय्याने किंवा साहाय्य न घेता उडी मारतो. | • साधारण उंचीवरून सहजतेने उडी मारतो. (२ किंवा ३ पायऱ्यांवरून किंवा ३ फूटांच्या बाकावरून) | • सहजतेने चढतो किंवा उतरतो. (छोट्या झाडावरून) | • विविध वस्तूंच्या बाजूने, तसेच वरून उड्या मारू शकतो. |
| ३ | • हलकी वजने उचलू शकतो, हालचाल करू शकतो.<br>(जसे – लहान मग घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकतो.) | • शक्तीचे एखादे काम करण्याची तयारी दर्शवतो.<br>(जसे – वर्गातील छोट्या फर्निचरची हलवाहलवी करण्यास मदत करतो.) | • खेळामध्ये ताकदीची आवश्यकता असलेल्या कृती सहजतेने करतो. (जसे – रस्सीखेच खेळतो.) | • कामांमध्ये आणि खेळांमध्ये ताकद, सहनशक्ती आणि चिकाटी दाखवतो. (बागेमधल्या छोट्या कुंड्या उचलतो, पाण्याची बादली उचलतो, १५ मिनिटे धावतो.) | |

## १.१.२. सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास : (मनोमय कोश विकास)

बालकाच्या शारीरिक आणि बोधात्मक विकासाबरोबरच, भावनिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भावनिक बुद्धिमत्ता म्हणजेच, आपल्या भावना समजून घेण्याची आणि व्यवस्थापित करण्याची क्षमता. ही बोधात्मक बुद्धिमत्तेइतकीच महत्त्वाची आहे, हे आता प्रस्थापित झाले आहे. आपल्याला जर स्वतःच्या भावना समजून घेता आल्या, त्याचे नीट व्यवस्थापन करता आले, त्याचबरोबर इतरांच्या भावनिक अवस्था समजून घेता आल्या, तर यामुळे समानानुभूती आणि सहिष्णुता या भावना विकसित होण्यास मदत होते. या टप्प्यावर भावनिक आणि सामाजिक बुद्धिमत्तेचा भक्कम पाया अध्ययन निष्पत्तींद्वारे व्यक्त होतो.

**CG - 4 : बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात :** म्हणजे स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होते. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

**सकारात्मक स्व–प्रतिमा :** स्व–प्रतिमेच्या कल्पनेबाबतचे बदल आणि सातत्य, ओळखून 'स्व' ची जाणीव होण्याच्या क्षमतेकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

**भावनिक जागरूकता आणि त्याचे नियमन :** स्वतःच्या भावनांबद्दल जागरूक असणे आणि त्यांचे योग्यरीत्या नियमन करता येणे, ही क्षमता विकसित करणे महत्त्वाचे आहे आणि ही क्षमता वयाच्या उशिराच्या टप्प्यात विकसित करण्यापेक्षा, जेवढ्या लवकर विकसित करता येईल तितकी आवश्यक आहे. यामध्ये भावनांच्या नियमनाची क्षमता ही कोणाच्या धाकाने किंवा भीतीने विकसित होत नाही, तर ती स्वतःहून विकसित केलेले कौशल्य आहे, हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे, भावनिक विकास हा खरोखरच सौहार्दपूर्ण वातावरणातच होऊ शकतो.

**सामाजिक विकास :** सामाजिक बुद्धिमत्ता हा नैतिक, मानवतावादी आणि घटनात्मक मूल्यांच्या

**C-4.1 : अध्ययन निष्पत्ती**

*तक्ता – १७*

**C-4.1 : कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • स्वतःची स्वतंत्र व्यक्ती (unique) म्हणून ओळख दर्शवतो आणि आवड सांगतो. (उदा., आवडता शर्ट, बॅग, वस्तू.) | • स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा आणि शहर यांचा एक घटक म्हणून ओळखतो, जिथे वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात. | | • सामाजिक योगदान देण्याच्या दृष्टीने, स्वतःच्या क्षमता आणि आवड सांगण्यास सुरुवात करतो, जसे मी मोठा झाल्यावर डॉक्टर होईन. शेतकरी होईन, पायलट होईन, सैनिक होईन. | |
| २ | • स्वतःचे नाव व आडनाव सांगतो. | • स्वतःच्या ओळखीबाबतची इतर माहिती देतो. जसे – पालकांचे नाव | • ओळखीबाबतची वैयक्तिक माहिती देतो. जसे – घराचा पत्ता, कुटुंबातील व्यक्तीची माहिती, शाळेची माहिती. | • कुटुंबातील व्यक्तींचे व्यवसाय, त्यांचे कामाचे ठिकाण अशा प्रकारची वैयक्तिक माहिती देतो.<br>• आपल्या कुटुंबातील मोठ्या व्यक्तींच्या कामाबाबत आदर बाळगतो, जसे – माझी आई शेतकरी आहे आणि तिच्या कामामुळे मला जेवण मिळते. | |

## C-4.2 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – १८*

### C-4.2 : विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • स्वतःला काय हवे आहे ते सांगतो आणि स्वतः–च्या भावना ओळखतो. जसे – आज मला चित्र रंगवायचे नाही, मला बाहेर जायचे आहे.<br>• सोप्या भावना ओळखतो. जसे – भीती, आनंद, दु:ख | • भावनांची चेहऱ्यावरील हावभाव व शब्द यांच्याशी सांगड घालतो.<br>• भावनांना शाब्दिक शब्दांद्वारे, तसेच हावभाव व इतर प्रकारे व्यक्त करतो, जसे – चित्र रेखाटून, देहबोलीतून. | • स्वतःच्या भावना ओळखून त्याबाबत कारणे सांगतो, जसे – त्याने माझा मनोरा तोडला, म्हणून मला राग आला.<br>• स्वतःच्या भावना परिचित समवयस्क व इतरांना सांगतो. | • समाजमान्य मार्गाने स्वतःच्या भावना व्यक्त करतो. जसे – रडणे थांबवून, का रडत होतो हे सांगतो. | |
| २ | | | • जेव्हा रागावलेला किंवा निराश असतो, तेव्हा शांत होण्यासाठी कृती बदलण्याचे मान्य करतो. | • योग्य भावनांनी प्रतिसाद देतो, जसे – एकत्र गप्पांच्या वेळी विनोद झाल्यावर हसतो, उदास असताना शांत बसतो.<br>• स्वतःला शांत करण्यासाठी जाणीवपूर्वक काही कृती करतो. जसे – श्वासोच्छ्वासावर लक्ष केंद्रित करणे. कृती बदलतो. | |

## C-4.3 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – १९*

### C-4.3 : इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • कुटुंबातील जवळच्या/ठरावीक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो.<br>• परिचित मोठ्या व्यक्तींशी सहजतेने संवाद साधतो. | | • अल्पपरिचित मोठ्यांशी सहजपणे संवाद साधायला सुरुवात करतो. | • परिचित आणि अल्प परिचित मोठ्यांशी आदरपूर्वक संवाद साधतो, जसे – नमस्ते, कृपया, धन्यवाद, माफ करा. | |
| २ | • वर्गामध्ये पालकांशिवाय किंवा कुटुंबातील मोठ्या व्यक्तींशिवाय सहजपणे राहतो. | • ओळखीच्या मुलांसोबत सहजतेने, उस्फूर्तपणे खेळामध्ये सहभागी होतो. आवश्यकतेनुसार मोठ्यांच्या मदतीने खेळणाऱ्या बालकांच्या गटात सहभागी होतो. | • इतर मुलांशी काम आणि खेळासंबंधी कार्यनीती बनवितो. (उदा. खेळामध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रित करतो. आपापसात नियम समजावतो. वाटाघाटीमध्ये सहभाग घेतो. | • परस्परांच्या आवडीनिवडी ओळखून संघभावनेने इतर मुलांशी खेळतो. | • इतर मुलांशी खेळताना खेळातील विशिष्ट नियम समजून घेऊन, त्याप्रमाणे प्रतिसाद देतो. |
| ३ | | | • बहुतेक वेळा समवयस्कांशी खेळण्यासाठी मोठ्यांपासून स्वेच्छेने वेगळा होतो. | • समवयस्कांच्या सहवासात आनंदाने सहभागी होतो. | • समवयस्कांसोबत अधिक काळ घालवतो, तसेच मोठ्यांच्या आधाराने अपरिचित वातावरणात राहतो. (उदा., क्षेत्रभेट) |
| ४ | | | • किमान एका मुलाशी घट्ट मैत्री करतो आणि टिकवून ठेवतो.<br>• परिचित प्रौढांकडे मदतीसाठी मागणी करतो. | | • शाळेत मित्र मंडळींचा समूह बनवतो.<br>• अल्प परिचित प्रौढांकडे/आवश्यकतेनुसार मदतीसाठी विचारणा करतो.<br>• वयस्क आणि इतर मुलांना गरजेच्या वेळी मदत करतो. |

## C-4.4 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २०*

**C-4.4 : इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • इतर मुलांसोबत खेळायला सुरुवात करतो. | • इतर मुलांसोबत खेळताना आनंद घेतो. | • इतर मुलांसोबत खेळायला सुरुवात करतो आणि खेळासंबंधी योजना आखतो. (उदा., काय खेळू, कसे खेळू, कधी खेळू ) | • खेळादरम्यान इतरांच्या कल्पना स्वेच्छेने स्वीकारण्याची इच्छा दर्शवितो.<br>• इतरांसोबत खेळताना खेळाचे नियम पाळतो. | • इतरांसोबत खेळताना खेळाचे नियम तयार करतो आणि त्याचे पालन करतो. |

## C-4.5 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २१*

**C-4.5 : शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • दैनंदिन कृतीमध्ये सहभागी होतो. | • इतर मुलांसोबत दैनंदिन कृतीमध्ये आनंद घेतो. | • दैनंदिन कृतीमध्ये स्वावलंबन दर्शवितो.<br>• स्वतःचे काम पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारतो.<br>• स्वतःची गैरसोय/ अस्वस्थता इतरांना सांगतो व गरजेच्या वेळी इतरांची मदत घेतो. | • कृती आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतो.<br>• वेगवेगळ्या बालकांसोबत विविध कृती करण्याचे व कामाची विभागणी करण्याचे कौशल्य दाखवतो. | • एकत्र खेळताना किंवा काम करताना स्वतःचे मत मांडतो.<br>• काम स्वीकारतो आणि ते पूर्ण करतो. |
| २ | • शिक्षकांच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो. | • आपली वेळ येण्याची वाट बघतो.<br>• साध्या लहान सूचनांचे पालन करतो. | • शाळेत मोठ्यांनी आठवण करून दिल्याशिवायही साध्या नियमांचे पालन करतो. | • सूचना/नियमांचे पालन करतो.<br>• नियम उल्लंघनाचे परिणाम समजतो. | |

## C-4.6 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २२*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-4.6 : गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतींसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.** | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | | • इतर बालके आणि प्रौढांप्रति आपुलकी दाखवितो. | • साहित्य काळजीपूर्वक हाताळतो. (आपले साहित्य इतरांना देतो व इतरांचे साहित्य काळजीपूर्वक हाताळतो.) | • इतर सजीवांशी वागताना काळजी व दयाळूपणा दाखवितो. | • सामायिक कार्य करताना इतर दयाळू भाव आणि स्नेह दाखवून कार्य करतो. |

## C-4.7 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २३*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-4.7 : इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.** | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | | • बालक सर्व मुलांशी त्यांची पार्श्वभूमी व क्षमतांबद्दल विचार न करता खेळतो व संवाद साधतो. | • बालकांमधील सारखेपणा व वेगळेपणा ओळखण्यास सुरुवात करतो. (उदा. उंची, लिंगभाव, बोलण्याची पद्धती व खाण्याच्या आवडीनिवडी) | • वर्गातील कृती करताना मिश्र गटात व्यवस्थित काम करतो.<br>• इतर बालकांमध्ये असणाऱ्या वैविध्यामुळे त्यांच्याबाबत वर्चस्ववृत्ती/दादागिरी किंवा नावे ठेवणे अशा कृती करत नाही. | • स्वत:पेक्षा वेगळ्या असलेल्या व्यक्तींबद्दल कुतूहल आणि स्वारस्य दाखवतो.<br>• व्यक्तींमधील साम्यभेदांवर आधारित प्रश्न विचारतो.<br>• समवयस्क मित्रांच्या वैविध्यपूर्ण गटांमधील साम्य आणि भेद माहीत असून देखील त्यांच्यामध्ये सहजरीत्या मिसळतो. |

## CG - 5 : बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**C-5.1 : अध्ययन निष्पत्ती**

*तक्ता – २४*

**C-5.1 : इतरांना मदत करण्यासाठी वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | क | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • खेळून झाल्यावर खेळणी आणि इतर साहित्य जागच्या-जागी ठेवतो. | • शिक्षकांना मदत करतो. व वर्ग सुव्यवस्थित ठेवतो. | • जेवल्यानंतर स्वतःचे ताट किंवा खाऊचा डबा स्वच्छ करतो.<br>• घरी आणि/किंवा शाळेत दैनंदिन कामे करतो. (उदा., खेळणी ठेवणे, झाडांना पाणी देणे.) | • स्थानिक झाडाचे बी रुजवतो आणि रोपट्याची निगा राखतो. | • अध्ययन-अध्यापन साहित्य निर्मितीमध्ये शिक्षकांना साहाय्य करतो.<br>• स्वयंपाक घरात धुणे, कापणे इ. कामामध्ये मदत करतो. |

## CG - 6 : बालके स्वतः भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.

**C-6.1 : अध्ययन निष्पत्ती**

*तक्ता – २५*

**C-6.1 : सर्वप्रकारच्या जीवांची काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करताना कुतूहल दर्शवितो. | • झाडे आणि प्राणी यांना विनाकारण इजा करत नाही. | • स्थानिक वातावरणातील झाडे आणि प्राणी यांच्या सहवासात आनंद व्यक्त करतो.<br>• निसर्गात रममाण होत असताना अस्वस्थता दाखवत नाही. (उदा., बागेत किंवा उद्यानात) | • विशिष्ट वनस्पती आणि प्राणी ओळखण्यात उत्सुकता आणि स्वारस्य दाखवतो.<br>• रोपे आणि झाडांचे संगोपन आणि काळजी घेण्याची जबाबदारी घेतो. | • मांजरीचे, कुत्र्याचे, कोंबडीचे पिलू, यांसारख्या प्राण्यांचे संगोपन आणि काळजी घेण्याची जबाबदारी घेतो.<br>• निसर्गामध्ये फेरफटका मारताना, झाडे आणि प्राणी यांचे निरीक्षण करण्याचा आनंद घेतो. |

### १.१.३. बोधात्मक विकास : (विज्ञानमय कोश विकास)

या वयोगटातील बालके आपल्या अनुभवांच्या आधारे सभोवतालच्या जगाबद्दल वेगाने संकल्पना विकसित करत असतात. अर्थपूर्ण अध्ययनासाठी, औपचारिक शिक्षणात संकल्पना विकसित करताना अनुभव आणि आकलनाच्या विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. केवळ वस्तुस्थिती लक्षात ठेवणे हा हेतू नसावा. वस्तुनिष्ठ ज्ञान, तार्किक विचार, समस्या निराकरण या क्षमतांचा विकास, तसेच गणितीय क्षमता आणि विचारांचा विकास व बालकाच्या सभोवतालच्या नैसर्गिक आणि सामाजिक वातावरणाशी संबंधित विकास म्हणजे बोधात्मक विकास होय.

### CG - 7 : बालकांच्या सवयीचे निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

बालकांमध्ये ठळकपणे, वस्तू, घटना आणि त्यांच्यातील परस्परसंवादाद्वारे त्यांच्या सभोवतालचे जग ओळखण्याची क्षमता जन्मजात असते. पुरेसे अवधान आणि संधी दिल्याने या क्षमता अधिक दृढ होतात. लहान बालकांच्या तार्किक विचार आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित केल्याने, ती जिज्ञासू आणि आजीवन अध्ययनार्थी बनतात.

**C-7.1 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता - २६*

**C-7.1 : वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.**

वय - ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. | • वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना इ. नावासहित ओळखून स्वतः त्याचे वर्णन करतो. | • लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती, चित्रे ओळखतो, त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगतो/वर्णन करतो. (उदा. घराचा मोठा दरवाजा) | • लगतच्या परिसरातील वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि त्यांच्या प्रतिकृती/चित्रे ओळखतो. त्यांचे बारीक -सारीक तपशिलासह वर्णन करतो. (उदा. एका छोट्या पिवळ्या घराचे लाल रंगाचे मोठे दार) | |
| २ | • परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेला भाग ओळखतो. | • परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ३ ते ५ भाग ओळखतो. | • परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेले ४ ते ६ भाग ओळखतो. | • दिलेल्या वस्तू/चित्रांमध्ये तुलना करतो आणि त्यातील साम्य आणि भेद ओळखतो. | |
| ३ | • गटामधील श्रेणीबद्ध संबंध ओळखतो. (उदा. प्राणी आणि त्यांची लहान पिले)<br>• गटात आणि गटांमध्ये तुलना करतो.<br>• पर्यायी वस्तूचा वापर करून खेळतो. (उदा. टेलिफोन म्हणून इतर वस्तू वापरतो.)<br>• वस्तू आणि त्यांचा वापर यांच्यात संबंध निर्माण करतो. (उदा. चमचा-खाण्यासाठी, बादली-अंघोळीसाठी) | | | | |

**C-7.2 : निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | • एका वस्तूचा दुसऱ्यावर होणारा परिणाम ओळखतो. (उदा. मी पाण्यात मीठ घातले, तर ते विरघळेल, मी बर्फ उन्हात ठेवला, तर तो वितळेल.)<br>• वस्तूंवरील साध्या क्रियांचे परिणाम स्पष्ट करतो. (उदा. चेंडूला जोरात लाथ मारल्यावर तो पुढे जाईल.)<br>• कार्यकारणभाव जोडतो. (उदा. अब्दुल आजारी असल्यामुळे तो शाळेत आला नाही, पाऊस न पडल्यामुळे रोप जगले नाही)<br>• कार्यकारण संबंधांवर आधारित अंदाज बांधतो. (उदा. आकाशात पांढरे ढग असल्यास पाऊस पडणार नाही.) | | |
| २ | • निरीक्षणावर आधारित कल्पनांचा किंवा युक्त्यांचा उपयोग करतो. (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृतीचे अनुकरण करतो. | • ज्ञात माहितीचा नवीन संदर्भात वापर करतो. (उदा. पुस्तका–तील चित्राप्रमाणे ठोकळ्यांचा महाल/ मनोरा बनवितो.) | • निरीक्षण करून सामान्यीकरण करतो. (उदा. गोल फिरणाऱ्या वस्तूंचे अवलोकन/ निरीक्षण करतो. चाके, बांगड्या यांचा आकार वर्तुळाकार असतो.) | • सोप्या परिकल्पना तयार करतात आणि त्यांचे परीक्षण करतो. (उदा. कागदी थाळी तरंगते व पिन बुडते, कागदाचा तुकडा व दगड एकाच वेळी पाण्यात टाकल्यास कोणती वस्तू तळाशी आधी पोहोचेल.<br>• सोपे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या आकलनाचा वापर करतो. (उदा. वाळूचे घर बनविताना आधारासाठी काठी किंवा ते स्थिर होण्यासाठी पाण्याचा उपयोग करतो.) | |
| ३ | • दिवस–रात्रीत फरक करतो. | • उन्हाळा आणि हिवाळा ओळखतो.<br>• आकाशातील खगोल शास्त्रीय गोष्टी ओळखतो. (सूर्य, चंद्र, तारे, ढग) | • उन्हाळा आणि हिवाळा ऋतूनुसार कपडे आणि अन्नपदार्थ ओळखतो.<br>• दिवस–रात्रीचा संबंध, सूर्योदय आणि सूर्यास्त यांच्याशी संबंध जोडतो. | • उन्हाळा, पावसाळा, हिवाळा ऋतू यांत फरक करतो.<br>• सूर्य आणि चंद्र यांचा उदय व अस्ताची दिशा दाखवितो. | • दिशांची नावे सांगतो. (पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर) |
| ४ | • आवडी–निवडीनुसार प्राधान्यक्रम ठरवतो. | • स्वतःचे प्राधान्यक्रम, आवड व्यक्त करतो आणि त्यानुसार निवड करतो. | • स्वतःची आवड आणि प्राधान्यक्रम विचारात घेऊन जबाबदारीने निवड करतो. | • खेळ/कृतीमध्ये सहभागी होतो. स्वतःच्या आवडी निवडी व प्राधान्यावर आधारित मित्र बनवितो. | • स्वतःची आवड, निवड व प्राधान्याप्रमाणे खेळ आणि खेळाशी संबंधित साहित्य निवडतो. |

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| ५ | | • शिक्षक व समवयस्कांच्या मदतीने पर्यावरणातील घटना व प्रसंगांबाबतच्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देतो. | • नैसर्गिक घटनांबाबत चिकित्सक प्रश्न विचारून, उत्तरे मिळवण्यासाठी समवयस्कांसोबत समन्वय साधतो/शोध घेतो. (उदा. काय बुडते, काय तरंगते? लोहचुंबकाकडे कोणत्या वस्तू आकर्षित होतात?) | • नैसर्गिक घटनेबाबतच्या मोठ्या प्रश्नांचे छोट्या प्रश्नांच्या यादीत रूपांतरण करतो. • नैसर्गिक पर्यावरणातील आकृतिबंधाबाबत प्रश्न विचारतो. (उदा. विविध पाने व फुलांचे प्रकार, सूर्योदय व सूर्यास्त) | • नैसर्गिक घटनांबाबत 'का' व मुक्त प्रश्न विचारून, संवाद किंवा शोधनाद्वारे उत्तरांचा शोध घेतो. (उदा., पाऊस का पडतो? जर सूर्यप्रकाश नसला, तर काय होईल इ.) |
| ६ | • एखाद्याच्या कृतीचा किंवा वर्तनाचा इतरांवर होणारा परिणाम स्पष्ट करतो. (उदा. कुत्र्याला दगड मारल्याने त्या मुक्या प्राण्याला त्रास होतो, नळ बंद न केल्याने पाणी वाया जाते.) | • झाडे, प्राणी, पक्षी यांच्या गरजांविषयी स्वतःचे मत मांडतो. | • सामाईक नैसर्गिक संसाधनांची संकल्पना स्पष्ट करतो. (उदा. आपल्याला पाणी गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्राणी, पक्षी, व वनस्पती यांनाही गरजेचे आहे.) | • नैसर्गिक पर्यावरण व मानव यांतील परस्परावलंबनाचे वर्णन करतो. (उदा. पाण्याच्या विविध स्रोतांद्वारे आपल्या घरी पाणी येते.) | • मानवी समाज, गरजा व नैसर्गिक वातावरण यांमध्ये समतोल कसा साधायला पाहिजे याचे वर्णन करतो. (उदा. आजारांपासून प्रतिबंध करण्यासाठी कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे.) |

## C-7.3 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २८*

**C-7.3 : दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • चित्रकाम व रंगकाम करताना साधी साधने वापरण्यात निपुणता दर्शवितो. | • खेळताना बालक साधी साधने वापरण्याकडे कल दर्शवितो. • डिजिटल व दृकश्राव्य साहित्य वापरताना काळजीपूर्वक लक्ष देतो. | • मातीकाम किंवा शिल्पकला/कलाकाम करताना योग्य कामासाठी योग्य साधने निवडतो. • शिक्षकांच्या मदतीने डिजिटल तंत्रज्ञान, जसे की स्मार्टफोन, TABLETS चा वापर करतो. | • कृती करताना परिणामकारकपणे साधनांचा वापर करतो. • अध्ययन करताना डिजिटल साधनांचा सहज वापर करतो. (उदा. दृक् श्राव्य साहित्य सुरू करणे/मध्येच थांबविणे. | • सोपी साधने तयार करतो व दैनंदिन कृतींमध्ये त्यांचा वापर करतो. • अध्ययन करताना डिजिटल व दृकश्राव्य साधने सहजपणे व निपुणतेने वापरतो. |

## CG - 8 : बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात.

संख्याज्ञान व संख्येवरील क्रिया यांना सुरुवात करण्यापूर्वी वर्गीकरण करणे, आकृतिबंध शोधणे, मोजणे इ. गणनपूर्व तयारीमध्ये बालकांना सहभागी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे प्रमाणित रीतीसह संख्याज्ञान होण्यासाठी मदत होईल.

### C-8.1 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – २९*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | C-8.1 : एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो. | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | • आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू दोन गटांत वेगळ्या करतो. (लहान–मोठा, लांब–आखूड) | • आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू तीन गटांत वेगळ्या करतो. (लहान आकाराचे–मोठ्या आकाराचे–अधिक मोठ्या आकाराचे) | • गुणधर्मानुसार/ गुणधर्मावर आधारित वस्तूंचे गट करतो. | • गुणधर्मानुसार वस्तू वेगळ्या करतो आणि त्यामागील नियमांचे वर्णन करतो. (उदा., समान वातावरणात राहणाऱ्या प्राण्यांचे गट करतात. जसे – कुत्रे, मांजर, उंदीर, साप शाकाहारी (गवत खाणारे) व मांसाहारी असे वेगळे करतो. | • गटात व उपगटात वस्तू वेगळ्या करतो. (उदा., ठोकळ्यांचे प्रथम रंगांवर आधारित, त्यानंतर आकारांवर आधारित, आकारमानावर आधारित गट बनवितो. झाडांचे प्रकार व वेली ओळखतो. यांमध्ये फळ येणारी व फळ न येणारी आणि त्यातील खाण्यायोग्य व खाण्यास अयोग्य असे प्रकार ओळखतो. |

## C-8.2 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ३०*

### C-8.2 : आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • आकृतिबंध ओळखतो. आकार, पाने, फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतो. (पान–फूल, पान–फूल,..., अ–ब, अ–ब, अ–ब,...)<br>• आवाजांमधील आकृतिबंध ओळखतो व पुनरावृत्ती करतो. (उदा., सा रे ग म, सा रे ग म..., ध–म–ग, ध–म–ग)<br>• हालचालींचे आकृतिबंध ओळखतो आणि पुनरावृत्ती करतो. उदाहरणार्थ, हात खाली, हात वर, हात खाली, हात वर, उडी मार, उभा रहा, उडी मार, उभा रहा इ. | • आकृतिबंधातील पुनरावृत्ती असणारा घटक ओळखतो. ३ ते ४ वस्तू, आकार, चित्र यांचा वापर करून 'ABC ABC' प्रकारचा आकृतिबंध तयार करतो. (पेन–पुस्तक–पेन्सिल, पेन–पुस्तक–पेन्सिल, अ ब क अ ब क)<br>• आवाज किंवा विशिष्ट कृतींमधील आकृतिबंध ओळखतो व आकृतिबंधाचा विस्तार करतो.<br>• तीन विविध शारीरिक हालचालींचा आकृतिबंध स्पष्टपणे ओळखतो. विस्तारित करतो. | • रंग, आकार, माप या विविध वैशिष्ट्यांनुसार नवीन आकृतिबंध स्वतः तयार करतो.<br>• आकृतिबंधातील नियम सांगतो आणि वेगवेगळ्या वस्तूंमध्ये नवीन आकृतिबंध तयार करतो. | • मोठ्यांच्या मदतीने सोप्या आकृतिबंधातील हरवलेला घटक ओळखतो/शोधतो. (उदा., लाल–निळा, लाल–निळा, लाल–.....) | • आकृतिबंधातील नियमांचे वर्णन करतो व संख्या, चिन्हे, तर्कावर आधारित अमूर्त आकृतिबंधामध्ये त्याचा वापर करतो. (उदा., चित्र काढताना, रंगविताना रंगांचा वापर करून आकृतिबंध तयार करणे, समान ठिपक्यांचा/चिन्हांचा विविध आकृतिबंधामध्ये वापर करणे.)<br> |

## C-8.3 : १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या दोन्ही प्रकारे (पुढे आणि मागे) मोजतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • संदर्भासह क्रमाने पाचपर्यंतच्या संख्यांचे गाणे गातो/संख्यानामे सांगतो.<br>• ३ पर्यंत संख्यांची नावे आणि वस्तूंमधील एकास एक संगती वापरून, मोजणी करताना मोठ्यांचे अनुकरण करतो.<br>• ३ पर्यंत वस्तूंची मोजणी करतो आणि त्याला तीन असे म्हणण्याची समज विकसित होते. (उदा., तीन पर्यंत मोजणे आणि त्याला तीन म्हणणे.)<br>• दिलेल्या वस्तू किंवा खेळणी मोजतो किंवा त्यांतील पाच पर्यंतच्या वस्तू/खेळणी उचलून काढून देतो. (उदा., ठोकळे देणे.)<br>• तीन पर्यंतच्या वस्तूंच्या दोन गटांची तुलना करतो. कोणत्या गटात कमी, जास्त किंवा समान वस्तू आहेत ते सांगतो. | • १० पर्यंतची संख्यानामे योग्य क्रमाने सांगतो/गातो आणि ५ पर्यंतची संख्यानामे व वस्तू यांची एकास एक संगती लावतो.<br>• संख्येचे मूल्य समजून घेऊन वस्तूंची मोजणी करतो. (५ पर्यंतचा संच ओळखतो.)<br>• संख्येबाबतची समज दर्शवितो. (उदा. ५ म्हणजे ५ विविध वस्तू – ५ व्यक्ती, ५ पुस्तके, ५ पेन्सिली इ.)<br>• ५ पर्यंत मूर्त बाबी, सुट्या वस्तू व अमूर्त गोष्टी सहजतेने मोजतो. (५ पावले, ५ टाळ्या)<br>• १० पर्यंतच्या संख्या स्मृतीच्या आधारे योग्य क्रमाने मोजतो.<br>• २० पर्यंत मोजण्यास सुरुवात करतो. | • २० पर्यंत संख्यानामे म्हणतो आणि मोजतो. संख्यानामे व वस्तू यांची १० पर्यंत एकास एक संगती लावतो.<br>• संख्यांचे मूल्य समजून घेऊन १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो.<br>• संख्यांचे मूल्य समजून घेऊन १० पर्यंत वस्तूंची मोजणी करतो.<br>• दिलेल्या संचातील वस्तूंची कोणत्याही क्रमाने मोजणी करतो आणि हे समजून घेतो, की कोणत्याही क्रमाने मोजणी केली तरी वस्तूंची संख्या समानच राहते. (उदा., ओंजळभर मणी दिले असता, कोणत्याही क्रमाने मोजणी करतो व वस्तूसंख्या अचूकपणे सांगतो.)<br>• '०' ही संकल्पना संख्या म्हणून दिलेल्या संचातील वस्तू कमी करून (उलट मोजणे) यापद्धतीने समजून घेतो. (उदा., ३ मण्यांची उलट मोजणी, एक नंतर किती राहिल?)<br>• संख्येची दर्शनी किंमत व स्थानिक किंमत (क्रमागतता) आणि वस्तूचे डावीकडून उजवीकडे व विरुद्ध बाजूने क्रमागत स्थान यांची समज दर्शवितो.<br>• उदाहरणार्थ : खालील क्रमानुसार<br>उजवीकडून तिसरा →<br>१ २ ३ ४ ५ ६ ७<br>★ ★ ★ ★ ★ ★ ★<br>७ ६ ५ ४ ३ २ १<br>← डावीकडून पाचवा | • २० पेक्षा जास्त वस्तू, ९९ पर्यंतच्या संख्यानामांनी मोजतो आणि १०–१० च्या टप्प्याने ९९ पर्यंत संख्या मोजतो.<br>• विशिष्ट अंकांपासून पुढे व मागे अशी मोजणी करतो. (० ते ९९ पर्यंत) | • संख्यारेषेवर/चौकटीच्या कागदावर/ठोकळ्यांवरून/चित्रांवरून २ किंवा ३ च्या टप्प्याने अंक वगळून मोजणी करून दाखवितो.<br>• ९९ पर्यंतच्या भारतीय लिपीतील संख्यांचे दशक आणि एकक रूपात स्थानिक किंमत लक्षात घेऊन, वाचन व लेखन करतो.<br>• १०, २०, ३० च्या टप्प्याने ९९ पर्यंत संख्या गटाने मोजतो. |

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | • दोन किंवा तीन वस्तूंचा गट ओळखून निरीक्षणापेक्षा तत्काळ सांगतो. | • चार वस्तूंचे गट ओळखतो. (उदा., ४ बिस्किटे, फळे, ठोकळे न मोजता सांगतो.) | • ६ वस्तूंच्या गटांची गणना त्वरित करतो. (उदा., ६ बिस्किटे, गोळ्या किंवा ठोकळे न मोजता ओळखतो.)  | • दोनच्या गटातील संख्या/राशी ओळखतो. (उदा., १० चे दोन गट म्हणजे २० करतो.) | |

**C-8.4 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता – ३२*

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-8.4 : चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.** | | | | |
| | **← वय – ३ ते ८ →** | | | | |
| १ | • परिचित प्रसंग घटना/वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार, २–३ आकार) | • ३ स्तरांपर्यंत मापाच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावतो आणि त्यांचे स्तर शब्दबद्ध करतो. (मोठे–लहान – जास्त लहान, लांब, आखूड, सर्वांत जास्त आखूड) | • आकार/लांबी/वजनावर आधारित ५, वस्तू चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडतो. | • एकाच गटातील वस्तूंची त्यांच्या विविध गुणधर्मांनुसार मांडणी करतो. (उदा. माप, लांबी, वजन, रंग) • दिलेल्या संख्यांची चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडणी करतो. (१ ते ९) | • दिलेल्या संख्यांची चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडणी करतो. (९९ पर्यंतच्या) |

C-8.5 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ३३*

C-8.5 : स्थानिक किमतीचा वापर करून ९९ पर्यंतच्या संख्या दर्शविण्यासाठी संख्याचिन्हांचा वापर करतो आणि संख्या ओळखतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • ३ पर्यंत दोन संख्यांची (तोंडी) तुलना करतो व जास्त–कमी असा शब्दसंग्रह वापरतो. | • ५ पर्यंत संख्या ओळखतो.<br>• ५ पर्यंत दोन संख्यांची तुलना करतो व च्यापेक्षा जास्त, च्यापेक्षा कमी असा शब्दसंग्रह वापरतो. | • ९ पर्यंत संख्या ओळखतो.<br>• ९ पर्यंतच्या संख्या सहजतेने लिहितो.<br>• ९ पर्यंत दोन संख्यांची तुलना करतो आणि च्यापेक्षा जास्त, च्यापेक्षा कमी असा शब्दसंग्रह वापरतो. | • वस्तू/बाबींची अनुपस्थिती दाखविण्यासाठी शून्याचे चिन्ह ओळखतो/वापरतो.<br>• २० पर्यंतच्या संख्या ओळखतो व लिहितो आणि १० पर्यंत संख्यानामे लिहितो.<br>• २० पर्यंतच्या दोन संख्यांची तुलना करतो व च्यापेक्षा मोठा, च्यापेक्षा लहान असा शब्दसंग्रह वापरतो. | • स्थानिक किंमत संकल्पना वापरून ९९ पर्यंतच्या संख्या ओळखतो, वाचतो व संख्यानामे लिहितो.<br>• दोन अंकी लहानात लहान व मोठ्यात मोठी संख्या तयार करतो व तुलना करतो. (दिलेल्या अंकानुसार अंकांची पुनरावृत्ती न करता.) |

## C-8.6 : संख्यांची जोड (composition) व फोड (decomposition) आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचीक कार्यनीतींचा वापर करून, दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • तोंडी उत्तर देण्याऐवजी ३ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो किंवा गट करतो. | • ५ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो, पुन्हा मोजतो. (उदा., माझ्याकडे २ आणि माझ्या बहिणीकडे ३ चॉकलेट आहेत, तर आता एकत्र करून, माझ्याकडे एकूण किती चॉकलेट आहेत?)<br>• वस्तूंच्या गटातून ५ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो. | • ९ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करतो व पुन्हा मोजतो. उदा., माझ्याकडे ५ आणि माझ्या बहिणीकडे ३ चॉकलेट आहेत. तर आता एकत्र करून, मोजून सांग माझ्याकडे एकूण किती चॉकलेट आहेत?<br>• वस्तूंच्या गटातून ९ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो व पुन्हा मोजतो. | • दैनंदिन परिस्थिती आणि मूर्त वस्तूंचा वापर करून १८ पर्यंत उत्तर येईल अशी उदाहरणे, बेरजेची तथ्ये वापरून गणितीय मांडणी करून सोडवितो.<br>• वजाबाकीवर आधारित व ९ पर्यंत उत्तरे येणारी उदाहरणे सोडविण्यासाठी आणि त्यांची गणितीय मांडणी करण्यासाठी दैनंदिन जीवनातील परिस्थितींचा आणि मूर्त वस्तूंचा उपयोग करतो. (उदा., चॉकलेटच्या समूहातून विशिष्ट चॉकलेट काढून घेणे.)<br>• संख्यांची बेरीज आणि वजाबाकी यांच्यातील संबंध विकसित करतो.<br>• बेरीज/वजाबाकी या क्रियांसाठी +/– चिन्हे ओळखतो. | • संख्यांचे गट करणे किंवा फोड करणे यांसारख्या कार्यनीती बेरीज व वजाबाकी करण्यासाठी वापरतात. उदा., ५७ +३३ या उदाहरणात ३३ पैकी ३ घेऊन ५७ मध्ये मिळवून ६० संख्या काढतो आणि ३० मिळवून ९० उत्तर काढतो.<br>• स्थानिक किंमत ही संकल्पना वापरून, ९९ पर्यंतच्या दोन संख्यांची बेरीज करतो. (उत्तर ९९ पर्यंतची संख्या येईल.) दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी त्याचा वापर करतो.<br>• स्थानिक किंमत ही संकल्पना वापरून, ९९ पर्यंतच्या दोन संख्यांची वजाबाकी करतो. दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी त्याचा वापर करतो.<br>• बेरीज आणि वजाबाकी मधील सहसंबंध ओळखतो आणि त्याचे उपयोजन करतो.<br>• परिचित वातावरणातील उदाहरणे सोडवण्यासाठी योग्य गणिती क्रिया ओळखतो. (बेरीज किंवा वजाबाकी)<br>• सोपी शाब्दिक उदाहरणे समजून घेतो आणि सोडवतो. |

C-8.7 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – ३५

**C-8.7 : गुणाकार म्हणजे पुन्हा-पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | • वस्तूंचे लहान गट करतो. एकूण वस्तू आणि गट मोजतो. | • गट करून लहान संख्येची गुणाकाराची उदाहरणे सोडवतो.<br>• गुणाकाराचे चिन्ह ओळखतो. | • पुन्हा:पुन्हा बेरीज करून ९९ पर्यंतच्या संख्येचे सोपे गुणाकार करतो.<br>(उत्तर ९९ पर्यंतची संख्या) |
| २ | • दिलेल्या वस्तूंचे वाटप करतो. | • २ जणांमध्ये ६ वस्तूंचे समान वाटप करतो. (६ पर्यंत) | • ४ ते ५ जणांमध्ये वस्तूंचे समान वाटप करतो. (२० पर्यंत) | • भागाकाराची उदाहरणे सोडविण्यासाठी गटात विभागणी करतो व प्रयत्न-प्रमाद (trial and error) पद्धतीचा वापर करतो.<br>• भागाकाराचे चिन्ह ओळखतो. | • पुन्हा:पुन्हा वजाबाकीचा वापर करून, भागाकार करण्यासाठी ९९ पर्यंतच्या संख्यांचे किती गट करावे लागतात हे सांगतो. |

## C-8.8 : मूलभूत भौमितिक आकार ओळखतो व तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • आकार, माप किंवा रंग यांपैकी एक वैशिष्ट्य वापरून जोड्या लावतो.<br>• आकार, रंग आणि माप यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो.<br>• साध्या सूचनांचे पालन करतो आणि वस्तू आकार, रंग आणि माप यांनुसार जागेवर ठेवतो. उदा., लाल फुगा इथे आण आणि गोल चेंडू टेबलावर ठेव. | • भिन्न माप आणि रंग यांच्या आधारे आकारांच्या जोड्या लावतो.<br>• दोन घटकांनुसार वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (उदा. आकार–रंग, रंग–माप)<br>• विविध घनाकृती/आकार यांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे त्यांच्या स्वतःच्या भाषेत वर्णन करतो. (उदा. चेंडू घरंगळतो आणि त्याला कोपरे नसतात. खोका घसरतो आणि त्याला कोपरे असतात.)<br>• स्थितीदर्शक शब्द समजून आकृतिबंध तयार करण्यासाठी, आकार, रंग, स्थान यांचा वापर करून, टप्प्याटप्प्याने दिलेल्या सूचनांचे पालन करतो; जसे की, ठिपक्यांची रांगोळी काढणे, चिकटचित्रे बनविणे. त्यासाठी मध्यभागी, वर, खाली हे स्थानदर्शक शब्द समजून घेतो. | • भिन्न आकारमान आणि अभिमुखता असलेल्या आकारांच्या जोड्या लावतो. (भिन्न दिशा दर्शवणारे त्रिकोण आणि आकार यांच्या जोड्या लावतो.)<br>• तीन घटकांद्वारे वस्तूंची तुलना आणि वर्गीकरण करतो. (उदा. आकार, रंग आणि माप)<br>• वस्तू माप, आकार वर्णन करण्यासाठी स्थलदर्शक शब्द वापरतो. (वर, खाली, आत, बाजूला)<br>• कागदावर त्रिमितीय आकार (3D) गिरवून, द्विमितीय आकार (2D) काढतो व ओळखतो.<br>• मुक्तहस्ताने द्विमितीय आकार अचूकपणे काढतो. | • अवकाशीय संबोध वापरतो व शब्दसंग्रह विकसित करतो. (उदा. वर, खाली, आत, बाहेर, जवळ, दूर, आधी आणि नंतर)<br>• आजूबाजूच्या परिसरातून विविध आकार आणि मापांच्या वस्तू गोळा करतो. (उदा. खडे, खोके, चेंडू शंकू, पाईप)<br>• विविध आकार आणि इतर निरीक्षणीय गुणधर्मांच्या आधारे वस्तू वेगळ्या करतो आणि वर्गीकृत करतो.<br>• स्वतःच्या भाषेत विविध आकारांच्या भौतिक वैशिष्ट्यांचे निरीक्षण आणि वर्णन करतो. उदा. बॉल घरंगळतो. बॉक्स घसरतो आणि त्याला कोपरे असतात.<br>• विविध गुणधर्मांवर आधारित आकारांची तुलना करतो. (उदा. लांबी, क्षेत्रफळ, आकारमान) | • त्रिमितीय आकार व त्यांची नावे ओळखतो. (उदा., इष्टिकाचिती, घन, शंकू, दंडगोल, गोल) आणि निरीक्षणक्षम वैशिष्ट्यांच्या आधारे त्यांचे वर्णन करतो. उदा., घनाला ६ पृष्ठभाग आहेत.)<br>• द्विमितीय आकार व त्यांची नावे ओळखतो. (उदा., चौरस, आयत, त्रिकोण, वर्तुळ). निरीक्षणक्षम वैशिष्ट्यांच्या आधारे त्यांचे वर्णन करतो. (उदा., पुस्तकाची पाने आयताकृती आहेत. त्याला चार कडा व कोपरे आहेत.)<br>• सरळ आणि वक्र रेषा यांतील फरक ओळखतो. सरळ रेषा वेगवेगळ्या रूपात (Orientations) काढतो/दाखवितो. (उदा., उभ्या, आडव्या, तिरप्या)<br>• त्रिमितीय वस्तूंच्या द्विमितीय आकृत्या काढतो.<br>• वस्तूंच्या सावलीचे निरीक्षण करून वस्तू ओळखतो. |

## C-8.9 : लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | **लांबी**<br>• कविता आणि कथांद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. (उदा. लांबी, रुंदी, उंची, अंतर) | **लांबी**<br>• दोन वस्तूंच्या लांबीच्या संदर्भात तुलना करतो. ...च्यापेक्षा लहान, च्यापेक्षा उंच, च्यापेक्षा आखूड | **लांबी**<br>• तीन वस्तूंची त्यांच्या लांबीच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत लांब, सर्वांत लहान, सर्वांत उंच, सर्वांत आखूड | **लांबी**<br>• जवळ–दूर, बारीक/पातळ–जाड, आखूड–लांब, वर–खाली यांतील फरक ओळखतो.<br>• अप्रमाणित एककांच्या साहाय्याने लांबी मोजतो. (उदा. खेळाच्या संदर्भात विट्टी–दांडू, गोट्या)<br>• हाताची बोटे, हाताची वीत, हात, पाऊल यांसारख्या अप्रमाणित लांबीच्या एककाने कमी अंतराचा व लांबीचा अंदाज बांधतो व पडताळा घेतो. | **लांबी**<br>• अप्रमाणित एककाच्या आधारे लहान आणि लांब मार्गावरील लांबी आणि अंतर मोजतो.<br>• पेन्सिल, काडी, कप, बादली, चमचा यांसारख्या अप्रमाणित एककांचा वापर करून धारकता, लांबी, अंतर यांबाबत अंदाज आणि मापन करतो. |
| २ | **वजन**<br>• कविता आणि कथांद्वारे वजन, संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. | **वजन**<br>• दोन वस्तूंची तुलना त्यांच्या वजनाच्या संदर्भात करतो. ...च्यापेक्षा जड, च्यापेक्षा हलका | **वजन**<br>• तीन वस्तूंची त्यांच्या वजनाच्या दृष्टीने तुलना करतो. सर्वांत जड, सर्वांत हलके | **वजन**<br>• तुलना करून हलक्या ते जड वस्तू किंवा उलट क्रमाने क्रमवारी लावतो. | **वजन**<br>• साधा वजनकाटा वापरण्याची गरज ओळखतो.<br>• साधा वजनकाटा वापरून दोन वस्तूंची तुलना करतो. (पेक्षा जड, पेक्षा हलके) |
| ३ | | **आकारमान**<br>• आकारमान संकल्पना कविता/कथा यांच्याद्वारे व्यक्त करतो. | **आकारमान**<br>• दोन भांड्यांच्या आकारमानाची तुलना करतो. (उदा. पिंप, बादली, तांब्या) | **आकारमान**<br>• कप, चमचा, मग यांसारख्या अप्रमाणित एककाच्या साहाय्याने आकारमानाचा अंदाज करतो व प्रत्यक्ष मोजतो. | **आकारमान**<br>• भांड्याची त्यांच्या आकारमानानुसार क्रमवारी लावतो आणि पडताळा घेतो. (प्रत्यक्ष भांडे भरून किंवा रिकामे करून) |

## C-8.10 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ३८*

**C-8.10 : मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने या एककांमध्ये कालमापन करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • दैनंदिन जीवनात आज, उद्या आणि काल यांसारख्या शब्दांचा वापर करतो. | • विशेष दिवस ओळखतो. जसे की – शनिवार, रविवार, सुट्टीचा दिवस (उदा. रविवारी सुट्टी आहे.) | • आठवड्यातील वार आणि वर्षातील महिन्यांची नावे ओळखतो. | • अगोदर, नंतर यांसारख्या संज्ञांचा वापर करून घडलेल्या घटनांमध्ये फरक करतो.<br>• सुट्टीचा आणि शाळेचा कालावधी यांतील कमी आणि अधिक कालावधीची गुणात्मक अनुभूती घेतो.<br>• दिवसातील घटना/प्रसंग यांचा क्रम लावतो. | • क्रमाने येणाऱ्या ऋतूंची अनुभूती घेतो. (स्थानिक विविधता लक्षात घेऊन)<br>• प्रमाणित एककांच्या आधारे वेळेचे मापन करतो. जसे की – दिवस, तास (उदा. आठवड्यात ७ दिवस आणि दिवसाचे २४ तास) |

## C-8.11 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ३९*

**C-8.11 : १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • कविता आणि गोष्टींच्या आधारे पैशाशी संबंधित शब्दसंपत्तीचा वापर करतो. | • भारतीय चलनातील नाणी ओळखतो. | • भारतीय चलनातील नोटा ओळखतो. | • नाणी व नोटांची बेरीज करून/मिळवून २० रु. पर्यंतची रक्कम तयार करतो. | • नाणी व नोटांची बेरीज करून/मिळवून १०० रु. पर्यंतची रक्कम तयार करतो. |

## C-8.12 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४०*

### C-8.12 : राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो. | • संख्यानामे आणि आकारांच्या नावांचा उपयोग करून साध्या सूचनांचा अर्थ लावतो.<br>• संख्यानामे व आकारांच्या नावांचा योग्य प्रकारे उपयोग करतो. | • योग्य मापन क्रियेसाठी संख्या, आकारनामे व क्रिया यांचा उपयोग करतो. | • राशी, आकार, अवकाश आणि मापन यांच्याशी संबंधित गणितीय प्रश्नांचे वर्णन करण्यासाठी विधाने तयार करतो. | • मजकुराचा अर्थ लावून त्यात समाविष्ट असलेली गणितीय समस्या वेगळी करतो. साधी गणितीय कोडी, कूट प्रश्न तयार करतो. |

## C-8.13 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४१*

### C-8.13 : राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संदर्भात सोपी गणिते सोडवतो व तयारही करतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • भौमितिक व इतर आकारांवर आधारित सोपी कोडी सोडवितो. | • टॅनग्रॅमचा वापर करून विशिष्ट आकृत्यांची रचना करतो. | • साधी कोडी, कूट प्रश्न सोडविण्यासाठी संख्याज्ञानाचा वापर करतो. | • साध्या गणितीय समस्यांच्या स्वरूपात वास्तव जगातील प्रसंग ओळखतो.<br>• विविध कार्यनीतींचा/पद्धतीचा वापर करून साध्या अंकगणितीय समस्या सोडवितो. | • साध्या गणितीय समस्या सोडविण्याच्या विविध मार्गांची चर्चा करतो.<br>• त्रुटी शोधण्यासाठी उत्तरांची पुनर्तपासणी करतो.<br>• परिणामांशी निगडित असलेले खेळ आणि कोडी यात गुंतून राहतो. |

## १.१.४ : भाषा आणि साक्षरता विकास (विज्ञानमय कोश)

भाषा आणि साक्षरतेचा विकास हा शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टांपैकी एक आहे. सर्व प्रकारचे आकलन भाषेच्या माध्यमातून होत असते. भाषिक क्षमता आणि आकलन यांचा दृढसंबंध आहे.

संवाद असो, आकलन असो किंवा सौंदर्य अनुभूती असो, भाषा ही मानवी अनुभवांच्या केंद्रस्थानी असते. भाषा जरी जीवशास्त्राच्या दृष्टीने जन्मजात असली, तरी साक्षरता ही एक सांस्कृतिक संपादणूक आहे आणि म्हणूनच याकडे अधिक सहेतुकपणे लक्ष देण्याची गरज आहे. साक्षरता म्हणजे केवळ विसांकेतीकरण नसून, मजकूर ज्या संदर्भाने आला आहे, त्याचा अर्थ लावण्याची प्रक्रिया आहे.

## CG - 9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

पायाभूत स्तरावर बालकाच्या मौखिक भाषा विकासासाठी अधिक वेळ देणे आणि मेहनत करणे आवश्यक आहे. मौखिक भाषा कौशल्यांच्या मजबूत पायावर पायाभूत साक्षरतेचा विकास होतो. बालकांना सुरुवातीच्या स्तरात मौखिक भाषा आत्मसात करण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात, लिपीचा परिचय करून देणे, हे साक्षरता विकासासाठी प्रतिकूल ठरेल.

**C-9.1 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता – ४२*

**C-9.1 : साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • विविध प्रकारची गाणी आणि कविता ऐकतो. | • घरात आणि परिसरात वारंवार म्हटली जाणारी विविध भाषांमधील गाणी ऐकतो आणि आनंद घेतो. | • जास्त लांबीची (४ ते ८ ओळी) परिचित गाणी/बडबडगीते, कविता, लक्ष देऊन ऐकतो, त्याबद्दल संभाषण करतो. | • जास्त लांबीची अपरिचित गाणी, (४ ते ८ वाक्ये) काळजीपूर्वक ऐकतो, त्याबद्दल संभाषण करतो आणि प्रश्न विचारतो. | • विशिष्ट प्रकारची गाणी आणि कविता ऐकण्यात स्वारस्य दाखवतो आणि ती आवडण्याचे कारण स्पष्ट करतो. |
| २ | • साधी गाणी, बडबडगीते ऐकून म्हणतो. | • हावभाव व आवाजातील चढउतारासह गाणी म्हणतो. | • लहान (४ ते ५ ओळी) गाणी/कविता बडबडगीते गातो. | • मोठी (१० ओळी) गाणी/कविता गातो व मोठ्याने पुन्हा म्हणून दाखवितो. | • २ ते ३ कडव्यांची गाणी / बडबडगीते /कविता पाठोपाठ म्हणतो व मोठ्याने पुन्हा म्हणून दाखवितो. |

## C-9.2 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – ४३

**C-9.2 : स्वत:हून साधी गाणी आणि कविता तयार करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • परिचित गाणी आणि कवितांचा आनंद घेतो. | • गाणी आणि कवितांमधल्या यमकबद्‌ध शब्दांचा आनंद घेतो. | • परिचित कवितांमधील यमक असलेला शब्द ओळखतो आणि यमक असलेले नवीन शब्द तयार करतो. | • शिक्षकांच्या मदतीने यमक जुळवतो/लहान कविता तयार करतो. | • स्वतःच्या शब्दात स्वतंत्रपणे लहान कविता/यमक तयार करतो. |

## C-9.3 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – ४४

**C-9.3 : अर्थपूर्ण व अस्खलितपणे संभाषण करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • लक्षपूर्वक ऐकतो आणि आजूबाजूच्या परिचित लोकांशी छोटे संभाषण करतो. | • दैनंदिन जीवनातील विविध शालेय परिस्थितींमध्ये, समवयस्क व शिक्षक यांच्यासोबत संभाषण सुरू करतो. | • घटना, कथा, गोष्ट किंवा त्यांच्या गरजा यांवर आधारित संभाषणात सहभागी होतो आणि प्रश्न विचारतो. | • संभाषणात सहभागी होतो. बोलण्यासाठी स्वतःची वेळ येण्याची वाट पाहतो आणि इतरांना बोलू देतो. | • अनेक वेळा संभाषणांमध्ये आदानप्रदान करताना त्या संभाषणाचा धागा पकडून ठेवतो. |
| २ | • लहान अर्थपूर्ण वाक्यांद्वारे स्वत:च्या गरजा आणि भावना व्यक्त करतो. | • सोप्या वाक्यात रोजचे अनुभव कथन करतो आणि काय/केव्हा/कसे/कोण इत्यादी शब्द वापरून साधे प्रश्न विचारतो. | • दैनंदिन अनुभवांचे तपशीलवार वर्णन करतो आणि 'का?' सारखे प्रश्न विचारतो. | • वर्गात वाचून दाखवलेल्या किंवा चर्चा केलेल्या माहितीपर/कथेतर आशयाशी स्वत:च्या अनुभवातून मिळालेले ज्ञान, सक्षमपणे जोडतो आणि त्याबद्‌दल बोलतो. | • एखाद्या विषयावर चर्चेत सहभागी होतो, प्रश्न उपस्थित करतो आणि त्याला प्रतिसाद देतो. |

## C-9.4 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४५*

**C-9.4 : क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषेमध्ये दिलेल्या छोट्या सूचना समजून घेऊन त्यांचे अनुपालन करतो. (उदा. ठोकळे इकडे आण, हात स्वच्छ धू, इत्यादी.) | • गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा/संमिश्र भाषेमध्ये एकाच वेळी दिलेल्या दोन ते तीन सोप्या कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजून घेऊन त्यांचे अनुपालन करतो. | • गृहभाषा/मातृभाषा/परिचित भाषा/संमिश्र भाषेमध्ये एकाच वेळी दिलेल्या चार ते पाच सोप्या कृतींचा समावेश असलेल्या सूचना समजून घेऊन त्यांचे अनुपालन करतो. | • साध्या स्वरूपाच्या अनेक कृतींचा समावेश असलेल्या सूचनांचे पालन करतो. (एकाच वेळी ८ ते ९ सूचना एकत्र दिल्यास) | • सशर्त सूचनांचे पालन करतो. (उदा. जर पाऊस पडत असेल, तर झाडांना पाणी घालू नकोस, तण काढ. पाऊस पडत नसेल, तर झाडांना पाणी घाल.) |
| २ | | | • साधी कामे करण्यासाठी इतर बालके व प्रौढ व्यक्ती यांना स्पष्ट सूचना देतो. | • साध्या स्वरूपाच्या अनेक कृतींचा समावेश असणाऱ्या सूचना स्पष्टपणे देतो. (एकाच वेळी ८ ते ९ सूचना एकत्र दिल्यास) | • गणितीय सूचना स्पष्टपणे देतो. (दिशादर्शक, अवकाशीय संबोध, भौतिक परिमाण असलेल्या) |

## C-9.5 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४६*

**C-9.5 : कथन केलेल्या/वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टीची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • अल्प कालावधीसाठी छोट्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो. (५ ते ७ मिनिटे) | • गोष्टीतील पात्रे व काही प्रसंग आठवतो, ते स्वतःच्या भाषेत सांगतो. | • गोष्टीची सुरुवात, मध्य व शेवट लक्षात घेऊन, गोष्ट स्वतःच्या शब्दांत सुसंगतपणे सांगतो. गोष्ट सांगताना गोष्टीतील महत्त्वाच्या शब्दांचा वापर करतो. | • गोष्टीची मध्यवर्ती कल्पना व पात्रांच्या भावना लक्षात घेऊन, गोष्ट संवादासह सांगतो. | • स्वतः लेखक असल्याची कल्पना करून, माहिती असलेल्या गोष्टीचा शेवट बदलून सांगतो.<br>• गोष्ट सांगताना पूरक बारकावे सांगतो. उदा. उंदराला एक फडकं मिळालं. ते फडकं खूप घाण होतं. अगदी धुळीने भरलेलं होतं.<br>• ऐकलेल्या गोष्टीतील काय आवडले, काय आवडले नाही हे सकारण सांगतो. |

## C-9.6 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४७*

**C-9.6 : स्पष्ट कथानकासह लघुकथा आणि पात्र यांचे कथन करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | • वैयक्तिक दृष्टिकोनातून गोष्टीचा शेवट कल्पना करून सांगतो. | • साधे कथानक व पात्रासह स्वतःच्या छोट्या गोष्टी सांगतो. | • गुंतागुंतीचे कथानक व बहुविध पात्रांसह स्वतःच्या गोष्टी तयार करतो. |

## C-9.7 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ४८*

**C-9.7 : दैनंदिन संवाद परिणामकारकरीत्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करतो व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून नवीन शब्दांचा अर्थ लावतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • दैनंदिन परिचियातील काही वस्तू आणि अनुभव यांसाठी योग्य शब्दांचा वापर करतो. (उदा. स्वतःचे व मित्राचे नाव, सामान्य वस्तू, चित्रे, गोड–आंबट, गोल, मोठा इ. ची नावे सांगतो.) | • विशिष्ट प्रसंग किंवा वर्गामध्ये अभ्यासलेल्या विषयांतून प्राप्त शब्दसंग्रहाचा उपयोग त्याच्या संभाषणात करतो. | • वाढीव शब्दसंग्रहाचा वापर करून, कृतियुक्त, वर्णनात्मक व कालदर्शक शब्दांचा हेतुपुरस्सर वापर करतो. | • चित्र आणि संदर्भ यांनुसार अपरिचित शब्दांच्या अर्थाचा अंदाज बांधतो. | • मजकुरात आलेल्या अपरिचित शब्दांचा अर्थ समजून घेण्यासाठी, बाल–शब्दकोशाचा वापर करतो. |

## CG - 10 : बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.

मौखिक भाषेचा विकास, हा सभोवतालच्या भाषिक वातावरणाशी समरस होऊन व सामाजिकी–करणाच्या प्रक्रियेतून नैसर्गिकरीत्या होत असतो. मात्र लेखन ही सांस्कृतिक संपादनांची बाब असून, त्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. बालकांना त्यांच्या मौखिक भाषा व लिपीतील परस्पर संबंध जोडणीकरिता, स्पष्ट सूचना देण्याची गरज असते. आपण वापरत असलेल्या शब्दांना अर्थ असतो, त्या शब्दांचे आवाजांमध्ये विभाजन करता येते आणि हे आवाज लिपीतील चिन्हांद्वारा दाखवता येतात, याची समज जेव्हा बालकांना येते, तेव्हा त्यांच्या लेखनाची सुरुवात होते. जरी लिपीचे वाचन आणि लेखन यांसाठी स्पष्ट सूचनांची आवश्यकता असली, तरी अर्थ लावण्यासाठी लिपीतील सर्व अक्षरे ओळखता येण्यापर्यंत थांबण्याची गरज नसते.

**C-10.1 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता – ४९*

**C-10.1 : शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफतो आणि शब्दापासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • बडबडगीते म्हणतो. | • यमक व अनुप्रास ओळखतो. | • यमक व अनुप्रास तयार करतो. | | |
| २ | • शब्दांची नक्कल आणि निर्मिती करतो. | • शब्दातील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखतो. | • अक्षर स्वर आणि व्यंजने वेगळी करतो. | • शब्दातून अक्षरांचे ध्वनी वेगळे करतो. | |
| ३ | | • साधे शब्द तयार करण्यासाठी २-३ अक्षरध्वनी जोडतो. | • परिचित शब्द तयार करण्यासाठी (स्वर व व्यंजन) ध्वनी जोडतो. | • अक्षरांच्या ध्वनींमधून स्वर व व्यंजनांचे ध्वनी वेगळे करतो. | |

**C-10.2 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता – ५०*

**C-10.2 : पुस्तकाची मूलभूत रचना/स्वरूप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • सर्वसामान्य चिन्हे, प्रतीके व मुद्रा (लोगो) ओळखतो. (उदा. बिस्किट किंवा साबणाचे आवरण किंवा रंगावरून विशिष्ट बिस्किट किंवा साबण ओळखतो.) | • पुस्तक पकडतो, उघडतो व चाळण्यासाठी पाने पालटतो. | • मुद्रित साहित्यातून माहिती मिळते असे वर्णन करतो. (उदा. पुस्तक, वर्तमानपत्र, माहितीपत्रक.) | | |
| २ | • मुद्रित मजकूर आणि चित्रांमध्ये फरक करतो. | • डावीकडून-उजवीकडे आणि वरून-खाली शब्दांचे अनुसरण करतो. | | • साधी विरामचिन्हे ओळखतो. (पूर्णविराम, प्रश्नचिन्ह) | • साधी विरामचिन्हे योग्य रीतीने वापरतो. (पूर्णविराम, प्रश्नचिन्ह) |
| ३ | • चित्रमय गोष्टींच्या परिचित पुस्तकांचे वाचन करत आहे असे दाखवतो. | • शब्द व ध्वनींचा योग्य रीतीने उच्चार करून, वाचन करत असल्याचे दाखवतो. | • पुस्तकाच्या मुखपृष्ठाकडे पाहून पुस्तकाविषयी बोलतो. (मुखपृष्ठावरील सूचकचिन्हे पाहून अंदाज करतो.) | | |

## C-10.3 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – ५१

**C-10.3 : भाषा एक (L1) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि त्या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • शब्दांतील आवाज अक्षरांद्वारे कागदावर लिहिले जातात याची समज दर्शवतो, म्हणजेच लेखी शब्दातील काही मुळाक्षरांची संबंधित ध्वनीशी सांगड घालण्यास सुरुवात करतो. | • वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो. | • वर्णमालेतील काही अक्षरे व स्वरचिन्हे ओळखतो. | • वर्णमालेतील सर्व अक्षरे (ज्ञ, क्ष या संयुक्त अक्षरांसह) व स्वरचिन्हे वाचतो.<br>• नेहमीच्या वापरातील जोडाक्षरे ओळखतो. | |
| २ | | • परिचित अक्षरे आणि स्वरचिन्हे यांच्या मदतीने तयार होणारे दोन अक्षरी शब्द वाचतो. उदा. हात, कान, मान, मका, काम | • परिचित अक्षरे आणि स्वरचिन्हे यांच्यापासून तयार होणारे शब्द वाचतो. यात नियमित वापरातील जोडाक्षरांचा समावेश असू शकतो. | • सर्व अक्षरे, सर्व स्वरचिन्हे आणि नेहमी वापरत असलेली जोडाक्षरे यांसहित बहुवर्णीय शब्द वाचतो. | • बहुवर्णीय शब्द वाचतो आणि ध्वनिदर्शक शब्ददेखील अचूकतेने वाचतो. (उदा. भुर्र, डुबूक) |
| ३ | | • शिकलेली अक्षरे आणि स्वरचिन्हे यांचे अक्षरपत्ते वापरून, शब्द तयार करतो.<br>• तयार केलेल्या शब्दांवरून वाक्य तोंडी सांगतो किंवा शब्दावर आधारित विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो. | • शिकलेली अक्षरे आणि स्वरचिन्हे वापरून, शब्द तयार करतो.<br>• तयार केलेल्या शब्दांवरून वाक्य तोंडी सांगतो किंवा शब्दावर आधारित विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो. | • वर्णमालेतील सर्व अक्षरे आणि स्वरचिन्हे वापरून स्वत: शब्द लिहितो आणि त्यावरून वाक्य सांगतो. | |
| ४ | • परिसरात दिसणाऱ्या वस्तूंची लिहिलेली नावे, दृश्य शब्द (sight word) म्हणून ओळखतो. | • परिचित शब्द संग्रहातून २ ते ३ शब्दांचे वाक्य तयार करतो. | • परिचित शब्दसंग्रहातून ३ ते ५ शब्दांचे वाक्य तयार करतो. | • शिकलेली अक्षरे आणि स्वरचिन्हे वापरून स्वतः वाक्ये लिहितो. | |

## C-10.4 : अध्ययन निष्पत्ती

तक्ता – ५२

**C-10.4 : भाषा एक (L1) मधील कथा आणि परिच्छेद योग्य ठिकाणी विराम घेऊन आणि आवाजातील चढ-उतारांसहित अचूकपणे व ओघावतेपणाने वाचतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | • परिचित अक्षरे, ध्वनी आणि सहजगत्या दिसणाऱ्या शब्दांचा वापर करून लहान वाक्ये वाचतो. | • परिचित अक्षरांनी बनलेली काही छोटी वाक्ये अचूकपणे वाचतो. | • योग्य उच्चार आणि विरामांसह लहान परिच्छेद अचूकपणे वाचतो. | • लहान उताऱ्यांचे वाचन योग्य उच्चारण, विराम व आवाजातील आरोह-अवरोहांसह अचूकपणे करतो. |

**C-10.5 : अध्ययन निष्पत्ती** तक्ता – ५३

**C-10.5 : स्वत:हून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे, ते समजून कथा वाचतो व त्याचा अर्थ समजून घेतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • प्रकटवाचन ऐकतो आणि शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो. | • शिक्षकांसोबत सहभागी वाचनात भाग घेतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो. | • शिक्षकांसमवेत मार्गदर्शक वाचनात सहभागी होतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो. | • दृक् आशय आणि मजकूर समान असणाऱ्या पुस्तकाचे स्वतंत्रपणे वाचन करण्यास सुरुवात करतो. | • दृश्य आशयापेक्षा जास्त मजकूर असणाऱ्या पुस्तकांचे स्वतंत्रपणे वाचन करण्यास सुरुवात करतो. |
| २ | • चित्रपुस्तके वाचतो आणि कृती व वस्तू ओळखतो. | • चित्रपुस्तके वाचतो, त्यांतील पात्रे, कथानक ओळखतो आणि घटनांचा योग्य क्रम लावून गोष्ट पुन्हा सांगतो. | • लहान सोपा मजकूर असणारी पुस्तके मोठ्याने वाचतो, दृश्य सूचके व मजकूर या दोन्हींचा वापर वाचण्यासाठी करतो आणि अचूक क्रम व विस्तारासह पुन्हा सांगतो. | • गोष्टींची अपरिचित पुस्तके वाचतो आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ती समजून घेतो.<br>• गोष्टीतील कथानक व पात्र ओळखतो. | • कथेचे कथानक, पात्रे, घटनाक्रम ओळखतो आणि लेखकाचा दृष्टिकोन लक्षात घेऊन वाचन करतो. |

**C-10.6 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता – ५४*

**C-10.6 : कवितेतील कल्पना व शब्दयोजना यांचे रसग्रहण करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | • छोट्या कविता वाचतो आणि त्यांचा शाब्दिक अर्थ सांगतो. | • लहान कविता वाचतो आणि कवीच्या कल्पनेचा अंदाज बांधतो. |

**C-10.7 : अध्ययन निष्पत्ती** *तक्ता – ५५*

**C-10.7 : छोट्या बातम्या, सूचना, पाककृती आणि प्रकाशित साहित्य वाचतो आणि त्यांचा अर्थ समजून घेतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | • साध्या, सोप्या, लिखित सूचनांचा छोटा संच वाचतो आणि त्याप्रमाणे त्यांचे पालन करतो. | • खेळ खेळण्याकरिता सोप्या सूचना वाचतो आणि त्याप्रमाणे गटात खेळतो. | • छोट्या बातम्या, तसेच प्रकाशित साहित्य वाचतो आणि त्यातील आशय स्पष्ट करतो. |

## C-10.8 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ५६*

**C-10.8 : स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • विविध लेखन सामग्रीचा वापर करतो. (खडूचा तुकडा, रंगीत खडू, चित्रकलेत वापरायचे जाडे ब्रश).<br>• चित्रे रेखाटतो आणि चित्रात काय काढले आहे हे तोंडी सांगतो. | • चित्रकलेचे अथवा लेखनाचे साहित्य सहजतेने वापरतो. (खडूचा तुकडा, रंगीत खडू, पेन्सिल, चित्रकलेत वापरायचे ब्रश)<br>• चित्रे रेखाटतो व त्या चित्राला/चित्रातील वस्तूंना/व्यक्तींना स्व-लिपीमध्ये नावे देतो.<br>• रेखाटलेल्या चित्रांबाबत स्वलिपीमध्ये लिहितो. | • चित्रांचा क्रम तयार करतो आणि त्यासोबत पारंपरिक लिपीचा वापर करून किंवा स्वलिपीमध्ये छोटी वाक्ये लिहितो. | • चित्रांचा क्रम तयार करतो आणि त्यासोबत छोटी वाक्ये पारंपरिक लिपीत (वर्णमालेतील अक्षरे व स्वरचिन्हे वापरून) लिहितो.<br>• शब्द आणि छोटी वाक्ये लिहून चित्रपट्ट्यांचे वर्णन करतो. | • चित्राच्या आधारे वर्णन अथवा गोष्टीवजा लेखन पारंपरिक लिपीत करतो.<br>• चित्रपुस्तकातून अंदाज बांधून गोष्ट लिहितो. |
| २ | • स्वतःच्या अभिव्यक्ती-साठी कागदावर गिरगिटतो व आपण काय लिहिले आहे ते शब्दांत किंवा वाक्यात सांगतो.<br>• आपण काढलेल्या चित्राबद्दल स्वलिपी-मध्ये लिहितो. चित्र व स्वलिपीतील लेखन वेगवेगळे दिसते.<br>• आपण स्वलिपीत लिहिलेला मजकूर तोंडी सांगतो.<br>• स्वतःचे नाव स्वलिपीत लिहू शकतो. | • स्वलिपित केलेल्या लेखनात पारंपरिक अक्षरे नसली, तरीही लेखी भाषेची वैशिष्ट्ये दिसतात. जसे : स्वलिपीतील दोन शब्दांमध्ये अंतर सोडणे, स्वलिपीतील शब्दांवर शिरोरेषा देणे.<br>• शिकविलेल्या अक्षरांचा किंवा अंकांचा स्वलिपीतील लेखनात अंतर्भाव दिसतो, मात्र ही अक्षरे कुठेही, कशीही वापरलेली दिसतात.<br>• परिचित अक्षरे लिहिण्यास सुरुवात करतो व त्याचा वापर सोपे शब्द तयार करण्यासाठी करतो. | • विविध लेखन प्रकारांची समज दिसून येते. उदा. गाणी, गोष्टी, कविता.<br>• भिंतींवरील गाणी, सूचना बघून लिहिण्याचा प्रयत्न करतो.<br>• शिकविलेल्या अक्षरांचा वापर करून सोपे शब्द लिहितो. | • तीन किंवा चार वर्णाक्षरांच्या शब्दांचे श्रुतलेखन करतो.<br>• वर्णमालेतील अक्षरे व स्वरचिन्हे यांचा वापर करून दोन-तीन वाक्यांचे लेखन स्वतः करतो. उदा. स्वतःचा अनुभव, चित्र अथवा वस्तूचे वर्णन, स्वतःच्या दोन-तीन वाक्यांत लिहितो. | • लहान वाक्यांचे श्रुतलेखन करतो.<br>• घटना किंवा अनुभव यांबद्दल लिहितो.<br>• दोन पात्रांतील संवाद कल्पना करून चार-पाच वाक्यांत लिहितो. उदा. भाजीवाला व ग्राहक, बस कंडक्टर व प्रवासी.<br>• पाककृती/कागदापासून वस्तू तयार करण्याची कृती/एखादा खेळ कसा खेळला जातो यासारख्या प्रक्रिया ४ ते ५ वाक्यांत लिहितो. |

C-10.9 : अध्ययन निष्पत्ती *तक्ता – ५७*

**C-10.9 : बालकांसाठी असलेली विविध पुस्तके वाचण्यात रुची दर्शवितो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • वाचून दाखवलेल्या कविता आणि गोष्टी यांच्यामध्ये रुची दर्शवितो. | • शिक्षकांनी समोर ठेवलेल्या अनेक पुस्तकांतून एका पुस्तकाची निवड करतो व विशिष्ट पुस्तक निवडीबद्दल स्पष्टीकरण देतो. | • छोटे चित्रपुस्तक स्वतः निवडून त्याचे वाचन करतो व पुस्तकाबद्दल इतर बालकांना सांगतो. | • पुस्तकांच्या आवडीबद्दल सांगतो, छोट्या पुस्तकांचे नियमित वाचन करतो. | • पुस्तकांमध्ये आवड दाखवून वास्तव आणि काल्पनिक अशी विविध प्रकारची पुस्तके वाचतो. |
| २ | • पुस्तके काळजीपूर्वक हाताळतो. | • पुस्तके वर्गातील नियोजित जागेवर परत ठेवतो. | | | • शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तकांची निगा राखतो व ती सुव्यवस्थित ठेवतो. |

## CG - 11 : बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.

C-11.1 : अध्ययन निष्पत्ती *तक्ता – ५८*

**C-11.1 : शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून, शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | • बडबडगीते म्हणतो. | • यमक आणि अनुप्रास ओळखतो. | • यमक आणि अनुप्रास तयार करतो. |
| २ | | | • अक्षरध्वनींची नक्कल आणि निर्मिती करतो. | • शब्दातील प्रारंभिक आणि अंतिम अक्षर ओळखतो. | • अक्षरे, स्वर आणि व्यंजनांमध्ये विभागणी करतो. |
| ३ | | | | • साधे शब्द तयार करण्यासाठी २-३ अक्षरध्वनी जोडतो. | • परिचित शब्द तयार करण्यासाठी (स्वर व व्यंजन) ध्वनी जोडतो. |

**C-11.2 : लिपीतील वारंवार येणारी अक्षरे ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | • शब्दांची ओळख करून त्यातील अक्षरांशी संलग्न असलेला ध्वनी ओळखतो. | • वर्णमालेतील सर्व अक्षरे ओळखतो. |
| २ | | | | • परिचित असणाऱ्या अक्षरांपासून परिचित शब्द तयार करतो. | • परिचित असलेले तीन, चार वर्णाक्षर असलेले शब्द वाचतो.<br>• नेहमीच्या वापरात असलेले दृश्य शब्द, उपपदे, सर्वनामे आणि संयुक्त व्यंजने ओळखतो. |
| ३ | | | | • सभोवताली आढळणारे दृश्य शब्द, वस्तूंची नावे, शीर्षके ओळखतो. | |
| ४ | | | | • लहान शब्दांचे श्रुतलेखन करतो. | |

## १.१.५. सौदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास : (आनंदमय कोश विकास)

या वयातील मुले केवळ कला आणि सौंदर्यात्मक अभिव्यक्तीचा आस्वादच घेत नाहीत, तर कलेद्‌वारे आपल्या संवेदनक्षमता आणि सूक्ष्म स्नायूही विकसित करत असतात. कलात्मक अभिव्यक्ती ही भावनिक अभिव्यक्ती व नियमनाचेही माध्यम आहे. कलाक्षेत्रातील कामाबद्‌दल बोलणे व मौखिक अभिव्यक्ती या बाबींना प्रोत्साहन दिले पाहिजे. निरीक्षण, पुनर्निर्मिती आणि रचनांचे विस्तारीकरण हे सर्व प्रकारच्या कलांचे मुख्य घटक आहेत. पायाभूत स्तरावर दृश्यकला, संगीत, हालचाली आणि नाटक यांद्‌वारा बालकाचा सर्वांगीण विकास साधण्याला मदत होते. कौशल्य आणि क्षमता बांधणीपेक्षा बालकांमध्ये मुक्त आणि सर्जनशील अभिव्यक्ती विकसित करणे, हे पायाभूत स्तरावरील बालकांसाठी अधिक महत्त्वपूर्ण आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

## CG - 12 : बालके दृक् आणि ललितकलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

### C-12.1 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६०*

<table>
<tr><th></th><th>अ</th><th>ब</th><th>क</th><th>ड</th><th>इ</th></tr>
<tr><td></td><td colspan="5">C-12.1 : विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br>← वय – ३ ते ८ →</td></tr>
<tr><td>१</td><td>• योग्य कलासाहित्य, साधने आणि उपकरणे हाताळतो.</td><td colspan="2">• सामग्री साहित्य आणि साधने वापरताना, विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदा. : काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिली, ब्रश, क्रेऑन, भुकटी, कात्री इ.)</td><td colspan="2">• दृक् कलांमध्ये गडद व फिकट छाप/ठसे/रेघा काढण्यासाठी हातांचा कमी–जास्त दाब देता येण्यासाठी सक्षम होतो.</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="2">• दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा, आणि इतर द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो.</td><td>• समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहयोगाने, मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदा. : जमिनीवरील रांगोळी, भित्तिचित्रे, शिल्पकृती)</td><td colspan="2">• उपलब्ध जागा व साहित्यानुसार, लहान व मोठ्या आकारामानामध्ये स्वतःचे काम स्वतः करतो. (उदा. मातीची छोटी बाहुली किंवा कागदाची मोठी बाहुली तयार करणे.)</td></tr>
<tr><td>३</td><td>• साहित्य एकत्रित मिसळून छाप व आकृती तयार करतो. (उदा. : माती आणि पाणी, वाळू आणि पाणी, पीठ आणि पाणी, रंग आणि पाणी.</td><td>• माती किंवा कणीक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय (3D) आकार तयार करतो.</td><td colspan="3">• स्वतःच्या रचनेमध्ये वेगवेगळ्या घनतेचे, रंगांचे आणि पोतांचे साहित्य एकत्र करून कोलाज तयार करतो.<br>• परिसरातून मिळालेले वैविध्यपूर्ण साहित्य व वस्तू यांची सरमिसळ करून त्रिमितीय रचना/जोडणी करतो.</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">• ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो.</td><td>• ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो.</td><td>• विविध आकार, पोत, आणि रंग यांच्या आधारे साहित्याची जोडणी करून रचना तयार करतो.</td><td>• एकाच साहित्याची विविध प्रकारे हाताळणी करून, त्यांचे विविध पोत तयार करतो. (उदा. : माती, कापड, कागद, रबर, लाकूड)</td></tr>
</table>

C-12.2 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६१*

## C-12.2 : संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वत:चा आवाज, शरीर, जागा, आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • स्वत:च्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेतो. (टाळ्या, चुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतांतील शब्दोच्चार) | • स्वत:चा आवाज, शरीर, वाद्ये व इतर साधनांचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेताना द्रुत आणि संथ लय यांच्यात फरक करतो. | • आवाज, शरीर, वाद्ये व इतर साधनांबरोबर खेळताना, द्रुत, मध्यम आणि संथ लय यांच्यात फरक करतो. | • संथ मध्यम लयीतील विविध व सोप्या तालप्रकारांमध्ये हालचाली करतो. | • गाणी आणि हालचालींप्रमाणे ठेका धरतो आणि परिचित तालप्रकाराप्रमाणे वैविध्य आणण्यासाठी प्रयोग करतो. |
| २ | • स्वत:चा आवाज, शरीर, वस्तू आणि वाद्यांचा वापर करून विविध ध्वनी निर्माण करतो. | • आवाज, शरीर किंवा साधन यांचा वापर करून, संदर्भ/ परिस्थिती नुसार विविध ध्वनी निर्माण करतो. (भूमिका अभिनय, एकल किंवा समूहामध्ये संगीतमय व्यवस्थित रचना, नकला यांमध्ये) | • स्वत:चा गाण्याचा आणि बोलण्याचा आवाज यांमध्ये फरक करतो आणि दोन्हींचा खेळकरपणे वापर करतो.<br>• वाद्यसंगीत आणि कंठ संगीत (गाणे म्हणणे) यांच्यातील फरक ओळखतो आणि दोन्हीही वापरतो. | • आवाज, शरीर, वस्तू आणि साधने यांचा वापर करून, परिचित गाणी व प्रसंग यांमध्ये साध्या ध्वनींद्वारा सुधारणा करतो. (उदा., गाण्यासाठी शरीराचे अवयव किंवा वाद्ये यांचा वापर करून ठेका देणे, ध्वनीद्वारा नाटकातील प्रसंगांसाठी पार्श्वभूमी तयार करतो.) | |
| ३ | • आवाज, शरीर, वस्तू यांचा वापर करताना किंवा साधनांबरोबर खेळताना, आवाजाची मात्रा (हळू आणि मोठा) आवाजाची पट्टी (तीव्र आणि मृदू) यांचा बरोबर प्रयोग करतो. | | • कल्पना आणि भावना व्यक्त करतो, संगीत निर्मिती करतो, भूमिका रंगवितो आणि प्रसंग निर्मिती करतो. यासाठी आवाजाची मात्रा आणि आवाजाची पट्टी यांचा वापर करतो. | • संगीतरचना, जागा, संदर्भ आणि प्रसंग यांनुसार आवाजाची मात्रा आणि आवाजाची पट्टी यांच्यामध्ये बदल करतो. | • आवाज किंवा साधन यांचा वापर करून, आवाजाची पट्टी जुळवून घेतो. |
| ४ | • रोजच्या प्रसंगांमध्ये शांतता आणि स्थिरता यांचा वापर करतो. | • संगीत, नाट्य आणि हालचाली यांच्या साहाय्याने शांतता आणि स्थिरता यांच्या बाबतीत प्रयोग करतो. | | • जागा, संदर्भ आणि प्रसंग यांनुसार शांतता आणि स्थिरता यांच्याबाबत, विविध कालावधींसाठी प्रयोग करतो. | |

**C-12.3 : बालक कलेच्या माध्यमातून स्वत:च्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • परिसर, स्थानिक संस्कृती आणि कलेचे नमुने यांचे निरीक्षण करतो आणि त्यांचा सहसंबंध जोडतो. | • कलेच्या माध्यमातून स्वत:च्या कल्पना, साधने आणि कार्यपद्धती यांची देवाणघेवाण करतो व परिचित उदाहरणांतून सुधारणा करतो. | • कलेच्या माध्यमातून विविध अभिव्यक्ती, कल्पना आणि भावना लक्षात घेतो व त्यांचा अर्थ लावतो, तसेच स्वतःच्या कलात्मक अविष्कारामध्ये या बाबींचा उपयोग करतो. | • विशिष्ट कल्पना आणि भावना व्यक्त करताना, विविधांगी दृष्टिकोन किंवा त्यात वैविध्य ठेवतो.<br>(उदा. : मांजराची भूमिका करण्यासाठी शरीर, आवाज, मुखवटा किंवा हालचाली यांची विविध मार्गांनी सरमिसळ करण्याचा विचार करतो)<br>• अनेक उपाय आणि स्वतःचे स्रोत शोधून, आव्हानात्मक परिस्थितीमध्ये टिकून राहतो. | |
| २ | • वस्तू, व्यक्ती आणि भावनिक अनुभव यांची प्रतीकात्मक अभिव्यक्ती करण्यासाठी, विविध दृश्य प्रतिमा, शारीरिक हालचाली आणि आवाज निर्माण करतो. | • दृक् आणि सादरीकरण कलांच्या माध्यमातून व्यक्ती, प्राणी, वनस्पती, वस्तू इत्यादींच्या ओळखता येण्याजोग्या शारीरिक आणि वर्तन वैशिष्ट्यांची नक्कल करतो. | • स्वतःच्या कल्पना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी, रूपे, रंग, भूमिका, आवाज, जागा आणि प्रसंग यांचे कल्पकतेने एकत्रीकरण करतो. | • कलाकृतींची निर्मिती करताना व त्या पाहताना, विषयानुरूप तपशील, साहित्याची वैशिष्ट्ये (पोत, रंग, आकारमान) यांकडे लक्ष देतो. | |

## C-12.4 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६३*

**C-12.4 : कला माध्यमामध्ये सहयोगाने काम करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • व्यक्तिश: किंवा गटात विविध आवाज किंवा हालचाली यांचे प्रयोग करतो. | • समवयस्कांच्या साहाय्याने विविध संभाषणे, हालचाली, ध्वनी आणि दृश्यकलेचे नमुने तयार करतो. | • जोडी किंवा गटामध्ये खेळताना किंवा सादरीकरण करताना, संभाषण, हालचाली आणि आवाज यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करतो.<br>• कलाकृती दर्शविताना किंवा अवकाशीय रचना करताना, समवयस्क आणि सुलभक यांना साहाय्य करतो. | • सहकारी/गट यांच्यात सहभागी होताना स्वत:च्या आवाजाची मात्रा, आवाजाची पट्टी आणि लय इतरांशी जुळवून घेतो. | • भूमिकाभिनय, संगीत, नृत्य आणि हालचाली करताना, क्रमाकडे लक्ष देतो. |

## C-12.5 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६४*

**C-12.5 : विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • कलाकृतींबाबत आवडीनिवडी व इतर मते व्यक्त करताना शाब्दिक/अशाब्दिक प्रतिसाद देतो. | • कलाकृती किंवा स्थानिक सांस्कृतिक अभिव्यक्ती यांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधतो. (उदा. एखाद्या पात्राचा मोठा आणि थरथरणारा आवाज) | • विविध कलाकृती/रचना किंवा सांस्कृतिक अभिव्यक्ती यांची तुलना करतो आणि विविध प्रतिसाद शब्दांमध्ये स्पष्ट करतो. | | |
| २ | • कलेशी संबंधित कृतींमध्ये, इतरांच्या उपस्थितीची दखल घेतो. | • कलेच्या प्रक्रियेदरम्यान, समवयस्कांसोबत प्रतिसाद व कल्पनेची देवाणघेवाण करतो. | • कलेबाबत प्रत्येक व्यक्तीचा प्राध्यान्यक्रम हा वेगवेगळा असू शकतो, हे लक्षात घेतो. | • कलात्मक विचार आणि अभिव्यक्ती यांबाबत विविध प्रकारे प्रतिसादाची देवाणघेवाण करतो व त्यांची प्रशंसा करतो. | |

### १.१.६ : सकारात्मक अध्ययन सवयी

प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणामध्ये, विकासाच्या क्षेत्रांसोबत उच्चस्तरीय कार्य आणि स्वयं–नियंत्रण यांचा, शाळापूर्व तयारीवर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडतो, असे सद्य:स्थितीतील संशोधनात दिसून आले आहे.

## CG - 13 : बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

**C-13.1 : अध्ययन निष्पत्ती**

*तक्ता – ६५*

**C-13.1 : अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी नियोजन, अवधान केंद्रीकरण, मार्गदर्शित कृती करणे अशी कौशल्ये संपादित करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • कमी कालावधीसाठी स्वतःच्या कृतीवर लक्ष केंद्रित करतो. (उदा. : कोडी सोडवणे)<br>• गुंतवून ठेवणाऱ्या एक किंवा दोन कृतींमध्ये अभिरुची टिकवून ठेवतो. (उदा. : ५–१० मिनिटांसाठी ज्ञानेंद्रियाला चालना देणाऱ्या साहित्याबरोबर खेळतो. | • प्रौढांच्या मदतीने सुरू असणाऱ्या प्रकटवाचन, कथाकथन यांसारख्या कृतींमध्ये काही काळासाठी लक्ष विचलित न होता एकाग्र होतो.<br>• आवडणाऱ्या विविध कृती करत राहतो. (नाट्यात्मक खेळ आणि ठोकळे ठेवलेल्या ठिकाणी १० मिनिटांसाठी खेळतो.) | • रंगकाम, ब्लॉक जोडणे यांसारख्या कृती व कार्यावर जास्त कालावधीसाठी लक्ष केंद्रित करतो व आधिक्याने स्वतंत्रपणे करतो.<br>• आवडणाऱ्या कृतींमध्ये जास्त कालावधीसाठी गुंतून राहतो. (२० मिनिटे चित्रे रंगवणे)<br>• प्रौढ व्यक्तींनी सुरू केलेल्या व बालकाला फारशी रुची नसणाऱ्या कृतींकडेदेखील लक्ष देण्यास सुरुवात करतो. (उदा.: शिक्षककेंद्रित नेतृत्व असणाऱ्या लहान गटामध्ये सहभागी होणे.) | • प्रौढ व्यक्तींनी सुरू केलेल्या व बालकाला फारशी रुची नसणाऱ्या कृतींकडेदेखील लक्ष देतो. (उदा : शिक्षककेंद्रित नेतृत्व असणाऱ्या लहान गटामध्ये सहभागी होणे.)<br>• कृतींमध्ये जास्त कालावधीसाठी गुंतून राहतो. (२० मिनिटे) | • प्रौढ व्यक्तींनी सुरू केलेल्या व बालकाला फारशी रुची नसणाऱ्या कृतींकडेदेखील लक्ष देतो. (उदा. : शिक्षककेंद्रित नेतृत्व असणाऱ्या लहान गटामध्ये सहभागी होणे.)<br>• कृतींमध्ये जास्त कालावधीसाठी गुंतून राहतो. (३० मिनिटे) |

## C-13.2 : स्मृती आणि मानसिक लवचिकता : संरचित वातावरणामध्ये अध्ययन सुलभ होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे किंवा बदलणे), स्व-नियंत्रण (आवेगात्मक कृती किंवा प्रतिसाद रोखणे) विकसित करतो.

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • गोष्ट आठवून सांगतो किंवा समोर नसणाऱ्या चित्राचे वर्णन करणे यांसारख्या कृतींच्या माध्यमातून लक्षात ठेवण्याचा सराव करतो.<br>• परिचित वातावरणामध्ये साहित्य कुठे ठेवले आहे, ते आठवतो. (कपाटातून जास्तीचा कपडा काढून दाखवतो.) | • स्वतःला आवश्यक असणारे प्रसाधन साहित्य किंवा खेळणी यांची यादी म्हणून दाखवतो.<br>• स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा यांसारखे सोपे खेळ खेळतो.<br>• सोपी कामे करण्यासाठी दोन टप्प्यांच्या सूचना लक्षात ठेवतो आणि पाळतो. (उदा.: हात धू आणि नंतर खाऊ करायला किंवा खायला मदत कर.)<br>• गोष्ट किंवा गाणी यांमधल्या कृती लक्षात ठेवतो. | • विविध पायऱ्या असणाऱ्या कृतींचे टप्पे क्रमाने लक्षात ठेवतो. (कोडे पूर्ण कर, ते कपाटात ठेव आणि परत गटात ये.)<br>• दिलेल्या कृतीच्या पायऱ्या दुसऱ्या बालकाला शिकवतो. (उदा. : खाऊ खाण्याआधी साबणाने हात कसे धुवायचे ते समवयस्क बालकाला दाखवतो.)<br>• ५ वाक्यांपर्यंत छोट्या गोष्टी किंवा गाणी लक्षात ठेवून म्हणून दाखवतो. | • लक्षात ठेवून लगेच करून/म्हणून दाखवतो. (दिलेले चार आकडे त्याच क्रमाने सांगणे.) | • चित्र, वस्तू, प्रसंगांतील बाबी लक्षात ठेवतो. आठवतो आणि त्यातील राहून गेलेल्या बाबी ओळखतो. (उदा. दोन समान दृश्यांमध्ये १ ते २ ठळक फरक असल्यास त्या दोन दृश्यांचे अवलकोन करून फरक सांगतो.) |
| २ | • दैनंदिन कामकाजामधल्या बदलांबरोबर समायोजन करतो.<br>• दोन कृतींमधील बदलाच्या खुणा ओळखतो.<br>• दिनचर्येतील बदलांसोबत समायोजन करतो. | • एखादी गोष्ट पहिल्यांदा करता न आल्यास, प्रौढ व्यक्तीच्या मदतीने दुसरा मार्ग स्वीकारून 'बोधात्मक लवचिकता' दर्शवतो. (उदा.: पहिल्या प्रयत्नामध्ये उंचावर चढणे शक्य न झाल्यास, दुसरा मार्ग वापरतो किंवा साधनाच्या किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या मदतीने त्या वस्तूपर्यंत पोहोचतो.)<br>• आवश्यकतेनुसार अवधान एका कामावरून किंवा कृतीवरून, दुसरीकडे वळवू शकण्याची क्षमता दर्शवतो. | • कृती किंवा खेळामध्ये नवीन नियमाप्रमाणे जुळवून घेतो. (उदा. : प्रथम रंगाप्रमाणे व नंतर आकाराप्रमाणे कार्ड्स वेगवेगळी करणे.)<br>• उपाय किंवा मार्ग काढण्यासाठी प्रौढ व्यक्ती किंवा इतर बालकांच्या कल्पनांचा विचार करतो.<br>• प्रौढ व्यक्तींकडून कमीत कमी मदत घेऊन, लवचिकता दर्शवितो आणि जुळवून घेतो. (इतरांबरोबर खेळणी वाटून घेणे किंवा नवीन साहित्य वापरण्याचा प्रयत्न करणे.)<br>• नवीन कृती करण्याचा प्रयत्न करताना, प्रौढ व्यक्तींच्या सूचनांना सातत्याने प्रतिसाद देतो. | • वर्गामध्ये उद्भवणाऱ्या विविध परिस्थितीशी जुळवून घेतो आणि समायोजन साधतो.<br>• ठरवलेल्या कृतींमध्ये सहभागी होतो आणि त्या सुधारण्यासाठी सूचना स्वीकारतो. | • वर्गामध्ये उद्भवणाऱ्या विविध परिस्थितीशी जुळवून घेतो किंवा जुळवून घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करतो आणि समायोजन साधतो.<br>• सर्व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतो, सूचना आणि अभिप्रायांचे स्वागत करतो. |

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| २ | • प्रौढ व्यक्तींच्या सहकार्याने अल्प कालावधीसाठी आळीपाळीने संधी घेतो व रांगेत उभे राहून वाट पाहण्यास सवय करतो. | • समवयस्कांचे वर्तन किंवा त्यांच्याबरोबरच्या आंतरक्रियांमुळे त्रास होत असल्यास प्रौढ व्यक्तीची मदत घेतो.<br>• समवयस्कांमुळे होणारा त्रास, काही शब्द, खुणा किंवा हावाभावांच्या माध्यमातून, प्रौढ व्यक्तीच्या मदतीने व्यक्त करतो. (चावणे किंवा ढकलण्याऐवजी)<br>• प्रौढ व्यक्तीच्या मदतीने आवेगात्मक वर्तनाचे सनियंत्रण करतो. (शिक्षकांनी आठवण करून दिल्यावर, गोष्ट सांगताना प्रश्न विचारल्यावर लगेच उत्तर देण्याची इच्छा रोखतो.) | • अधिक स्वतंत्रपणे आवेगी वर्तन सनियंत्रित करतो. (उदा.: पळण्याऐवजी चालणे, दुसऱ्याचे खेळणे खेचून घेण्याऐवजी आपली पाळी येण्याची वाट बघणे, दुसऱ्याकडे मागण्यापेक्षा दुसरे बालक स्वत:हून देण्याची वाट बघणे.)<br>• स्वत:च्या कृतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सतत विविध उपाय योजतो. (उदा. : जास्त अंतर ठेवणे किंवा दुसरे खेळणे किंवा कृती शोधणे.) | • भावनांचे व्यवस्थापन करतो, संधीची वाट पाहतो, नेतृत्व गुण दाखवून नियम तयार करतो आणि त्याचे पालन करतो, तसेच कृतीमधील बदलांबाबत कल्पना सुचवितो. | |

## C-13.3 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६७*

**C-13.3 : निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि शोध : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो, विविध ज्ञानेंद्रियांचा वापर करून शोध घेतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • बागेमध्ये किंवा बाहेर आनंदाने वेळ घालवतो. | • नैसर्गिक वातावरणामध्ये कुतूहल आणि विस्मय दाखवतो. | • आनंद आणि विस्मय दर्शविण्यासाठी चित्र काढतो. रंगकाम, गायन आणि नृत्य करतो. | • खेळ, संगीत आणि नृत्य यांच्या माध्यमातून, इतर बालकांबरोबर आनंदात सहभागी होतो. | • आनंद शब्दांतून व्यक्त करण्यासाठी भाषेचा वापर करतो. |
| २ | • प्रौढ व्यक्तींच्या मदतीने सभोवतालच्या परिसराचा शोध घेण्यासाठी कुतूहल दर्शवतो. | • प्रौढ व्यक्तींच्या मदतीने किंवा मदतीशिवाय, सभोवतालच्या परिसराचा शोध घेण्यासाठी कुतूहल दर्शवतो. | • परिसरातील किंवा निसर्गातून वस्तू जमा करण्याबाबतीत, शोध घेताना कुतूहल व विस्मय दाखवतो. | • परिसराचे अवलोकन करण्यासाठी पुढाकार घेतो व उत्सुकता दाखवतो आणि नैसर्गिक साधनांचा वापर करतो. (प्रौढ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली) | • इतरांबरोबर निर्भयतेने, पण आदरपूर्वक आंतरक्रिया करतो.<br>• परिसराचे अवलोकन करण्यासाठी पुढाकार घेतो व उत्सुकता दाखवतो आणि नैसर्गिक साधनांचा जबाबदारीने वापर करतो. |

## C-13.4 : अध्ययन निष्पत्ती

*तक्ता – ६८*

**C-13.4 : वर्गखोली नियामके : नियामके समजपूर्वक स्वीकारतो आणि पालन करतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • वर्गातील नियामकांसाठी प्रौढ असून व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण व अनुकरण करतो. | • शिक्षकांनी दिलेल्या संकेतांनुसार वर्गातील नियम पाळतो. | • वर्गातील नियम पाळतो व इतरांना पाळण्यास मदत करतो.<br>• वर्गातील कामांच्या जबाबदाऱ्यांचे तक्ते/भित्तिपत्रिका शिक्षकांच्या मदतीने तयार करतो. | • वर्गातील नियमांसंबंधित चर्चेमध्ये सहभागी होतो व त्याप्रमाणे वागतो.<br>• वर्गातील कामांच्या जबाबदाऱ्यांचे तक्ते/भित्तिपत्रिका स्वत: तयार करतो आणि त्याचे अनुकरण करतो. | • वर्गातील नियम तयार करण्याच्या चर्चेमध्ये सहभाग घेतो.<br>• वर्गातील स्वत: करण्याच्या कामाचे तक्ते/भित्तिपत्रिका तयार करतो, स्पष्ट करून सांगतो व जबाबदारीने पाळतो. |

# संदर्भ ग्रंथ सूची


१) National Curriculum Framework for Foundational Stage, 2022, NCERT, New Delhi.

२) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

३) पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम – २०२४, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

४) UNMUKH Trainers' handbook for Balvatika, April 2023, National Council of Educational Research and Training, New Delhi.

५) Aadharshila - National Curriculum for Early Childhood Care and Education 2024 For Children from Three to Six years, National Institute of Public Cooperation and Child Development Siri Institutional Area, Hauz Khas, New Delhi - 110016.

६) आकार बालशिक्षणक्रम, प्रथम आवृत्ती २०१४, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

७) बालशिक्षणाचे संघटन व व्यवस्थापन, मनीषा अष्टपुत्रे (लेखन व संपादन), मुक्ता चिपळूणकर २००८ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१.

८) पिंटूसाठी गोष्टी : भाग १ ते ५, ऑगस्ट २०२२, अक्षर स्पर्श, स्वाधार प्रकाशन, पुणे.

# निर्मिती व लेखन समिती

| मुख्य लेखन समिती | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **नाव** | **पद** | **शाळेचे/कार्यालयाचे नाव** |
| १) | डॉ. माधुरी सावरकर | उपसंचालक | सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २) | डॉ. गितांजली बोरुडे | विभाग प्रमुख | बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३) | श्रीम. सुषमा कोंडुसकर | अधिव्याख्याता | बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४) | श्रीम. मनीषा अष्टपुत्रे | निवृत्त व्याख्याता | एस. एन. डी. टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, पुणे. |
| ५) | प्रतीक्षा बिबवे | अकॅडमिक हेड | एनरीच फाऊंडेशन, लर्निंग होम, पुणे. |
| ६) | मृदुला धोंगडे | विश्वस्त/ विभागप्रमुख | पूर्वप्राथमिक विभाग, अभिजात एज्युकेशन सोसायटी, पुणे. |
| ७) | संध्या नगरकर | CDPO | बालविकास प्रकल्प अधिकारी हडपसर, पुणे. |
| ८) | चैत्राली रहाळकर-सिन्नरकर | संचालिका | स्वार्क फाऊंडेशन, पुणे. |
| ९) | नीता वाळिंबे | बालशिक्षणतज्ज्ञ | रॉकेट लर्निंग, पुणे. |
| १०) | डॉ. वृषाली देहाडराय | सल्लागार | विक्रमशीला एज्युकेशन रिसोर्स सोसायटी, कोलकाता. |
| ११) | डॉ. श्यामला दळवी | सल्लागार | विक्रमशीला-युनिसेफ. |
| **लेखन साहाय्य** | | | |
| १२) | डॉ. अश्विन किनारकर | सहायक शिक्षक | जि. प. प्राथमिक शाळा बांद्रा, केंद्र - वडंबा, पंचायत समिती रामटेक, जि. प. नागपूर. |
| १३) | सोनिया वडके | बालशिक्षणतज्ज्ञ | रॉकेट लर्निंग, पुणे. |
| १४) | प्रसेनजित गायकवाड | जिल्हा बालरक्षक समन्वयक | जिल्हा परिषद, नागपूर. |
| १५) | सुषमा साठ्ये | सल्लागार | स्वाधार, IDWC, पुणे. |
| १६) | निवृत्ती बोडखे | Community mobilizer | आगाखान फाऊंडेशन, पुणे. |
| १७) | आरती बिजुटकर | समन्वयक | ज्ञान प्रबोधिनी, निगडी, पुणे. |
| १८) | अभिलाषा संघई | संचालिका/ प्रधानाचार्य | सरस्वती विद्यानिकेतन, पूर्वप्राथमिक शाळा, परभणी. |

| अ.क्र. | नाव | पद | शाळेचे/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १९) | रेश्मा लेंगरे | बालशिक्षणतज्ज्ञ | आगाखान फाऊंडेशन, पुणे. |
| २०) | नंदिनी भावे | मुख्याध्यापक | सन्मित्र मंडळ गोरेगाव, नूतन शिशुमंदिर शिशुवाटिका, गोगटेवाडी, आरे रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई. |
| २१) | श्रीम. स्पृहा इंदू | सहायक शिक्षक | चेंबूर एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई. |
| २२) | डॉ. अनुपमा तावशीकर | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी. |
| २३) | दशरथ मुंडे | सहशिक्षक | जि. प. शाळा सिरसम, ता. गंगाखेड, जि. परभणी. |
| २४) | प्रदीप गोडसे | पदवीधर शिक्षक | जि. प. शाळा, गणेशवाडी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर. |
| २५) | मृदुला अडावद्‌कर | सुलभक | बियॉण्ड द क्लासरूम, पुणे. |
| २६) | सुनिता इंगळे | सहशिक्षक | न. पा. शाळा क्र. ६, कोपरगाव, जि. अहमदनगर. |
| २७) | प्रगती भावसार | शिक्षणतज्ज्ञ | कपिल मल्हार, बाणेर रोड, पुणे. |
| २८) | नवनाथ सूर्यवंशी | सहशिक्षक | जि. प. शाळा, हरीसोन ब्रँच, कोपरगाव. |
| २९) | शबनम डफेदार | सहायक शिक्षिका | दीपगृह ॲकॅडमी, देऊळगाव वाडा, दौंड. |
| ३०) | सुरेश पेंढारवाड | सहायक शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा सुर्ला, ता. झरी, जि. यवतमाळ. |
| ३१) | मंदाकिनी गोसावी | पर्यवेक्षक | पिंपरी चिंचवड, पुणे. |
| ३२) | माधुरी आहेर | सुलभक | मुक्तांगण, मुंबई. |
| ३३) | अनंता बावधनकर | सहायक शिक्षक | जि. प. शाळा मुस्ती, ता. जि. सोलापूर. |

## श्रेयनामावली

| अ.क्र. | व्यक्ती/संस्थेचे नाव | साहित्य प्रकार |
|---|---|---|
| १) | जयेश जोशी – एनरीच फाऊंडेशन, लर्निंग होम, पुणे. | कविता |
| २) | विक्रमशिला युनिसेफ – अंकुर प्रकल्प | गाणी, गोष्टी |
| ३) | प्रसेनजित गायकवाड – जिल्हा बालरक्षक समन्वयक, जि. प. नागपूर. | गाणी |
| ४) | डॉ. वृषाली देहाडराय, विक्रमशीला एज्युकेशन रिसोर्स सोसायटी, कोलकाता. | गाणी, गोष्टी |
| ५) | श्रीम. मनीषा अष्टपुत्रे | गाणी |
| ६) | विद्याधर शुक्ल | गाणी |

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास आपत्कालीन मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबविला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn




